


# जनमाध्यम


e paper www.janmadhyam.com

एक प्रतिष्ठित सवय

■ अमरावती, सोमवार ९ मार्च २०२६ ■ मूल्य ४.०० ■ पृष्ठ १०







# ७०७ कोटी थकीत बिलाच्या वसूलीसाठी महावितरणचा आक्रमक पवित्रा

## साडे सोळा हजार रोहित्रांवरील थकबाकी वसुलीसाठी मोहीम तीव्र

### -३ लाख थकबाकीदारांचा वीजपुरवठा खंडित होणार, -मोहिमेत अडथळा आणल्यास गुन्हा दाखल

**अमरावती/प्रतिनिधीः-** आर्थिक वर्ष संपण्यासाठी अवघे २४ दिवस शिल्लक असताना अमरावती परिमंडळात वीज बिलाची थकबाकी चिंताजनक पातळीवर पोहोचली असून लघुदाब वर्गवारीतील घरगुती, व्यावसायिक, औद्योगिक व इतर ग्राहकांकडून तब्बल ७०७ कोटी रुपयांची थकबाकी प्रलंबित आहे. महावितरणाने वीज बिल वसूलीसाठी रोहित्रनिहाय नियोजन केले असून ही थकबाकी परिमंडळातील १६ हजार ६६९ रोहित्रांवर असल्याने, महावितरणतर्फे वसूलीसाठी कठोर कारवाई केली जाणार असल्याचा इशारा मुख्य अभियंता अशोक साळुंके यांनी दिला आहे.




परिमंडळातील दोन जिल्ह्यांमध्ये थकबाकीचा आकडा मोठा आहे. अमरावती जिल्ह्यातील ८०५३ रोहित्रांवर १ लाख ४६ हजार ७६७ ग्राहकांकडे २५८ कोटी ४४ लाख रुपयांची थकबाकी आहे. तर यवतमाळ जिल्ह्यातील ८६१७ रोहित्रांवर १ लाख ७२ हजार ग्राहकांकडे ४४९ कोटी ३४ लाख रुपयांची थकबाकी प्रलंबित आहे. त्यामुळे रोहित्रनिहाय वसूलीचे सुक्ष्म नियोजन केले असून प्रत्येक रोहित्रावरील थकबाकी शून्यावर आणण्याचे स्पष्ट निर्देश देण्यात आले आहेत.

त्यामुळे परिमंडळातील ३ लाख थकबाकीदार वीज ग्राहक महावितरणच्या रडारवर असून वीजबिल वसूलीसाठी शाखा कार्यालय निहाय मोहिमा काढण्यात आल्या आहेत. यात सुमारे १ लाख ग्राहकांकडे १ हजार रुपयांपेक्षा अधिक थकबाकी असून त्यांच्याकडे ४७ कोटी रूपयाचे वीजबिल थकले आहे. वसूली मोहिमेत कारवाई करतांना थेट मीटर काढून आणण्याचे निर्देश देण्यात आले आहे. त्यामुळे वसूली मोहिमेदरम्यान अडथळा आणणाऱ्यांवर कायदेशीर कारवाई करून गुन्हा दाखल केला जाईल, तसेच आवश्यक असल्यास पोलीस मदतही घेण्यात येईल, असा इशारा महावितरणने दिला आहे.

**थकबाकीचा आढावा**

थकबाकी असलेले एकूण रोहित्र : १६,६६९
अमरावती :- ८०५३
यवतमाळ :- ८८१७
एकूण थकबाकी : ७०७ कोटी रुपये
अमरावती जिल्हा : २५८.४४ कोटी
यवतमाळ जिल्हा : ४४९.३४ कोटी
**थकबाकीदार ग्राहक :**
अमरावती :- १४६७६७
यवतमाळ :- १७२०००

तसेच परिमंडळ कार्यालयाकडून वसूली मोहिमेचा दररोज आढावा घेतला जात आहे.

थकबाकीदार ग्राहकांना बिल भरण्या साठी महावितरण कडून थेट कॉल करून सूचना दिल्या जात आहेत. याशिवाय यंदा प्रथमच यंत्रचालक, सुरक्षा रक्षक आणि कार्यालयीन बाह्यस्त्रोत कर्मचाऱ्यांनाही वसूलीचे उद्दिष्ट देण्यात आले आहे. तसेच वरिष्ठ अधिकाऱ्यांसह कार्यालयीन कर्मचाऱ्यांनाही वसूलीची जबाबदारी देण्यात आली आहे. त्यामुळे महावितरणची कटू कारवाई टाळण्यासाठी वीजबिल भरून सहकार्य करण्याचे आवाहन मुख्य अभियंता यांनी केले आहे.

# सोहम योगाभ्यास मंडळाच्यावतीने महिलादिनाचा भरगच्च कार्यक्रम

## वेशभूषेतून कर्तबगार महिलांच्या कार्याचा गजर



**अमरावती/प्रतिनिधीः-** स्थानिक श्री कॉलनी येथील संत गजानन महाराज परिसरातील सभागृहात सोहम योगाभ्यास मंडळाच्यावतीने महिला दिनाच्या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. यावेळी देशातील महान पराक्रमी महिलांची वेशभूषा परिधान करून त्यांचे पात्र हुबेहुब सादर करीत त्यांच्या कार्याचा गौरव केला. या भरगच्च कार्यक्रमाला शेकडो महिला-पुरूषांची उपस्थिती होती.

कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी चित्रा ठवरे होत्या. प्रमुख अतिथी तथा सोहम योगाभ्यास मंडळाचे अध्यक्ष तसेच नवनिर्वाचित स्थायी समिती सभापती अविनाश मार्डीकर, नगरसेवक मंगेश मनोहरे, अर्चना पाटील, डॉ. मधुरा काहाळे, माजी उपमहापौर संध्या टिकले यांची प्रामुख्याने उपस्थिती होती. कार्यक्रमाच्या प्रास्ताविकामध्ये कल्पना चौधरी यांनी सोहम योगाभ्यास मंडळाच्या कार्याचा आढावा सादर केला.

कार्यक्रमादम्यान महिलांनी देशातील महान कार्य करणाऱ्या महिलांच्या वेशभूषा सादर केल्या. देशातील पहिली महिला शिक्षिका सावित्रीबाई फुले यांची वेशभूषा सुरेखाताई देशमुख, अहिल्याबाई होळकर यांची वेशभूषा ज्योतीताई शेलोटकर, पहिल्या महिला डॉक्टर आनंदीबाई जोशी यांची वेशभूषा ज्योतीताई शिरभाते, राजमाता जिजाऊ यांची वेशभूषा रंजना जुमळे, माता रमाई यांची वेशभूषा अनिताताई जवंजाळ, हिरकणीची वेशभूषा सिमाताई वानखडे, प्रियदर्शनी इंदिरा गांधी यांची वेशभूषा मोना काळे, माजी केंद्रीय मंत्री सुषमा स्वराज यांची वेशभूषा अर्चना उमाळे, सावित्रीबाई यांची वेशभूषा नाईकताई, मै मेरी झांसी नही दूंगी म्हणत वैशाली चांदूरकर यांनी सुंदर सादरीकरण केले. अंगणवाडी सेविका म्हणून वयोवृध्द मंदाताई कुळकर्णी आणि जनाबाईच्या वेशभूषेत सुंदर सादरीकरण योगिता बावनेर यांनी सादर करून उपस्थितांची वाहवाह मिळविली. कार्यक्रमाचे बहारदार संचालन उमा शेरेकर यांनी केले.

याप्रसंगी उपस्थित मान्यवरांनी आपल्या भाषणातून महिला दिनानिमित्त महिलांचा गौरव करीत शुभेच्छा दिल्या. याप्रसंगी नवनियुक्त मनपा स्थायी समिती सभापती अविनाश मार्डीकर, वेशभूषेत सहभागी सर्व महिला आणि कार्यक्रमाचे मुख्य आयोजक तथा सोहम योगाभ्यास मंडळाचे योगगुरू दिलीप शेलोटकार यांचा सत्कार करण्यात आला. कार्यक्रमाचे आभार प्रदर्शन अर्चना इंगळे व भस्मेताई यांनी केले. कार्यक्रमाला परिसरातील महिला व पुरूष मोठ्यासंख्येने उपस्थित होते.

# नेरपिंगळाई-आखतवाडा-नया वाठोडा रस्त्यावरील पुलाच्या बांधकामाचे भूमिपूजन

### -आमदार राजेश वानखडे यांच्या हस्ते शुभारंभ -दोन गावांना जोडणाऱ्या पुलामुळे विकासाला नवी गती

अमरावती/प्रतिनिधीः- जिल्ह्यातील मोर्शी तालुक्यातील नेरपिंगळाई–आखतवाडा–नया वाठोडा रस्त्यावरील पुलाच्या बांधकामाचे भूमिपूजन आज आमदार राजेश वानखडे यांच्या हस्ते उत्साहात संपन्न झाले. या पुलाच्या उभारणीमुळे परिसरातील नागरिकांच्या दीर्घकाळ प्रलंबित असलेल्या मागणीला अखेर मूर्त स्वरूप मिळाले आहे.वनविभागाच्या परवानगी अभावी सदर पुलाचे कार्य रखडले होते. आमदार राजेश वानखडे यांचे मंत्रालयीन स्तरावरील यशस्वी पाठपुराव्यामुळे वनविभागाची परवानगी प्राप्त करून नागरिकांची बहुप्रतिक्षित मागणी निमित्ताने पूर्ण झालेली आहे हे विशेष.

आखतवाडा व नया वाठोडा या दोन गावांना जोडणारा हा पूल अत्यंत महत्त्वाचा मानला जात असून या मार्गामुळे दोन्ही गावांतील नागरिकांची वाहतूक अधिक सुलभ होणार आहे. विशेषतः पावसाळ्यात नागरिकांना येणाऱ्या अडचणी मोठ्या प्रमाणात कमी होण्यास मदत होणार आहे. तसेच या पुलामुळे दोन्ही गावे मुख्य रस्त्याशी थेट जोडली जाणार असून शिक्षण, आरोग्य, बाजारपेठ तसेच दैनंदिन कामकाजासाठी नागरिकांना मोठा दिलासा मिळणार आहे.

या भूमिपूजन कार्यक्रमाला प्रदिप गौरखेडे, प्रकाश कनेर, पद्माकर पाकोडे, मंडळ अध्यक्ष विकास तट्टे, मंगेश बोंडे, शरद मोहोड,बाबाराव धोटे, विनोद ठाकरे, राजू इंगळे, विजय गाडगे, लिहिदा सरपंच देवकुमार बुरगे पवन घोरमाडे, सचिन कोकाटे, वर्षाताई गाडगे, सोनाली नवले, सरपंच सुनिल भडके, सरपंच कल्पना कुरवाडे, संजय टेकाडे, सागर माहोरे, गौरव मडके, पुरुषोत्तम कुरवाडे,धिरज चौधरी,आदी उपस्थित होते.

## १ व १० वरिल उर्वरित

### ३ कोटींच्या 'एमडी'चा मोठा

आहे. या दोघांकडून एमडीची मोठी खेप जप्त करण्यात आल्याने परिसरात खळबळ उडाली आहे. गुन्हे शाखेचे पोलिस निरीक्षक संदीप चव्हाण यांना मिळालेल्या गुप्त माहितीच्या आधारे ही कारवाई करण्यात आली. लालखडी परिसरातून अमली पदार्थांची मोठी खेप शहरात येणार असल्याची माहिती मिळताच पोलिसांनी लालखडी–सुकळी वनारसी मार्गावर नाकाबंदी करत सापळा रचला. संशयास्पद हालचाली करणाऱ्या दोन युवकांना पोलिसांनी ताब्यात घेतले. तपासणीदरम्यान आरोपींकडील बॅगची झडती घेतली असता त्यामध्ये २ किलो ८० ग्रॅम एमडी आढळून आले. पोलिसांनी तात्काळ अमली पदार्थ जप्त करून दोघांना अटक केली. या अमली पदार्थाचा वापर प्रामुख्याने युवकांमध्ये पार्टी ड्रग्स म्हणून होत असल्याने शहरात त्याचा पुरवठा होण्यापूर्वीच पोलिसांनी मोठा साठा जप्त केले आहे. सध्या पोलिसांकडून आरोपींची सखोल चौकशी सुरू असून, एमडीची ही खेप नेमकी कुठून आली, शहरात कोणाकडे पोहोचवायची होती आणि या मागे कोणते मोठे जाळे कार्यरत आहे, याचा तपास सुरू आहे. या प्रकरणातून आणखी काही संशयितांची नावे समोर येण्याची शक्यता पोलिसांनी व्यक्त केली आहे. ही कारवाई पोलिस आयुक्त राकेश ओला, उपायुक्त गणेश शिंदे, श्याम घुगे व रमेश धुमाळ यांच्या मार्गदर्शनाखाली पार पडली. पोलिस निरीक्षक संदीप चव्हाण यांच्या नेतृत्वात सहायक पोलिस निरीक्षक महेश इंगोले, अमोल कडू, वाकोडे, अतुल संभे यांच्यासह गुन्हे शाखेच्या पथकाने ही कारवाई यशस्वी केली.

### कृत्रिम वाळू प्रकल्पांना सवलती

आली होती. मात्र, शासन निर्णयानुसार ही अट आता शिथिल करण्यात आली असून, जिल्ह्यातील भौगोलिक परिस्थिती आणि प्राप्त अर्जांची संख्या विचारात घेऊन ही संख्या वाढवण्यात येणार आहे. जिल्हाधिकारी कार्यालयाने इच्छुक नागरिकांना आणि खदानधारकांना अर्ज करण्याचे आवाहन केले आहे. अर्ज पद्धत ही ऑनलाईन अर्जासोबतच आवश्यक कागदपत्रांसह ऑफलाईन पद्धतीने देखील अर्ज सादर करणे आवश्यक आहे. अर्जाची छाननी झाल्यानंतर जिल्हाधिकारी कार्यालयामार्फत 'हेतू पत्र' निर्गमित केले जाणार आहे. आवश्यक कागदपत्रांची पूर्तता केल्यानंतर युनिट स्थापन करण्याची अंतिम परवानगी दिली जाईल. नैसर्गिक वाळूची कमतरता भरून काढण्यासाठी आणि पर्यावरणाचा समतोल राखण्यासाठी जिल्ह्यातील उद्योजकांनी या धोरणाचा लाभ घ्यावा, असे आवाहन प्रशासनातर्फे करण्यात आले आहे.

### चिखलऱ्यात 'तांडव'; बच्चू कडूंच्या

या गावांमधून पुढे सरकत सलोना येथे दाखल झाली. मार्गातील प्रत्येक गावात आदिवासी बांधवांनी संघर्ष यात्रेचे जल्लोषात स्वागत करत आपल्या समस्या बच्चू कडूंसमोर मांडल्या.

सलोना येथे आज यात्रेचा मुक्काम राहणार असून उद्या सकाळी हजारो आदिवासी बांधवांसह ही महापदयात्रा थेट चिखलदऱ्याकडे कूच करणार आहे. या वेळी मेळघाटातील विविध गावांमधून मोठ्या संख्येने लोक आंदोलनात सहभागी होणार असल्याचे सांगितले जात आहे.

**आता शासनस्तरावर लढाई-** या महापदयात्रेदरम्यान अनेक गावांमधील पाणी, रस्ते, आरोग्य सुविधा, वीज, शिक्षण आणि रोजगारासारख्या जिल्हा पातळीवरील अनेक प्रश्नांवर प्रशासनाकडून तातडीने निर्णय घेण्यात आले. मात्र मेळघाटातील काही महत्त्वाचे प्रश्न अजूनही शासनस्तरावर प्रलंबित असल्याने त्यासाठी आता चिखलदरा येथे ठीय्या आंदोलन करण्यात येणार आहे.

बच्चू कडू यांनी स्पष्ट शब्दांत सांगितले आहे की,'मेळघाटातील आदिवासी बांधवांच्या प्रश्नांकडे वर्षानुवर्षे दुर्लक्ष झाले आहे. आता आम्ही थांबणार नाही. शासनाने ठोस निर्णय घेतला नाही तर चिखलदरा येथील आंदोलन अधिक तीव्र होईल.'

**प्रशासन अलर्ट; पोलीसांचा मोठा बंदोबस्त-** उद्याच्या आंदोलनाची तीव्रता लक्षात घेता अमरावती ग्रामीण पोलीस दलासह प्रशासन अलर्ट मोडवर गेले आहे. चिखलदरा परिसरात मोठ्या प्रमाणावर पोलीस बंदोबस्त तैनात करण्यात आला असून आंदोलनाच्या पार्श्वभूमीवर परिस्थितीवर बारकाईने लक्ष ठेवले जात आहे.

मेळघाटातील हजारो आदिवासी बांधवांच्या सहभागामुळे हे आंदोलन केवळ स्थानिक प्रश्नांपुरते मर्यादित राहणार नसून मेळघाटच्या अस्तित्वाची लढाई म्हणून उद्या चिखलदऱ्यात संघर्षाचे तांडव पाहायला मिळण्याची चिन्हे आहेत.

### जागतिक महिला दिनी उत्कृष्ट

गर्ल्स हायस्कुल चौक मार्ग परिसर स्थित मातोश्री विमलाबाई देशमुख सभागृहात विभागीय अभियंता विज राज्य परिवहन, अमरावती तसेच विभागीय कार्यालय विभागीय कार्यशाळा व सर्व आगारातील महिला कर्मचारी यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित जागतिक महिला दिन २०२६ कार्यक्रमात त्या उदघाटक म्हणून बोलत होत्या. राज्य परिवहन अमरावती, विभाग नियंत्रक - निलेश बेलसरे यांच्या अध्यक्षतेत झालेल्या या कार्यक्रम याप्रसंगी व्यासपीठावर ॲड. नीलिमा राऊत, जिल्हा नियोजन अधिकारी - वर्षा भाकरे, लाच लुचपत प्रतिबंधक विभाग, अमरावती पोलीस निरीक्षक चित्रा मेसरे, प्रादेशिक व्यवस्थापक स. नि. स. क्रमांक - ५ रोहन पलंगे, आदी उपस्थित होते. तर प्रमुख उपस्थितीत माजी खेळाडू - योगिता जीवन वानखडे, एसटी बँकेच्या कनिष्ठ अधिकारी - शुभांगी तितरमारे, मीनल विपीन जोग, राधिका संदीप रायलवार, विभागीय अभियंता विज, राज्य परिवहन, अमरावती विनादेवी गायकवाड आदी उपस्थित होते. सर्वप्रथम राष्ट्रमाता राजमाता माँ जिजाऊ तसेच क्रांतीज्योती सवित्रीमाई फुले यांच्या प्रतिमेस अतिथी मान्यवरांनी नमन - वंदन - पूजन - माल्यार्पण केल्यानंतर कार्यक्रमाला सुरुवात झाली. जागतिक महिला दिनाचे औचित्य साधून कार्यक्रमाला उदघाटक म्हणून उपस्थित असलेल्या आमदार सुलभा खोडके यांचा आयोजकांच्या वतीने राज्य परिवहन महामंडळाच्या रणरागिनींनी शाल - श्रीफळ - पुष्पगुच्छ देऊन सत्कार केला. याप्रसंगी अमरावती जिल्ह्यातील सर्व आगारातील उत्कृष्ट वाहक म्हणून सर्वोत्तम कामगिरी बजावीणाऱ्या महिला वाहक भगिनींचा अतिथी मान्यवरांच्या हस्ते स्मुर्तीचिन्ह देऊन सत्कार करण्यात आला. जागतिक महिला दिना निमित्याने दरवर्षी प्रमाणे यंदाही सांस्कृतिक कार्यक्रमाचे भव्य आयोजन करण्यात आले होते. यादरम्यान राज्य परिवहन महामंडळाच्या महिला भगिनींनी आपल्या अंगीभूत कलाकौशल्याचा परिचय करून देत उपस्थितांच्या समक्ष सर्वोत्कृष्ट प्रदर्शन करीत त्यांनी टाळ्यांची दाद मिळवली. कार्यक्रमाचे सुत्रसंचालन विनादेवी गायकवाड यांनी तर प्रास्ताविक शीतल मोहोड यांनी केले. कार्यक्रमाअंती सर्व उपस्थितांचे वर्षा ठाकरे यांनी आभार मानले. याप्रसंगी राज्य परिवहन महामंडळाचे सर्व अधिकारी, कर्मचारी तसेच परिवार सदस्य मोठ्या संख्येने उपस्थित होते.

### मोर्शीतून कार लंपास करणाऱ्या

माहिती पोलिसांना मिळाली. त्यानुसार गुन्हे शाखेच्या पथकाने सापळा रचून दोघांना ताब्यात घेतले. प्राथमिक चौकशीत आरोपींनी दिशाभूल करण्याचा प्रयत्न केला. मात्र पोलिस चौकशीत त्यांनी मोर्शी येथून इंडिका व्हिस्टा कार चोरी केल्याची कबुली दिली. आरोपींनी चोरी केलेली कार नवसारी रिंग रोडजवळील हजरत मौला काढा शॉपच्या मागील मोकळ्या मैदानात लपवून ठेवल्याचे सांगितले. अटक करण्यात आलेले आरोपी शाहरुख शहा सादिक शहा (वय ३०, रा. तळेगाव मोहना, ता. चांदूर बाजार, सध्या फातेमा नगर, लालखडी, अमरावती) आणि तौसिफ खान तमीज खान (वय २८, रा. हाजरा नगर, अमरावती) अशी त्यांची नावे आहेत. पोलिसांनी आरोपींकडून चोरीची इंडिका व्हिस्टा कार (७५ हजार रुपये), गुन्ह्यात वापरलेली इंडिगो कार (२ लाख रुपये) तसेच दोन मोबाईल (२० हजार रुपये) असा एकूण २.९५ लाख रुपयांचा मुद्देमाल पंचासमक्ष जप्त केला. ही कारवाई पोलीस अधीक्षक विशाल आनंद व अतिरिक्त पोलीस अधीक्षक पंकज कुमावत यांच्या मार्गदर्शनाखाली स्थानिक गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक किरण वानखडे यांच्या नेतृत्वात पोउनि नितीन इंगोले, पोहेकॉ सुनील महात्मे, सय्यद अजमत, स्वप्निल तंवर, चेतन दुबे, निलेश डांगोरे, चालक प्रशिक वानखडे तसेच सायबर पोलिसांचे सागर धापड, विकास अंजिकर, अश्विन मानकर, रितेश गोसावी यांनी पार पाडली. दरम्यान, दोन्ही आरोपींना पुढील तपासासाठी मोर्शी पोलिसांच्या ताब्यात देण्यात आले आहे.

### मोर्शीत एकात्मिक प्रशासकीय

इमारतीची पाहणी केली. याप्रसंगी खासदार डॉ. अनिल बोंडे, अमर काळे, आमदार उमेश उर्फ चंदू यावलकर, राजेश वानखडे, नगराध्यक्ष प्रतीक्षा गुल्हाने, ईश्वर सलामे, सुवर्णा वरखडे, जिल्हाधिकारी आशिष येरेकर, उपविभागीय अधिकारी प्रदीपकुमार पवार आणि तहसीलदार सागर ढवळे यांसह अनेक मान्यवर उपस्थित होते. यावेळी मार्गदर्शन करताना पालकमंत्री बावनकुळे म्हणाले की, मोर्शी येथील या नवीन इमारतीची रचना अत्यंत उत्तम असून, नागरिकांना विनाविलंब आणि पारदर्शक सेवा देणे हेच प्रशासनाचे मुख्य उद्दिष्ट असावे. शासन सध्या अधिकारी-कर्मचाऱ्यांचे आकृतिबंध अंतिम करत असून, पात्र व्यक्तींना पदोन्नती देऊन प्रशासन अधिक गतिमान केले जात आहे. 'गतिमान शासन, पारदर्शी प्रशासन' हे सूत्र घेऊन महसूल विभाग काम करीत आहे. शासनाने 'जीवंत सातबारा' लागू केला असून छत्रपती शिवाजी महाराज राजस्व अभियान शिबिरांच्या माध्यमातून विविध योजनांचा लाभ एकाच ठिकाणी दिला जात आहे. तसेच, मुख्यमंत्री बळीराजा पाणंद रस्ता योजनेतून शेतकऱ्यांसाठी रस्ते, पाणी आणि वीज या मूलभूत सुविधा प्राधान्याने उपलब्ध करून दिल्या जात आहेत.

मोर्शी शहरात पिण्याच्या पाण्यासाठी टाकी बांधण्यासाठी निधी दिला जाईल. येथील घनकचऱ्याच्या निर्मूलनावर काम केले जाईल. शहराचे सीटीएस करून दिले जाईल. यामुळे येथील रहिवाशांच्या मालमत्तेला कायदेशीर आधार मिळेल शिवाय शहराचा नकाशा अधिकृतरित्या अद्ययावत होईल. तसेच तालुक्यातील घरकुल पट्टेवाटपही लवकरच केले जाईल, असे पालकमंत्री बावनकुळे यांनी सांगितले.

ही नवीन प्रशासकीय इमारत सर्व सोयी-सुविधांनी युक्त आहे. ही इमारत १२.८० कोटी रुपये खर्चून २७२८.४ चौरस मीटर क्षेत्रफळात उभारण्यात आली आहे. इमारतीच्या तळमजल्यावर तहसील आणि दुय्यम निबंधक कार्यालय, पहिल्या मजल्यावर उपविभागीय अधिकारी, कृषी विभाग, उपकोषागार आणि सहाय्यक निबंधक कार्यालय तर दुसऱ्या मजल्यावर मीटिंग हॉलसह महिला व बालकल्याण विभाग कार्यरत असणार आहे. सर्व कार्यालये आता एकाच ठिकाणी आल्यामुळे नागरिकांची होणारी भटकंती थांबणार असून प्रशासकीय कामात मोठी गती येणार आहे. कार्यक्रमाचे प्रास्ताविक तहसीलदार सागर ढवळे यांनी केले, तर यावेळी मान्यवरांच्या हस्ते शासन निर्णय संग्रहाचे विमोचनही करण्यात आले.

### सुरगाव परिसरात बिबट्याच्या

होण्याची भीती व्यक्त केली जात आहे.

दरम्यान, ही माहिती मिळताच सुरगावच्या पोलिस पाटील यांनी तातडीने वनविभागाला भ्रमणध्वनीद्वारे कळविले. मात्र रात्री उशिरापर्यंत वनविभागाचा कोणीही अधिकारी किंवा कर्मचारी घटनास्थळी पोहोचला नसल्याची माहिती मिळाली आहे.

पोलिस पाटील यांनी नागरिकांना सावध राहण्याचे आवाहन करत रात्रीच्या वेळी त्या परिसरात अनावश्यक फिरकू नये, तसेच बिबट्याच्या हालचालींबाबत सतर्क राहावे, असे सांगितले आहे.

### आज पासून सर्व शिक्षाचे कर्मचारी

गेली होती. या सर्व कर्मचाऱ्यांकडे विद्यार्थ्यांची गुणवत्ता सुधार व विद्यार्थ्यांना शाळेच्या मुख्य प्रवाहात आणण्याचे महत्वाचे काम आहे, यासह शिक्षण विभागाची माहिती संकलन, बांधकाम, प्रशिक्षण, शाळा तपासणी, असे अनेक कामे आहेत. असे असतांना मागील १५ वर्षांपासून संघटनेच्या माध्यमातून सेवेत कायम करावे ही मागणी शासनकडे लाऊन धरली आहे.

**हिवाळी अधिवेशनात मुख्यमंत्र्यांनी दिले होते आश्वासन-** नुकतेच नागपूर येथील हिवाळी अधिवेशनात समग्र च्या कर्मचाऱ्यांनी मोठे आंदोलन उभारले होते. आठवडाभर चाललेल्या या आंदोलनात तीन हजारावर कर्मचारी सहभागी होत अन्नत्याग केला होता. त्यावेळी मुख्यमंत्री यांनी आचार सहिता संपताच कायम करणार असे स्वतः आश्वासन देत उपोषण सोडविले होते. परंतु त्यांनतर ही काम थंड बस्त्यात गेल्याने समग्रच्या कर्मचाऱ्यांनी आझाद मैदान गाठण्याचे ठरविले असल्याची माहिती संघर्ष समितीचे राज्य सचिव विवेक राऊत यांनी सांगितले आहे.

**समग्र चे काम बंद -** याच अभियानातील निम्मे कर्मचारी जे दिव्यांग विद्यार्थ्यांसाठी काम करीत आहे त्यांना मात्र मागील युती च्या शासनात मुख्यमंत्री एकनाथ शिंदे सरकारने कायम केले असून त्यांचा नियमित पगार सुद्धा सुरू झाले आहेत. असे असतांना याच अभियानातील उच्च शिक्षित कर्मचारी कायमच्या प्रतीक्षेत आहे. त्यामुळे आता कायम शिवाय मागे हटायचे नाही असा निर्धार करीत काम बंद करण्याचा इशारा दिला आहे. याचा परिणाम समग्रच्या बजेट वर, तसेच विविध प्रशिक्षण, विविध योजना, ऑनलाइन कामे, शाळांत परीक्षा, इत्यादी कामावर होणार आहे.

### पोकलँड मशीनचे २.५० लाखांचे

ब्रेकर रिलीफ वॉल, स्वीग मोटर वॉल यासारखी महत्वाची पाट्‌र्स गायब असल्याचे समोर आले. या सर्वांची एकूण किंमत अंदाजे २.५० लाख रुपये असल्याचे सांगितले जाते. तसेच, २५ हजार रुपयांचे डिजेलचे नुकसानही नोंदवले गेले. दीपक यांनी आरोपींची शोधाशोध केली, परंतु ते अद्याप सापडले नाहीत. त्यामुळे त्यांनी बडनेरा पोलीस ठाण्यात तक्रार दाखल केली. पोलीसांनी तक्रारीनुसार अंकितकुमार, विकासकुमार आणि पवन तुरी यांच्याविरुद्ध गुन्हा नोंदवला असून सध्या तपास सुरू आहे.

### आराधना मॉलमधील चोरीचा

दोन्ही काउंटरचे लॉक तुटलेले व सामान अस्ताव्यस्त पडलेले दिसले. अज्ञात चोरट्याने काउंटरमधून सुमारे ४२ हजार रुपयांचा मुद्देमाल चोरून नेल्याचे निदर्शनास आले.

या प्रकरणी नांदगावपेठ पोलीस ठाण्यात गुन्हा क्र. ७८/२०२६ कलम ३३१ (४), ३०५ (अ), ३३४ भारतीय न्याय संहिता अन्वये गुन्हा दाखल करून तपास सुरू करण्यात आला.तपासादरम्यान पोलिसांनी सीसीटीव्ही फुटेज, तांत्रिक तपास व गोपनीय माहितीच्या आधारे आरोपी विशाल उर्फ यश यादव डोंगरे (वय २२, रा. शेंदोळा धस्कट, ता. तिवसा, जि. अमरावती) याचा शोध लावला. पोलिसांनी शिताफीने पाठलाग करून आरोपीला ताब्यात घेतले. विश्वासात घेऊन चौकशी केली असता त्याने बिझीलँड मार्केटमधील आराधना फॅशन मॉलमध्ये चोरी केल्याची कबुली दिली.

आरोपीच्या ताब्यातून चोरी गेलेला मुद्देमाल तसेच गुन्ह्यात वापरलेली मोटारसायकल जप्त करण्यात आली. पुढील तपासात आरोपीने अप. क्र. २७/२०२६ मधील आणखी एक चोरीचा गुन्हा केल्याचेही कबूल केले. त्यामुळे पोलिसांनी दोन चोरीचे गुन्हे उघडकीस आणत अंदाजे १.२० लाख रुपयांचा मुद्देमाल हस्तगत केला आहे.

ही कारवाई पोलीस आयुक्त राकेश ओला, पोलीस उपायुक्त (परिमंडळ-१) गणेश शिंदे, सहायक पोलीस आयुक्त (फ्रेजरपुरा विभाग) कैलास पुंडकर यांच्या मार्गदर्शनाखाली नांदगाव पेठचे पोलीस निरीक्षक दिनेश दहातोंडे यांच्या नेतृत्वात डिबी पथकाचे पोउपनि. गणेश राऊत, पोहेकॉ. राजाभाऊ राऊत, पोका. राजीक खान, निलेश साविकार, शोएबुद्दिन सय्यद, वैभव तिखीले, अमित ढोले व वैभव धुरंदर यांनी यशस्वीरीत्या पार पाडली.

### विजयनगरमध्ये तरुणीचा गूढ

पथक घटनास्थळी दाखल झाले. पोलिसांनी परिसराची पाहणी करत पुरावे गोळा करण्यासाठी फॉरेन्सिक पथक, फिंगरप्रिंट तज्ज्ञ आणि श्वान पथकाला पाचारण केले. घटनास्थळी सखोल तपासणी करण्यात आली. दरम्यान, तरुणीचा मृतदेह पुढील तपासणीसाठी जिल्हा सामान्य रुग्णालयात शवविच्छेदनासाठी पाठविण्यात आला आहे. कांचन धाकडे यांचे लग्न निश्चित झाले होते. या घटनेची माहिती तिच्या होणाऱ्या पती आनंद साहबराव सावते (रा. कामरगाव, ता. कारंजा, जि. वाशीम) यांना देण्यात आली आहे. या घटनेमुळे परिसरात विविध चर्चांना उधाण आले असून तरुणीच्या मृत्यूचे नेमके कारण शवविच्छेदन अहवालानंतर स्पष्ट होणार आहे. या प्रकरणाचा पुढील तपास राजापेठ पोलीस करीत आहेत.

# जनमाध्यम

अकोला । वाशिम । बुलडाणा

■ सोमवार, ९ मार्च २०२६ ■ मूल्य ३.०० ■ पृष्ठे ४

एक प्रतिष्ठित सवय

paper : www.janmadhyam.com
mail : Jmakola.thakur@gmail.com


# शाळेच्या जीर्ण इमारतीकडे शिक्षण विभागाची डोळेझाक ?

## – बेलोरा येथील प्राथमिक शाळेची दुरावस्था
## – विद्यार्थ्यांचा जीव धोक्यात

**■ प्रतिनिधी | मानोरा ■**

**तालुक्यातील बेलोरा येथील जिल्हा परिषदेच्या प्राथमिक शाळेची दुरावस्था झाली असून इमारत अत्यंत धोकादायक झाली आहे. जीव धोक्यात घालून विद्यार्थी या शाळेत शिक्षण घेत आहेत. सदर धोकादायक इमारतिचे निर्लेखन करून पंधरा दिवसाच्या आत नवीन बांधकाम चालू न केल्यास पंचायत समिती मानोरा येथे बेमुदत उपोषण करणार असल्याचा इशारा बेलोरा येथील सामाजिक कार्यकर्ते विशाल ठाकरे यांनी गट विकास अधिकारी यांना दिलेल्या निवेदनातून दिला आहे.**



पंचायत समिती, मानोरा व ग्रामपंचायत विठोली अंतर्गत येणाऱ्या बेलोरा गावातील जिल्हा परिषद शाळेची इमारत सन १९८६ मध्ये बांधण्यात आलेली असून, सध्या ही इमारत अत्यंत जीर्ण अवस्थेत आहे. इमारतीला चारही बाजूंनी मोठे तडे गेले असून, वरच्या स्लॅबलादेखील मोठ्या स्वरूपाचे तडे पडले आहेत. त्यामुळे ही इमारत कधीही कोसळण्याची शक्यता असून, लागूनच असलेल्या शाळेत शिक्षण घेणाऱ्या विद्यार्थ्यांचा जीव धोक्यात आला आहे.

अशा धोकादायक परिस्थितीतही विद्यार्थी जीव धोक्यात घालून शिक्षण आहे. मागील अनेक दिवसांपासून गावकऱ्यांकडून नवीन शाळा इमारत बांधून देण्याची मागणी करण्यात आली होती, मात्र शासन व प्रशासनाकडून याबाबत दखल घेण्यात आलेली नाही. या इमारतीमुळे विद्यार्थ्यांच्या जिवाला बरे वाईट झाल्यास याला पूर्णपणे प्राथमिक शिक्षण विभाग जबाबदार राहील असे निवेदनात नमूद केले आहे. जीर्ण अवस्थेत असलेल्या शाळा इमारतीच्या स्लॅपचा काही भाग काही दिवसांपूर्वी कोसळला आहे. बेलोरा येथील जिल्हा परिषद शाळेची जीर्ण झालेली इमारत येत्या पंधरा दिवसाच्या आत दि. २०/०३/२०२६ पर्यंत इमारत पाडून नवीन इमारतीचे बांधकाम सुरु न केल्यास दि. २३/०३/२०२६ रोजी पंचायत समिती समोर करणार आमरण उपोषण करणार असे निवेदन गटाविकास अधिकारी मानोरा, पोलीस स्टेशन मानोरा व ग्रा. पं. कार्यालय विठोली यांना सामाजिक कार्यकर्ते विशाल ठाकरे बेलोरा यांनी दिले आहे.

# जागतिक महिला दिनानिमित्त 'स्वच्छता सप्ताह'
## ग्राम स्वच्छता महिला मंडळाचा उपक्रम

**■ प्रतिनिधी | वाशिम ■**

जागतिक महिला दिनाचे औचित्य साधून वाशिम जिल्ह्यातील भूली (तालुका मानोरा) या गावातील ग्राम स्वच्छता महिला मंडळातील सुमारे ५० महिलांच्या वतीने जिल्ह्यात स्वच्छता सप्ताह राबविण्यात आला. या सप्ताह अंतर्गत त्यांनी बुधवारी (दि.५) येथील जिल्हाधिकारी कार्यालय आणि जिल्हा परिषद परिसराची स्वच्छता केली.

यावेळी जिल्हाधिकारी योगेश कुंभेजकर आणि जिल्हा परिषदेचे मुख्य लेखा वित्त अधिकारी योगेश क्षीरसागर यांनी त्यांचे स्वागत करून या उपक्रमाबद्दल शुभेच्छा दिल्या. ग्रामस्वच्छता महिला मंडळाच्या वतीने जागतिक महिला दिनाचे औचित्य साधून १ ते ८ मार्च दरम्यान 'स्वच्छता सप्ताह' राबविण्याचा संकल्प करण्यात आला आहे. या अभियानास १ मार्च रोजी तीर्थक्षेत्र धामणगाव देव येथील मुंगसाजी महाराज संस्थान



परिसरातून उत्साहात प्रारंभ करण्यात आला. भुली ग्राम पंचायतीच्या पोलिस पाटील तथा ग्रामस्वच्छता महिला मंडळाच्या अध्यक्षा छाया अरुण डहाके यांच्या नेतृत्वाखाली महिलांनी यात्रेनिमित्त परिसरात साचलेला कचरा हटवून स्वच्छतेचा संदेश दिला. महिलांनी स्वतः झाडू हाती घेत स्वच्छतेची जबाबदारी स्वीकारत सामाजिक बांधिलकीचे प्रेरणादायी उदाहरण घालून दिले. स्वच्छता सप्ताहांतर्गत भुली गावासह विविध सार्वजनिक ठिकाणी स्वच्छता मोहीम राबविण्यात येत आहे. २ मार्च रोजी होळी सणानिमित्त सावरगाव (कान्होबा) यात्रा स्थळी सुमारे दोन एकर परिसर स्वच्छ करून या महिलांनी पर्यावरण संवर्धनाचा संदेश दिला. जिल्हा परिषदेचे मुख्य लेखा व वित्त अधिकारी योगेश क्षिरसागर यांच्या हस्ते महिलांना माँ जिजाऊ यांची प्रतिमा भेट देऊन त्यांना गौरविण्यात आले. यावेळी ग्रामीण पाणीपुरवठा विभागाचे कार्यकारी अभियंता अजिंक्य वानखडे, जिल्हा परिषदेचे लेखा अधिकारी सु. ब. जाधव, एकात्मिक बाल विकास प्रकल्प अधिकारी मदन नायक, जल जीवन मिशनचे शंकर आंबेकर, राम श्रृंगारे, अभय तायडे समाधान खरात यांची उपस्थिती होती.

# विमाशि संघाचे मंगळवारी धरणे आंदोलन
## शिक्षकांनी बहुसंख्येने उपस्थित राहण्याचे आवाहन

**■ प्रतिनिधी | वाशिम ■**

राज्यातील शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचार्यांच्या विविध प्रलंबित मागण्यांच्या पूर्ततेसाठी विदर्भ माध्यमिक शिक्षक संघाच्या वतीने विमाशी संघाचे सरकार्यवाह तथा आ. सुधाकर अडबाले व माजी आमदार व्हि. यू. डायगव्हाणे यांच्या नेतृत्वात वाशीम शिक्षणाधिकारी कार्यालयासमोर मंगळवार दि. १० मार्च रोजी दुपारी ३ वाजता धरणे व निदर्शने आंदोलन करण्यात येणार आहे.

राज्यातील खाजगी, स्थानिक स्वराज्य संस्थांद्वारे संचालित प्राथमिक, माध्यमिक व उच्च माध्यमिक शाळा, खाजगी अनुदानित शाळा, विजाभज तसेच आदिवासी आश्रमशाळां मधील शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचाऱ्यांच्या प्रलंबित मागण्यांकडे शासनाने तातडीने लक्ष द्यावे, या मागणीसाठी हे आंदोलन आयोजित करण्यात आले आहे. या आंदोलनात शिक्षकांवर लादण्यात आलेली टिईटी परीक्षेची सक्ती रद्द करण्यात यावी, वाशीम जिल्ह्यातील शिक्षकांवर सामुहिक कॉपीप्रकरणी करण्यात आलेली प्रस्तावित कारवाई मागे घेण्यात यावी, शिक्षक शिक्षकेत्तर कर्मचारी व कर्मचाऱ्यांना सरसकट जुनी पेन्शन योजना लागू करावी, १ नोव्हेंबर २००५ पूर्वी नियुक्त परंतु नंतर १०० टक्के अनुदान मिळालेल्या कर्मचाऱ्यांना जुनी पेन्शन योजना देणे, शिक्षकेत्तर कर्मचाऱ्यांच्या पदभरतीवरील बंदी उठविणे, शिक्षकांची रिक्त पदे तात्काळ भरणे, शाळांना सातव्या वेतन आयोगावर आधारित १०० टक्के वेतनेत्तर अनुदान देणे, तसेच शिक्षकांना १०-२०-३० वर्षाची आश्वासित प्रगती योजना लागू करावी या व अन्य मागण्यांसाठी हे आंदोलन आयोजित करण्यात आले आहे.

तरी या आंदोलनाला जिल्ह्यातील बहुसंख्य शिक्षक-शिक्षकेत्तर कर्मचार्यांनी मोठ्या संख्येने सहभागी होण्याचे आवाहन विमाशी संघटनेचे विभागीय कार्यवाह बाळासाहेब गोटे, महाराष्ट्र राज्य माध्यमिक शिक्षक महामंडळाचे अध्यक्ष विनायक उज्जैनकर, मुख्याध्यापक संघाचे जिल्हाध्यक्ष विनोद नरवाडे, सचिव विजय शिंदे, विमाशि संघाचे जिल्हाध्यक्ष रामेश्वर अवचार, जिल्हा कार्यवाह कुलदीप बदर, कार्याध्यक्ष विजय भड, शिक्षकेतर संघाचे अध्यक्ष कैलास ढवळे, सचिव रामराव कायंदे, यांचेसह सर्व जिल्हा व तालुका पदाधिकार्यांनी केले आहे.

## आरो फिल्टर व वॉटर कुलरची नागरिकांसाठी सुविधा

**मानोरा :** पंचायत समिती, मानोरा अंतर्गत येणाऱ्या आदर्श ग्रामपंचायत सोमठाणा गावातील सर्व नागरिकांना पिण्यासाठी शुद्ध जल मिळावे याकरिता आरो फिल्टर व वॉटर कुलरची सुविधा उपलब्ध करण्यात आली आहे. सरपंच टीनुताई विनय ठाकरे यांच्या खास प्रयत्नाने व ग्रामपंचायत उपसरपंच, सदस्य यांच्या सहकार्याने गावातील नागरिकांसाठी सदर सुविधा उपलब्ध केल्याबद्दल प्रशंसा केली जात आहे. अशुद्ध पाण्यामुळे जेष्ठ नागरिक तथा लहान मुले, विद्यार्थी, महिला, नागरिक यांचे आजार बळावतात. त्यामुळे दवाखाना, मेडिकल आदींचा खर्च होतो त्यातच घरची परिस्थिती बेताची असल्यामुळे अनेक कुटूंबाना शुद्ध व थंड जल घेणे शक्य होत नाही. याबाबीचा विचार करून व जनतेच्या हितासाठी सोमठाणा सरपंच टीनुताई ठाकरे यांनी निर्धार केला.

# वाशिम जिल्हा कुस्ती निवड चाचणी ११ मार्चला
## राज्यस्तरीय स्पर्धेसाठी खेळाडूंची होणार निवड

**■ प्रतिनिधी | वाशिम ■**

महाराष्ट्र राज्य कुस्तीगीर संघाच्या वतीने आयोजित करण्यात येणाऱ्या वरिष्ठ गट राज्यस्तरीय गादी व माती अजिंक्यपद कुस्ती स्पर्धा तसेच 'महाराष्ट्र केसरी' किताब लढत २०२५–२६ साठी वाशिम जिल्ह्यातील खेळाडूंची निवड चाचणी ११ मार्च रोजी वाशिम येथे आयोजित करण्यात आली आहे.

वाशिम जिल्हा कुस्तीगीर असोसिएशनच्या वतीने ही निवड चाचणी बजरंगबली हिंदू आखाडा, वाशिम येथे पार पडणार असून सकाळी ९ ते १२ या वेळेत खेळाडूंचे वजन होईल. त्यानंतर दुपारी १२.३० वाजता कुस्ती स्पर्धेला प्रारंभ होणार आहे.

या निवड चाचणीतून पात्र ठरणाऱ्या खेळाडूंना १८ ते २२ मार्च २०२६ दरम्यान बावोली, ता. हवेली, जि. पुणे येथे होणाऱ्या राज्यस्तरीय गादी व माती अजिंक्यपद कुस्ती स्पर्धेत वाशिम जिल्ह्याचे प्रतिनिधित्व करण्याची संधी मिळणार आहे. स्पर्धेसाठी ५७, ६१, ६५, ७०, ७४, ७९, ८६, ९२, ९७ किलो तसेच महाराष्ट्र



केसरी (८६ ते १२५ किलो) असे विविध वजन गट निश्चित करण्यात आले आहेत. सहभागी होणाऱ्या खेळाडूंनी दोन पासपोर्ट साईज फोटो तसेच आधार कार्डाची मूळ व झेरॉक्स प्रत सोबत आणणे आवश्यक आहे. प्रत्येक मल्लाला नाश्त्यासाठी १०० रुपये देण्यात येणार असल्याची माहिती आयोजकांनी दिली.

वाशिम जिल्ह्यातील जास्तीत जास्त मल्लांनी या निवड चाचणीत सहभागी व्हावे, असे आवाहन वाशिम जिल्हा कुस्तीगीर असोसिएशनचे अध्यक्ष पै. नितीन चंद्रकांत मडके, सचिव, पै. ज्ञानेश्वर गाडेकर व पदाधिकाऱ्यांच्या वतीने करण्यात आले आहे.

## एसएमसी इंग्लिश स्कूलची गरुडझेप

**वाशिम :** स्थानिक एस. एम. सी. इंग्लिश स्कूलमधील विद्यार्थ्यांनी राज्यस्तरावर आपल्या यशाचा दबदबा निर्माण केला आहे. पारंपरिक शिक्षणासोबतच व्यावसायिक कौशल्यातही नैपुण्य मिळवत या शाळेने विविध गटात तब्बल १५ राज्यस्तरीय पुरस्कार पटकावले आहेत. संस्थाध्यक्ष प्रा. हरिभाऊ क्षीरसागर यांच्या मार्गदर्शनाखाली आणि मुख्याध्यापिका मीना उबगडे यांच्या पुढाकाराने, शाळेत यंदापासून 'वरसाटईल एजुकेर सिस्टम, मुंबई' (VES) मार्फत व्यावसायिक अभ्यासक्रम सुरू करण्यात आले आहेत. महाराष्ट्र राज्य शैक्षणिक संशोधन परिषद (पुणे) आणि महाराष्ट्र राज्य कौशल्य, व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण मंडळ (मुंबई) यांची मान्यता असलेल्या या अभ्यासक्रमांतर्गत विद्यार्थ्यांनी हे यश मिळवले.

# स्व. माधूरी माधवराव पाटील यांचे मरणोत्तर नेत्रदान



**■ प्रतिनिधी | वाशिम ■**

मौजे. निमजगा वाशिम येथील डॉ. रविंद्र माधवराव पाटील यांची आई यांचा आज रोजी दि. ८ मार्च रोजी सकाळी ०७.१७ वाजता निधन झाले. त्यांच्या मागे बराच मोठा आप्त परिवार आहे तसेच संपुर्ण पाटील कुंटुबातील आधारस्तंभ तथा सर्वाना सोबत घेऊन चालणाऱ्या तसेच समाजकार्याची आवड असलेल्या स्व. माधूरी माधवराव पाटील यांचे निधन झाल्याने संपुर्ण पाटील कुटुंबावर दुःखाचा डोंगर उभा असताना पाटिल कुंटुबीयांनी एवढया दुखामध्येही मुत्यनंतर दोन अंधाच्या जीवनात प्रकाश निर्माण करण्यासाठी नेत्रदान करण्याची इच्छा हि भगवान मडके यांचे कडे व्यक्त केली. त्यानुसार जिल्हा सामान्य रुग्णालयाचे जिल्हा शल्य चिकित्सक डॉ. अनिल कावरखे, अति. जिल्हा शल्य चिकित्सक डॉ. अविनाश पुरी, नेत्र शल्यचिकित्सक, डॉ. आशिष बेदरकर, यांच्या मार्गदर्शनाखाली नेत्र चिकित्सा अधिकारी ज्ञानेश्वर पोटफोडे व नेत्रदान समुपदेशक रमेश ठाकरे यांनी स्व. माधूरी माधवराव पाटील यांची नेत्र बुबुळे काढली व नेत्र बुबुळे त्याच दिवशी वैद्यकिय महाविद्यालय, अकोला येथे पाठविण्यात आली. तरी सदरील नेत्रदान करण्याकरीता अभिजीत पाटील, राम पाटील, जितेंद्र पाटील, नंदूभाऊ वानखेडे, ऋषिकेष भांदुर्गे, रवी इंगोले, मनोज भूरकूसे, विरंद्र वानखेडे, धनंजय कान्हेढ, मिलिंद आटोटे, पार्थ पाटील, वेदांत पाटील, ओम पाटील व पाटील कुंटुबांचे सहकार्य लाभले. तरी सर्व समाजातील गणमान्य व्यक्तींनी या नेत्रदान चळवळीत सक्रीय सहभाग घेवुन नेत्रदान चळवळ ही लोक चळवळ व्हावी. मृत्यूनंतर जवळच्या व्यक्तीचे त्वरीत नेत्रदान घडवून आणावे.

# चिठ्ठीद्वारे (लॉटरी पद्धतीने) ५० लाभार्थींची निवड होणार

**■ प्रतिनिधी | वाशिम ■**

साहित्यरत्न लोकशाहीर अण्णाभाऊ साठे विकास महामंडळ मर्या., वाशिम जिल्हा कार्यालयामार्फत थेट कर्ज योजनेअंतर्गत लाभार्थी निवडीची प्रक्रिया लॉटरी पद्धतीने करण्यात येणार आहे. या योजनेअंतर्गत प्रकल्पाची मर्यादा एक लाख रुपये ठेवण्यात आली आहे.

या योजनेसाठी प्राप्त झालेल्या एकूण ८८ कर्ज मागणी अर्जांपैकी लाभार्थी निवड समितीने तपासणीअंती ८२ अर्ज पात्र ठरविले असून ०६ अर्ज अपात्र ठरविण्यात आले आहेत. पात्र अर्जदारांमध्ये ५२ पुरुष व ३० महिलांचा समावेश आहे. यापैकी लॉटरी पद्धतीने २५ पुरुष व २५ महिला अशा एकूण ५० लाभार्थ्यांची निवड करण्यात येणार आहे. लाभार्थी निवड समितीचे अध्यक्ष तथा निवासी उपजिल्हाधिकारी यांच्या मान्यतेनुसार ही निवड प्रक्रिया दि. १७ मार्च २०२६ रोजी दुपारी १ वाजता डॉ. बाबासाहेब आंबेडकर सामाजिक न्याय भवन, चिखली रोड, वाशिम येथे चिठ्ठीद्वारे (लॉटरी पद्धतीने) पार पडणार आहे.

पात्र अर्जदारांची यादी महामंडळाच्या कार्यालयाच्या सूचना फलकावर प्रसिद्ध करण्यात आली असून संबंधित अर्जदारांनी याची नोंद घ्यावी. तसेच जिल्ह्यातील सर्व पात्र अर्जदारांनी या बैठकीस उपस्थित राहावे, असे आवाहन साहित्यरत्न लोकशाहीर अण्णाभाऊ साठे विकास महामंडळाचे जिल्हा व्यवस्थापक दिनेश पखमोडे यांनी केले आहे.

# सैनिक बॉबी वैद्य यांचे त्रिरत्न बुद्ध विहारासाठी ५०,०५१ रुपयांचे धम्मदान

**■ प्रतिनिधी | वाशिम ■**

समाजाबद्दल कृतज्ञता ठेवत समाजासाठी काहीतरी देण्याची भावना जपणारे खिर्डा येथील जवान बॉबी भिमराव वैद्य यांनी त्रिरत्न बुद्ध विहाराच्या बांधकामासाठी ५०,०५१ रुपयांचे धम्मदान देऊन आदर्श निर्माण केला आहे.

भारतीय सैन्यात महार रेजिमेंटमध्ये जनरल ड्यूटी पदावर कार्यरत असलेले बॉबी वैद्य सध्या अरुणाचल प्रदेश येथे चीन सीमेवर देशसेवा बजावत आहेत. गेल्या सात वर्षांपासून ते सैन्यात कार्यरत आहेत. दि. ६ मार्च रोजी डॉ. बाबासाहेब आंबेडकर जयंती नियोजना संदर्भात बैठक घेण्यात आली होती. या वेळी देशसेवेबरोबरच समाजाप्रती असलेली बांधिलकी जपत सैनिक



बॉबी वैद्य यांनी आपल्या वडिलांच्या कालकथीत भिमराव मानाजी वैद्य यांच्या स्मृतिप्रीत्यर्थ खिर्डा येथील त्रिरत्न बुद्ध विहाराच्या बांधकामासाठी ५०,०५१ रुपयांचे धम्मदान सर्व समाजबांधवां समोर रोख रक्कम देऊन केले. डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी दिलेल्या 'शिका, संघटित व्हा आणि संघर्ष करा' या विचारांप्रमाणे समाजाची जाणीव ठेवून समाजासाठी योगदान देणे आवश्यक आहे, या भावनेतून बॉबी वैद्य यांनी हे कार्य केले. त्यांच्या या सामाजिक उपक्रमामुळे परिसरात त्यांचे सर्वत्र कौतुक होत आहे.

देशसेवा करत असतानाही समाजासाठी योगदान देण्याचा आदर्श त्यांनी घालून दिल्याने युवकांमध्येही प्रेरणा निर्माण होत आहे. त्यांच्या या कार्याबद्दल खिर्डा येथील बौद्ध उपासक व उपासिकांनी त्यांचे अभिनंदन केले आहे.

# विद्याभारती शाळेत जागतिक महिला दिन उत्साहात साजरा



**■ प्रतिनिधी | वाशिम ■**

विद्याभारती शाळा वाशिम येथे ८ मार्च रोजी जागतिक महिला दिन उत्साहपूर्ण वातावरणात साजरा करण्यात आला. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी शाळेचे मुख्याध्यापक नितेश मिटकरी सर तर प्रमुख पाहुणे शाळेचे पर्यवेक्षक विजय गोटे व कांचन कापसे तसेच शाळेतील सर्व महिला शिक्षिका यांची उपस्थिती होती. कार्यक्रमाची सुरुवात मान्यवरांच्या हस्ते दीपप्रज्वलन व थोर महिलांच्या प्रतिमेच्या पूजनाने झाली. यानंतर सर्व महिला शिक्षिका व विद्यार्थिनींचे फूल पुष्पगुच्छ देऊन स्वागत करण्यात आले. या प्रसंगी शाळेतील विद्यार्थ्यांनी महिला सक्षमीकरण, स्त्रीशक्तीचे महत्त्व आणि समाजातील महिलांचे योगदान यावर भाषणे कविता आणि गीतांच्या माध्यमातून आपले विचार व्यक्त केले. यावेळी शिक्षिका तसेच प्रमुख पाहुण्या कांचन कापसे, कीर्ती कुलकर्णी, पद्मिनी खराटे यांनी समाजातील योगदान अधोरेखित करत विद्यार्थ्यांना महिलांचा आदर करण्याचा व त्यांच्या प्रगतीसाठी सहकार्य करण्याचा संदेश दिला.

# ६१ कोटींच्या पाणीपुरवठा पाईपलाईनच्या पार्श्वभूमीवर नव्याने सुरू असलेली रस्त्यांची कामे तात्काळ थांबवा!

## नगरसेवक गणेश अहिर यांची मागणी

**■ प्रतिनिधी | मालेगाव ■**

मालेगाव शहरात शासनामार्फत अंदाजे ६१ कोटी रुपयांच्या पिण्याच्या पाण्याच्या पाईपलाईन योजनेचे काम सुरू असताना शहरातील विविध भागांमध्ये नव्याने रस्ते बांधकामाची कामे सुरू करण्यात येत असल्यामुळे शासनाच्या निधीचा अपव्यय होण्याची शक्यता निर्माण झाली आहे त्यामुळे सध्या सुरू असलेली रस्त्यांची कामे तात्काळ थांबविण्यात यावीत व नवीन कामांना मंजुरी देऊ नये, अशी मागणी नगरसेवक गणेश रामप्रसाद अहिर यांनी केली आहे. याबाबत त्यांनी मुख्याधिकारी, नगरपंचायत मालेगाव यांना लेखी तक्रार अर्ज दिला आहे या अर्जामध्ये त्यांनी नमूद केले आहे की, मालेगाव शहरात शासनामार्फत मोठ्या प्रमाणावर पिण्याच्या पाण्याच्या पाईपलाईन टाकण्याचे काम सुरू असून ही योजना शहराच्या दृष्टीने अत्यंत महत्त्वाची आहे मात्र अशा परिस्थितीत नगरपंचायत प्रशासनाकडून शहरातील विविध भागांमध्ये नव्याने रस्ते बांधकामाची कामे सुरू केली जात आहेत सदर रस्ते नव्याने तयार झाल्यानंतर पाईपलाईन टाकण्यासाठी



पुन्हा तेच रस्ते खोदावे लागणार असल्याने शासनाचा लाखो रुपयांचा निधी वाया जाण्याची शक्यता आहे त्यामुळे आधी पाईपलाईनचे काम पूर्ण करून त्यानंतर रस्ते बांधकामाची कामे करण्यात यावीत, अशी मागणीही त्यांनी केली आहे सध्या शहरातील अनेक भागांमध्ये गटार व्यवस्था अपूर्ण असून सांडपाणी रस्त्यावर वाहत आहे, रस्ते चिखलमय व धोकादायक बनले आहेत, त्यामुळे नागरिकांच्या आरोग्याच्या समस्या निर्माण होत आहेत अशा परिस्थितीत मूलभूत समस्या सोडविण्याऐवजी घाईघाईने रस्ते बांधकाम करणे म्हणजे जनतेची दिशाभूल व शासन निधीचा अपव्यय करण्याचा प्रयत्न असल्याची भावना नागरिकांमध्ये निर्माण झाली आहे, असेही अहिर यांनी नमूद केले आहे. तसेच शहरात सुरू असलेली कामे तात्काळ बंद करण्यात यावीत, अन्यथा शासन निधीचा अपव्यय होत असल्याबाबत जनहित याचिका दाखल करण्याचा इशाराही त्यांनी दिला आहे या तक्रारीची प्रत जिल्हाधिकारी, तहसीलदार मालेगाव आणि पोलिस स्टेशन मालेगाव यांनाही पाठविण्यात आली आहे.

## महिला दिनानिमित्त आदिशक्ती सदाचार सभेचा स्तुत्य उपक्रम

**कारंजा :** जागतिक महिला दिनाचे औचित्य साधून आदिशक्ती सदाचार सभा, यशोदा नगर कारंजा (लाड) यांच्या वतीने स्वर्गीय सारिका होनराव यांच्या स्मृतीप्रित्यर्थ मानोरा रोडवरील माऊली दूध डेरी येथे पाणपोईचे लोकार्पण करण्यात आले. हा समाजोपयोगी उपक्रम शनिवार, दि. ७ मार्च रोजी उत्साहात पार पडला.

या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी विश्वमांगल्य सभा वाशिम जिल्हा संघटक मनीषा जोशी या होत्या. कार्यक्रमाला प्रमुख पाहुण्या म्हणून वाशिम जिल्हा बालसभा संयोजिका वृशाली लकरस, विश्वमांगल्य सभा कारंजा (लाड) अध्यक्षा चारुलता अतुल एकघरे, प्रभाग क्रमांक ७ मधील नवनिर्वाचित नगरसेविका शालिनी ठाकरे व ज्योती राठोड उपस्थित होत्या. स्व. सारिका होनराव यांच्या मोठ्या बहिणी सुलोचना होनराव व होनराव परिवाराच्या हस्ते फीत कापून पाणपोईचे लोकार्पण करण्यात आले.

जनमाध्यम
एक प्रतिष्ठित सवय

# भारत विश्वविजेता !

## घरच्या मैदानावर टी-२० विश्वचषक जिंकणारा पहिलाच संघ







## कोट्यवधी भारतीयांचे स्वप्न साकार !


अहमदाबादच्या नरेंद्र मोदी स्टेडियमवर सूर्यकुमार यादवच्या नेतृत्वाखालील टीम इंडियाच्या धुरंधरांनी इतिहास रचला आहे. जगातील सर्वात मोठ्या स्टेडियमवर रंगलेल्या फानयलमध्ये न्यूझीलंडला पराभूत करत गत चॅम्पियन भारतीय संघाने विक्रमी तिस-यांदा टी-२० वर्ल्ड कप ट्राफी उंचावण्याचं स्वप्न साकार केले. टी-२० वर्ल्ड कपच्या आतापर्यंतच्या इतिहासात कोणत्याही संघाला सलग दोन वेळा ही स्पर्धा जिंकता आली नव्हती. एवढेच नाही तर यजमानपद भुषवताना ट्राफी जिंकणारी टीम इंडिया पहिली टीम ठरली आहे. ग्च धोनी आणि रोहित शर्मानंतर सूर्यकुमार यादव हा भारतीय संघाला टी-२० वर्ल्ड कप स्पर्धेत चॅम्पियन करणारा तिसरा कर्णधार ठरला.टी-२० वर्ल्ड कपच्या यंदाच्या हंगामात सुरुवातीपासून टीम इंडिया जेतेपदाची प्रबळ दावेदार होती. सुपर ८ फेरीतील दक्षिण आफ्रिकेविरुद्धच्या एका पराभवामुळे टीम इंडिया 'जर तर'च्या समीकरणात फसते की, काय? अशी परिस्थितीही निर्माण झाली होती. पण ज्या मैदानाती पराभवामुळे टीम इंडियासंदर्भात उलट सुलट चर्चा रंगल्या त्याच मैदानात टीम इंडियाने न्यूझीलंडला पराभूत करत ऐतिहासिक जेतेपद पटकावले. फायनलमध्ये न्यूझीलंडच्या संघाचा कर्णधार मिचेल सँटनर याने नाणेफेक जिंकून पहिल्यांदा गोलंदाजी करण्याचा निर्णय घेतला होता. भारताच्या आघाडीच्या फलंदाजांनी त्याचा हा निर्णय फोल ठरवला. संजू सॅमसन आणि अभिषेक शर्माने तुफान फटकेबाजीचा नजराणा पेश करताना न्यूझीलंडच्या गोलंदाजांची धुलाई केली. त्यानंतर ईशान किशनचा जलवा पाहायला मिळाला. अखेरच्या षटकात शिवम दुबेच्या प?वर हिटिंगच्या जोरावर टीम इंडियाने निर्धारित २० षटकात ५ विकेट्सच्या मोबदल्यात २५५ धावा करत न्यूझीलंडसमोर २५६ धावांचे टार्गेट सेट केले होते. भारतीय संघाने दिलेल्या डोंगराऐवढ्या धावसंख्येचा पाठलाग करताना न्यूझीलंडच्या संघाकडून टिम सिफर्ट वगळता कुणालाही धमाकेदार खेळी करता आली नाही.

## भारताच्या ऐतिहासिक विजयाचे 5 शिल्पकार

**आयसीसी टी-२० वर्ल्डकप स्पर्धेत भारतीय संघाने सुरूवातीपासूनस चॅम्पियनसारखा खेळ केला. स्पर्धेतील अंतिम सामना भारत आणि न्यूझीलंड या दोन्ही संघांमध्ये पार पडला. या सामन्यातही भारतीय संघाने चॅम्पियनसारखा खेळ केला. अहमदाबादच्या नरेंद्र मोदी स्टेडियमवर पार पडलेल्या सामन्यात भारतीय संघाने न्यूझीलंडसमोर विजयासाठी २५६ धावांचे आव्हान ठेवले होते. या आव्हानाचा पाठलाग करताना न्यूझीलंडला १५९ धावांपर्यंत मजल मारता आली. हा सामना भारताने ९६ धावांनी आपल्या नावावर केला.**



**संजू सॅमसन-** संजू सॅमसनला या स्पर्धेतील काही मोजकेच सामने खेळण्याची संधी मिळाली. पण या सर्व सामन्यांमध्ये संजू सॅमसनने आपली छाप सोडली. वेस्ट इंडिजविरूद्ध झालेल्या सुपर ८ फेरीतील शेवटच्या सामन्यात नाबाद ९७ धावांची खेळी केली होती. त्यानंतर इंग्लंडविरूद्ध झालेल्या सेमी फायनलच्या सामन्यात त्याने ८९ धावांची खेळी केली होती. या दोन्ही सामन्यात त्याला शतक झळकावण्याची संधी होती. पण ही संधी थोडक्यात हुकली होती. अंतिम सामन्यातही त्याला शतक झळकावण्याची संधी होती. पण ८९ धावांवर फलंदाजी करत असताना मोठा फटका खेळण्याच्या प्रयत्नात तो बाद होउन माघारी परतला. हे त्याचं या स्पर्धेतील लागोपाठ तिसरं अर्धशतक ठरलं.



**इशान किशन-** इशान किशन या सामन्यात तिस-या क्रमांकावर फलंदाजी करण्यासाठी आला होता. अभिषेक शर्मा बाद होउन माघारी परतल्यानंतर इशान किशनने संजू सॅमसनसोत मिळून डाव सांभाळला. दोघांनी मिळून १०० हून अधिक धावांची भागीदारी केली. इशानने २५ चेंडूत ४ चौकार आणि ४ षटकारांच्या साहाय्याने ५४ धावांची खेळी केली.



**शिवम दुबे-** टी-२० क्रिकेटमध्ये शिवम दुबेची भूमिका अतिशय महत्वाची ठरते. इंग्लंडविरूद्ध झालेल्या सामन्यात त्याने चौथ्या क्रमांकावर फलंदाजीला येउन ४३ धावांची वादळी खेळी केली होती. न्यूझीलंडविरूद्धच्या सामन्यात त्याला सातव्या क्रमांकावर फलंदाजीला येण्याची संधी मिळाली. शेवटच्या षटकांमध्ये फलंदाजी करताना त्याने ८ चेंडूत ३ चौकार आणि २ षटकारांच्या साहाय्याने नाबाद २६ धावांची खेळी केली.



**जसप्रीत बुमराह-** फलंदाजांनी आपलं काम योग्यरित्या पूर्ण केलं होतं. त्यामुळे सर्व जबाबदारी गोलंदाजांवर होती. आव्हान मोठं होतं. पण न्यूझीलंडच्या ताफ्यातही एकापेक्षा एक स्फोटक फलंदाज होते. त्यांना लवकर बाद केलं नसतं. तर टीम इंडियाचं टेन्शन वाढलं असतं. त्यामुळे सूर्यकुमार यादवने जसप्रीत बुमराहला लवकर गोलंदाजीला बोलवलं. बुमराहने पहिल्याच चेंडूवर रचिन रवींद्रला बाद करत माघारी धाडलं. बुमराहने या सामन्यात गोलंदाजी करताना ४ षटकात १५ धावा खर्च करून ४ गडी बाद केले.



**अक्षर पटेल-** अक्षर पटेल हा भारतीय संघाच्या ऐतिहासिक विजयाचा खरा अनसंग हिरो ठरला. गेल्या सामन्यात २ भन्नाट कॅच पकडून भारताचा विजय खेचून आणणा-या अक्षरला या सामन्यात फलंदाजीला येण्याची संधी मिळाली नाही. पण गोलंदाजी करताना त्याने न्यूझीलंडला लागोपाठ धक्के दिले. आधी फिन ॲलेनला अवघ्या ९ धावांवर झेलबाद करून माघारी धाडलं. त्यानंतर ग्लेन फिलिप्सची दांडी गुल केली. अक्षरने या सामन्यात ३ गडी बाद केले.

## फायनलमध्ये विक्रमी 255 धावा केल्या, न्यूझीलंडचा 96 धावांनी पराभव

**नवी दिल्ली/वृत्तसंस्था :** भारताने न्यूझीलंडला हरवून तिस-यांदा टी-२० विश्वचषक जिंकला. सलग दोनदा टी-२० विश्वचषक जिंकणारा भारत हा पहिला संघ ठरला. यजमान संघाने टी-२० विश्वचषक जिंकण्याची ही पहिलीच वेळ आहे. रविवारी अहमदाबाद येथील नरेंद्र मोदी स्टेडियमवर झालेल्या सामन्यात न्यूझीलंडने नाणेफेक जिंकून गोलंदाजीचा निर्णय घेतला. टी-२० विश्वचषक फायनलमध्ये भारताने प्रथम फलंदाजी करताना विक्रमी २५५ धावा केल्या.

संजू सॅमसनने ८९ धावा केल्या, जी टी-२० विश्वचषक फायनलमधील सर्वोच्च धावसंख्या आहे. ईशान किशनने ५४ आणि अभिषेक शर्माने ५२ धावा केल्या. अखेर शिवम दुबेने ८ चेंडूत २६ धावा केल्या. न्यूझीलंडकडून जिमी नीशमने तीन विकेट घेतल्या. लक्ष्याचा पाठलाग करणा-या न्यूझीलंडची सुरुवात खराब झाली. सेफर्ट (५२) आणि कर्णधार सँटनर (४३) वगळता इतर कोणताही फलंदाज भारतीय गोलंदाजांसमोर टिकू शकला नाही. संपूर्ण संघ




१९ षटकांत १५९ धावांवर बाद झाला. धावांच्या बाबतीत न्यूझीलंडला टी-२० विश्वचषकातील अंतिम सामन्यात सर्वात मोठा पराभव पत्करावा लागला.

**भारताच्या टॉप-३ फलंदाजांनी अर्धशतक झळकावले-** नाणेफेक गमावल्यानंतर फलंदाजी करणा-या भारताने दमदार सुरुवात केली. पॉवरप्लेमध्ये संघाने विकेट न गमावता ९२ धावा केल्या. संघाने १५ षटकांत २०० धावांचा टप्पा ओलांडला. तथापि, १६ व्या षटकात जिमी नीशमने कर्णधार सूर्यकुमार यादव (०), ईशान किशन (५४ धावा) आणि संजू सॅमसन (८९ धावा) यांना बाद करून भारताच्या धावगतीवर ब्रेक लावला. शेवटच्या पाच षटकांत संघाला फक्त५२ धावा करता आल्या, त्यापैकी २४ धावा २० व्या षटकातून आल्या.

**भारतीय डावात खास विक्रम नोंदवले-** संघाने ७.२ षटकांत १०० धावा पूर्ण केल्या आणि टी-२० विश्वचषक नॉकआउट फेरीत संघाकडून सर्वात जलद १०० धावा करण्याचा विक्रम केला. भारतीय संघाने पावरप्लेमध्ये सर्वाधिक विश्वचषक धावसंख्या देखील नोंदवली. याआधीचा विक्रम २०२४ च्या विश्वचषकात ९२/१ होता. सॅमसनने टी-२० विश्वचषकाच्या अंतिम सामन्यात सर्वाधिक धावा करणारा फलंदाज बनला आहे आणि त्याने वेस्ट इंडिजच्या मार्लन सॅम्युअल्सचा ८५ धावांचा विक्रम मागे टाकला आहे.

**अभिषेक शर्मा ५२ धावा काढून पॅव्हेलियनमध्ये परतला-** नाणेफेकीपूर्वी समारोप समारंभ पार पडला. यात आंतरराष्ट्रीय पॉप स्टार रिकी मार्टिन, सुखवीर सिंग आणि फाल्गुनी पाठक यांनी सादरीकरण केले.

**दोन्ही संघांची प्लेइंग-११**

**भारतः** संजू सॅमसन (यष्टीरक्षक), अभिषेक शर्मा, ईशान किशन, सूर्यकुमार यादव (कर्णधार), हार्दिक पंड्या, तिलक वर्मा, शिवम दुबे, अक्षर पटेल, अर्शदीप सिंग, जसप्रीत बुमराह आणि वरुण चक्रवर्ती.

**न्यूझीलंडः** फिन अलन, टिम सेफर्ट (यष्टीरक्षक), रचिन रवींद्र, ग्लेन फिलिप्स, मार्क चॅपमन, डॅरिल मिशेल, मिशेल सँटनर (कर्णधार), जेकब डफी, मॅट हेन्री, जिमी नीशम आणि लॉकी फर्ग्युसन.

## चीनला अखेर भारताची ताकद मान्य

### चीनेचे परराष्ट्र मंत्री वांग यी यांचे गौरवोद्गार



**बीजिंग /वृत्तसंस्था :** भारत आणि चीन यांनी एकमेकांचे प्रतिस्पर्धी न बनता एकमेकांचे व्यापारातील भागीदार बनले पाहिजे, तसेच धोका नाही तर संधी म्हणून विचार केला पाहिजे, असे त्यांनी म्हटले आहे. पुढे बोलताना ते असे देखील म्हटले आहेत की, भारत आणि चीन हे दोन्ही देश एकमेकांचे महत्त्वपूर्ण शेजारी देश आहेत. दोन्ही देश ग्लोबल साउथचे सदस्य असून, दोन्ही देशांचे खोलवर सांस्कृतिक संबंध आणि व्यापक अशा स्वरुपाचे सामायिक हितसंबंध आहेत. चीनेचे परराष्ट्र मंत्री वांग यी यांनी भारत आणि चीनमधील सुधारत असलेल्या संबंधांबाबत मोठे विधान केले आहे. ते बीजिंगमध्ये आयोजित १४ व्या नॅशनल पीपल्स काँग्रेसच्या अधिवेशनादरम्यान आयोजित पत्रकार परिषदेत बोलत होते.

मध्य पूर्वेत मोठा तणाव निर्माण झाला आहे, भीषण युद्ध सुरू आहे. या युद्धाचा फटका केवळ अमेरिका, इस्त्रायल आणि इराण या देशांनाच बसत नाहीयेत, तर जगभरातील अनेक देशांना या युद्धाचा प्रत्यक्ष, अप्रत्यक्ष फटका बसत आहे. या युद्धाच्या तडाख्यामधून भारत, चीन सारखे देश देखील सुटले नाहीये. जर युद्ध आणखी काही दिवस सुरूच राहिले तर इंधन टंचाई निर्माण होण्याची भीती सतावत आहे. दरम्यान एकीकडे युद्ध सुरू आहे तर दुसरीकडे आता चीनमधून मोठी बातमी समोर आली आहे.

शिन्हुआ न्यूज एजन्सीने दिलेल्या माहितीनुसार पत्रकारांच्या प्रश्नांना उत्तर देताना भारत चीन संबंधांवर बोलताना चीनचे परराष्ट्र मंत्री वांग यी यांनी मोठं विधान केलं आहे. भारत आणि चीनच्या संबंधांवर बोलताना त्यांनी म्हटले की भारत आणि चीन हे एक महत्त्वाचे शेजारी देश आहेत. दोन्ही देशांमध्ये खोलवर सांस्कृतिक संबंध आणि व्यापक अशा स्वरुपाचे सामायिक हितसंबंध आहेत. दोन्ही देशांमध्ये असलेला परस्पर विश्वास, भागीदारी हे एकमेकांच्या विकासासाठी पुरक असल्याचं यावेळी वांग यी यांनी म्हटले आहे. मात्र दोन्ही देशांमधील संघर्ष आणि प्रतिस्पर्धा ही आशिया खडांच्या विकासावर प्रतिकूल परिणाम घडवून आणू शकते असेही त्यांनी यावेळी म्हटले आहे.

गेल्या वर्षी भारताचे पंतप्रधान नरेंद्र मोदी आणि चीनचे राष्ट्रपती शी जिनपिंग यांची भेट झाली होती. या भेटीमुळे आता भारत आणि चीनचे संबंध आणखी मजबूत झाले आहेत. यावेळी पंतप्रधान नरेंद्र मोदी आणि चीनचे राष्ट्रपती शी जिनपिंग यांची अनेक विषयांवर चर्चा झाली. दोन्ही देशांदरम्यान असलेल्या व्यापाराने आता एक नवी उंची गाठली आहे असेही यावेळी चीनने म्हटले आहे.

## भारतीयांना 'एअर लिफ्ट' करण्यासाठी अतिरिक्त विमाने

**नवी दिल्ली/वृत्तसंस्था :** पश्चिम आशियातील सद्यस्थितीच्या पार्श्वभूमीवर, एअर इंडिया, एअर इंडिया एक्स्प्रेस आणि इंडिगो आपल्या प्रवाशांच्या सुरक्षिततेसाठी आणि सोयीसाठी महत्त्वाची पावती दिली आहे. जेद्दाह आणि मस्कत ही शहरे विमान प्रवासासाठी सुरक्षित असल्याचे स्पष्ट करत, या ठिकाणची नियमित विमान सेवा सुरू राहणार असल्याचे कंपन्यांनी जाहीर केले आहे.विविध देशांत अडकलेल्या भारतीय प्रवाशांना मायदेशी परत आणण्यासाठी एअर इंडियाने कंबर कसली आहे. त्यानुसार ८ मार्च रोजी अबु धाबी, दुबई, मस्कत, रास अल-खैमाह आणि शारजाह येथून विशेष (नान-शेड्युल्ड) विमानांचे नियोजन करण्यात आले आहे. अडकलेल्या प्रवाशांना भारतात परत आणण्यासाठी एअर इंडियाने ८ मार्च रोजी अबू धाबी, दुबई, मस्कत, रास अल-खैमाह आणि शारजाह येथून ३० हून अधिक अतिरिक्त विमानांचे नियोजन केल्याचे म्हटलं आहे. दरम्यान, एअर इंडियाची युरोप आणि उत्तर अमेरिकेला जाणारी विमाने सुरक्षित पर्यायी मार्गांचा वापर करत असून, ही सेवा पूर्णपणे सुरळीत सुरू असल्याचे कंपनीने स्पष्ट केले आहे.एअर इंडिया दिल्ली आणि मुंबई ते दुबई दरम्यान अतिरिक्त नान-शेड्युल्ड विमाने चालवणार आहे. एअर इंडिया एक्सप्रेस भारत आणि युएईच्या शहरांदरम्यान (अबू धाबी, दुबई, रास अल खैमाह आणि शारजाह) ३० अतिरिक्तविमाने चालवेल. नल ८ मार्चपासून युरोपमधील प्रमुख ठिकाणांशी पुन्हा संपर्क जोडण्याचे नियोजन केले असून मध्य-पूर्वेतील ८ शहरांसाठी आपली विमान सेवा सुरू ठेवणार असल्याचे इंडिगो कंपनीने एक्सवरील




पोस्टमध्ये म्हटले आहे. इंडिगोने जाहीर केले आहे की, त्यांनी युरोपसाठी आपली विमान सेवा पुन्हा सुरू केली असून अमेरिका-इस्त्रायल-इराण संघर्षाच्या पार्श्वभूमीवर पश्चिम आशियातील आठ शहरांमधून कामकाज सुरू आहे.

**प्रवाशांना खबरदारीचा इशारा-** पश्चिम आशियातील बदलत्या परिस्थितीमुळे विमान सेवांच्या वेळापत्रकात ऐनवेळी बदल होउ शकतो. त्यामुळे प्रवाशांनी घराबाहेर पडण्यापूर्वी एअर इंडियाच्या अधिकृत वेबसाइटवर आपल्या विमानाची सद्यस्थिती तपासून घ्यावी, असे आवाहन करण्यात आले आहे. प्रवाशांच्या नोंदणीकृत भ्रमणध्वनी क्रमांकावरही कंपनीकडून वेळोवेळी अपडेट्स दिले जातील. अधिक माहितीसाठी प्रवासी २४ तास उपलब्ध असलेल्या संपर्क केंद्राशी संपर्क साधू शकतात.

**विमान सेवा विस्कळीतच-** अमेरिका-इस्त्रायल-इराण युद्धामुळे पश्चिम आशियातील विमान सेवा विस्कळीत झाली आहे. २८ फेब्रुवारीपासून बहरीन, दुबई, कुवेत आणि कतार यांसारख्या प्रमुख केंद्रांवरील विमाने मोठ्या प्रमाणात रद्द करण्यात आली होती. दरम्यान, आखाती देशांमधील एमिरेट्स, एतिहाद आणि कतार एअरवेज सारख्या प्रमुख विमान कंपन्यांनी मर्यादित प्रमाणात बचाव मोहिमेसाठी विमान सेवा पुन्हा सुरू केली आहे.

परराष्ट्र मंत्रालयाने म्हटले आहे की, आखाती आणि पश्चिम आशियाई प्रदेशातील हवाई क्षेत्र बंद असतानाही, देशी आणि परदेशी विमान कंपन्यांनी ५०,००० हू अधिक भारतीयांना सुरक्षितपणे परत आणले आहे. १ ते ७ मार्च दरम्यान, मध्य-पूर्व देशांमध्ये ट्रान्झिटमध्ये असलेल्या किंवा अल्पकालीन भेटीवर गेलेल्या ५२,००० हून अधिक भारतीयांनी मायदेशी परतले आहेत. यापैकी ३२,१०७ प्रवाशांनी भारतीय विमान कंपन्यांद्वारे प्रवास केला. येत्या काही दिवसांत आणखी विमानांचे नियोजन असल्याचे मंत्रालयाने स्पष्ट केले आहे. दिल्ली आणि मुंबई विमानतळांवर शनिवारी (दि. ७ मार्च) किमान १०० आंतरराष्ट्रीय विमाने रद्द करण्यात आली, असे वृत्त पीटीआयने दिले आहे. मुंबई विमानतळावरील ३५ उड्डाणे आणि ३६ आगमने , तर दिल्ली विमानतळावरील २२ उड्डाणे आणि १७ आगमने रद्द करण्यात आल्याचे कंपन्यांनी स्पष्ट केले आहे. दरम्यान, एअर इंडियाची बहरीन, दम्माम, दोहा, कुवेत आणि रियाध येथून येणारी आणि जाणारी सर्व नियोजित विमाने १३ मार्चपर्यंत रद्द राहणार आहेत. ज्या प्रवाशांचे बुकिंग रद्द झाले आहे, ते कोणत्याही अतिरिक्तशुल्काशिवाय भविष्यातील तारखेसाठी पुन्हा बुकिंग करू शकतात किंवा पूर्ण परतावा घेउ शकतात, असेही विमान कंपन्यांनी स्पष्ट केले आहे.

## इंधन 55 रूपयांनी महागले

**इस्लामाबाद :** मध्यपूर्वेतील वाढत्या तणावाचा परिणाम आता इंधनाच्या दरांवरही दिसू लागला आहे. पाकिस्तान सरकारने पेट्रोल आणि हाय-स्पीड डिझेलच्या किमतीत प्रति लिटर ५५ पाकिस्तानी रुपयांची वाढ केली आहे. ही वाढ आतापर्यंतची सर्वात मोठी दरवाढ मानली जात आहे. पाकिस्तानचे पेट्रोलियम मंत्री अली परवेज मलिक, उपपंतप्रधान व परराष्ट्र मंत्री इसहाक डार आणि वित्त मंत्री मुहम्मद औरंगजेब यांनी शुक्रवारी मध्यरात्री ही घोषणा केली. सरकारने देशात पेट्रोलियमचा पुरेसा साठा उपलब्ध असल्याचेही स्पष्ट केले आहे. दरवाढीनंतर पाकिस्तानमध्ये हाय-स्पीड डिझेलची डिपोपूर्व किंमत पुढील आठवड्यासाठी ३३५.८६ पाकिस्तानी रुपये प्रति लिटर निश्चित करण्यात आली आहे. यापूर्वी हा दर २८०.८६ रुपये प्रति लिटर होता. म्हणजेच सुमारे २० टक्क्यांची वाढ झाली आहे. त्याचप्रमाणे पेट्रोलची डिपोपूर्व किंमत २६६.१७ रुपयांवरून वाढवून ३२१.१७ रुपये प्रति लिटर करण्यात आली आहे. ही जवळपास १७ टक्क्यांची वाढ असल्याचे सांगितले जात आहे. पाकिस्तानी डान वृत्तपत्राच्या माहितीनुसार, पेट्रोलियम मंत्री अली परवेज मलिक यांनी सांगितले की, पश्चिम आशियातील सुरू असलेल्या संघर्षामुळे संपूर्ण प्रदेशात अनिश्चितता निर्माण झाली आहे. त्यामुळे जागतिक उर्जा पुरवठा आणि कच्च्या तेलाच्या किमतींवर परिणाम झाला आहे. हा संकटाचा काळ किती काळ टिकेल याबाबत सध्या कोणतीही स्पष्ट वेळमर्यादा नाही. सरकार परिस्थितीवर सतत लक्ष ठेवून असल्याचे सांगत त्यांनी पेट्रोलियम पदार्थांची साठेबाजी किंवा कृत्रिम टंचाई निर्माण करणा-यांवर कठोर कारवाई करण्याचा इशारा दिला.



## आंतरराष्ट्रीय कायदा आता संपुष्टात

### ● इराण-अमेरिका युद्धामुळे रशिया भडकला ● बोलावली पी-5 देशांची बैठक


**नवी दिल्ली/वृत्तसंस्था :** पश्चिम आशियातील आखाती देशांमध्ये परिस्थिती अत्यंत तणावपूर्ण आहे. अमेरिका आणि इस्त्राईलने इराणविरोधात सुरू केलेल्या युद्धामुळे संपूर्ण जगाची चिंता वाढली आहे. याचदरम्यान, आतापर्यंत या संघर्षापासून दूर राहणा-या रशियाने मोठी आणि परखड प्रतिक्रिया दिली आहे. आपण ज्या आंतरराष्ट्रीय कायद्याबाबत बोतलो तो आता जवळपास संपुष्टात आला आहे, असे रशियाने म्हटले आहे. तसेच या बिघडलेल्या वातावरणाच्या पार्श्वभूमीवर रशियाने राष्ट्रपती व्लादिमीर पुतीन यांच्या एका विधानाचा पुनरुच्चार केला आहे. यात पुतीन यांनी संयुक्त राष्ट्रांच्या सुरक्षा परिषदेतील पाच स्थायी सदस्यांची बैठक बोलावण्याचा सल्ला दिला होता.रशियामधील सरकारी वाहिनी रुसियाला दिलेल्या मुलाखतीत सरकारचे प्रवक्तेदिमित्री पेसकोव्ह यांनी सध्या अमेरिका



आणि इस्त्राइलने इराणविरोधात सुरू केलेल्या संघर्षाबाबत परखड विधान केलं आहे. ते म्हणाले की, आजच्या काळात ज्याला आंतरराष्ट्रीय कायदा म्हणायचे त्या बाबतचं सारं काही आम्ही गमावलं आहे. जर कायदाच वाचला नसेल तर कुणाला याचे नियम आणि तत्त्वांचं पालन करण्यास कसं सांगता येउ शकतं, असा सवालही पेसकोव्ह यांनी उपस्थित केला.यांनी सध्याची परिस्थिती स्पष्ट करण्यासाठी दे जुरे आणि दे फॅक्टो या दोन शब्दांचा उच्चार केला. या शब्दांचा अर्थ आंतरराष्ट्रीय कायदा हा कागदावर दिसू शकतो, पण वास्तवात याचं अस्तित्व राहिलेलं नाही.पेसकोव्ह म्हणाले की, आंततरराष्ट्रीय कायदे नेमके काय आहेत, हे आज जगात कुणीच स्पष्टपणे सांगू शकत नाही. अशा परिस्थितीत त्यांचं पालन करायला सांगणं ही बेईमानी आहे. पेसकोव्ह यांनी पुढे सांगितले की, कोरोनाची साख येण्यापूर्वी पुतीन यांनी रशिया, अमेरिका, चीन, फ्रान्स आणि ब्रिटन या जगातील पाच प्रमुख देशांनी एकत्र येउन जागतिक सुरक्षा आणि स्थैर्यावर चर्चा करावी, आजची परिस्थिती पाहता या प्रस्तावावर पुन्हा लक्ष देण्याची गरज आहे, असेही पेसकोव्ह म्हणाले.

## वर्षभरात देशातून सुमारे 34 हजार मुले बेपत्ता

**नवी दिल्ली/वृत्तसंस्था :** देशभरात मुलांच्या बेपत्ता होण्याचे आकडे चिंताजनक आहेत. महिला आणि बाल विकास मंत्रालयाच्या मिसिंग चिल्ड्रनच्या ताज्या अहवालानुसार, १ जानेवारी २०२५ ते ३१ जानेवारी २०२६ या कालावधीत देशात एकूण ३३,५७७ मुले बेपत्ता झाली. यापैकी ७,७७७ मुले अजूनही सापडलेली नाहीत. अहवालात नमूद केले आहे की, सर्वाधिक १९,१४५ मुले पश्चिम बंगालमध्ये बेपत्ता झाली. यापैकी १५,४६५ मुलांना शोधण्यात आले, तर ३,६८० मुले अजूनही सापडलेली नाहीत. मध्य प्रदेशात ४,२५६ मुले बेपत्ता झाली. यापैकी १,०५९ मुलांचा अजूनही शोध लागलेला नाही. या ६ राज्यांमध्ये एकाही मुलाच्या बेपत्ता होण्याची नोंद नाही नागालँड, अरुणाचल प्रदेश, मणिपूर, त्रिपुरा, गुजरात आणि लक्षद्वीप व दादरा नगर हवेलीमध्ये मुलांच्या बेपत्ता होण्याची कोणतीही तक्रार मिळालेली नाही.




**मैत्रिणीच्या घरी गेली, परत आलीच नाही-** अंबाला येथील १४ वर्षीय मुलगी ८ जानेवारी रोजी मैत्रिणीच्या घरी जात असल्याचे सांगून निघाली होती, पण परत आली नाही. बस स्टँडचे सीसीटीव्ही फुटेज मिळाले, ज्यात ती जाताना दिसली, पण पुढे कोणताही सुगावा लागला नाही. अशा प्रकारचे सर्वाधिक उदाहरणे आहेत.

**रागावून घरातून निघाली, अजूनही बेपत्ता-** अंबाला कॅन्टमध्ये ५ फेब्रुवारी रोजी मुलगी कुटुंबावर रागावून घरातून निघून गेली आणि परत आली नाही. बेपत्ता झाल्याचा गुन्हा दाखल आहे. वडील शहरात पत्रके वाटून लोकांना माहिती देण्याचे आवाहन करत आहेत. असे उदाहरणे दुस-य क्रमांकावर आहेत.

# जनमाध्यम

e paper www.janmadhyam.com

एक प्रतिष्ठित सवय

■ वर्धा ■ वर्षे १४ ■ अंक १०१ ■ सोमवार, ९ मार्च २०२६ ■ पृष्ठे ४ ■ मुल्य ३.०० रु.


### सत्तेच्या आड लपलेला विकृत चेहरा उघडा

## राष्ट्रवादीच्या नेत्यावर पॉक्सोचा गुन्हा; अल्पवयीन मुलीशी असभ्य वर्तनाचा संतापजनक आरोप

**वर्धा जनमाध्यम :** राजकारण आणि समाजसेवेचे आवरण चढवून समाजात मानसन्मान मिळवणाऱ्या एका तथाकथित नेत्याचा विकृत चेहरा उघडकीस आला आहे. राष्ट्रवादी काँग्रेस (अजित पवार गट) पक्षाचे प्रदेश उपाध्यक्ष तथा महाज्योतीचे माजी संचालक दिवाकर गमे (७८, रा. हिंगणघाट) यांच्याविरुद्ध अल्पवयीन मुलीशी असभ्य वर्तन केल्याप्रकरणी पुलगाव पोलिस ठाण्यात पॉक्सो कायद्यासह विविध कलमांखाली गुन्हा दाखल करण्यात आला असून पोलिसांनी त्यांना अटक केली आहे. या घटनेमुळे वर्धा जिल्ह्यात एकच खळबळ उडाली आहे.

पुलगाव पोलिसांकडे २१ वर्षीय तरुणीने दाखल केलेल्या तक्रारीनुसार, आरोपीने नोकरी मिळवून देण्याचे आमिष दाखवत अनेक वर्षे तिच्याशी असभ्य वर्तन केल्याचा गंभीर आरोप करण्यात आला आहे. पीडितेच्या कुटुंबाशी ओळख असल्याचा फायदा घेत आरोपीने विश्वास संपादन केला आणि त्याच विश्वासाचा गैरफायदा घेतल्याचा आरोप तक्रारीतून पुढे आला आहे.

तक्रारीनुसार, पीडितेने बारावी उत्तीर्ण झाल्यानंतर नीट कोचिंगच्या बहाण्याने आरोपीने तिला नाशिक येथे नेले होते. २०२१ पासून आरोपीकडून तिचा छळ सुरू असल्याचा आरोप करण्यात आला आहे. आरोपीच्या वर्तनाला कंटाळून पीडितेने काही महिन्यांपासून त्याच्यापासून अंतर ठेवण्याचा प्रयत्न केला. मात्र तरीही आरोपीकडून वारंवार फोन, अश्लील




संदेश आणि चित्रफित पाठविण्यात आल्याचे तक्रारीत नमूद आहे.

दिवाकर गमे यांची हिंगणघाट तालुक्यात शैक्षणिक संस्था असून ते अनेक वर्षांपासून अखिल भारतीय महात्मा फुले समता परिषद या संघटनेशी जोडलेले आहेत. सध्या ते विदर्भ अध्यक्ष आहेत. तसेच त्यांनी महाज्योतीचे संचालक म्हणूनही काम पाहिले आहे. जिल्ह्यातील राजकीय आणि सामाजिक क्षेत्रात त्यांचे नाव असल्याने या प्रकरणामुळे संतापाची लाट उसळली आहे.

पुलगाव पोलिसांनी गुन्हा दाखल करून आरोपीला अटक केली. न्यायालयात हजर केल्यानंतर न्यायालयाने त्यांना न्यायालयीन कोठडी सुनावली. पोलिसांनी आरोपीचा मोबाईल जप्त केला असून प्रकरणाचा सखोल तपास उपविभागीय पोलिस अधिकारी डॉ. वंदना कारखेले करीत आहेत.

या धक्कादायक प्रकरणामुळे समाजसेवेच्या नावाखाली नेमके काय सुरू आहे, असा प्रश्न आता नागरिकांकडून उपस्थित केला जात आहे.

## सेलूतील बिबट्याचा संशयास्पद मृत्यू; वनविभागाच्या निष्काळजीपणाचा बळी?

### व्हायरल व्हिडिओनंतर संताप उसळला; दोषींवर निलंबनाची मागणी

**सेलू । अभय बेदमोहता :** सेलू शहरातील गजानन नगरी परिसरात पकडण्यात आलेल्या मादी बिबट्याचा संशयास्पद मृत्यू झाल्याने वनविभागाच्या कारभारावर गंभीर प्रश्नचिन्ह उभे राहिले आहे. बिबट्याला पकडताना झालेल्या निष्काळजीपणामुळेच हा मृत्यू झाला असावा, असा आरोप करत संबंधित अधिकाऱ्यांवर तात्काळ निलंबनाची कारवाई करावी, अशी जोरदार मागणी करण्यात येत आहे.

२६ फेब्रुवारी २०२६ रोजी रात्री सेलू शहरातील गजानन नगरी परिसरात एक मादी बिबट आढळून आली होती. वनविभागाने रात्री सुमारे ९.३० वाजताच्या सुमारास तिला पकडल्याचा दावा केला. मात्र, त्यानंतर सोशल मीडियावर व्हायरल झालेल्या एका व्हिडिओने संपूर्ण प्रकरणाला वेगळेच वळण दिले. या व्हिडिओमध्ये जाळ्यात अडकलेल्या बिबट्याच्या अंगावर वनरक्षक पाय ठेवून उभा असल्याचे दिसत असून या अमानुष प्रकारामुळे वन्यजीवप्रेमी आणि नागरिकांमध्ये संतापाची लाट उसळली आहे.

हिंगणी येथे आयोजित छत्रपती शिवाजी महाराज महसूल अभियान शिबिरात गोविंदा वामन पेटकर (मु.पो. बोरी, ता. सेलू) यांनी जिल्हाधिकाऱ्यांना दिलेल्या निवेदनातून या संपूर्ण प्रकरणाची सखोल चौकशी करण्याची मागणी केली आहे. बिबट्याला पकडताना ऱ्ऊर्ण च्या मार्गदर्शक तत्त्वांचे पालन झाले का? रेस्क्यू



ऑपरेशनदरम्यान पशुवैद्यकीय अधिकारी उपस्थित होते का? बिबट्याला बेशुद्ध करण्यासाठी वापरण्यात आलेला डार्ट योग्य पद्धतीने वापरण्यात आला का? असे अनेक प्रश्न निवेदनातून उपस्थित करण्यात आले आहेत.

तसेच बिबट्याच्या शवविच्छेदन प्रक्रियेचे संपूर्ण चित्रीकरण आणि अहवाल सार्वजनिक करण्याची मागणीही करण्यात आली आहे. या घटनेमुळे केवळ बिबट्याच्या मृत्यूचा मुद्दाच नव्हे, तर वनविभागाच्या एकूणच ढिसाळ नियोजनावरही प्रश्न उपस्थित झाले आहेत.

दरम्यान, वनवा हंगाम सुरू होऊन जवळपास २० दिवस उलटले तरी जंगलातील अनेक पाणवठे कोरडे पडले आहेत. त्यामुळे पाण्याच्या शोधात वन्यजीव मानवी वस्तीकडे येत असल्याची परिस्थिती निर्माण झाली आहे. नियमानुसार १५ फेब्रुवारीपर्यंत पूर्ण होणे अपेक्षित असलेली लाईन जाळाईची कामेही रखडल्याने जंगलात वनवा लागण्याचा धोका वाढल्याची भीती व्यक्त केली जात आहे. वन्यजीवांशी झालेले अशोभनीय वर्तन आणि प्रशासनाची दिरंगाई लक्षात घेता या प्रकरणाची उच्चस्तरीय चौकशी करून दोषी अधिकाऱ्यांवर कठोर कारवाई करावी, अशी मागणी करण्यात आली आहे. या निवेदनाच्या प्रती नागपूर येथील अपर प्रधान मुख्य वनसंरक्षक, मुख्य वनरक्षक (वनवृत्त नागपूर), उपवनसंरक्षक (वर्धा वनविभाग) तसेच विभागीय वन अधिकारी (बोर व्याघ्र प्रकल्प, वर्धा) यांना पाठविण्यात आले आहेत.

## आगीने गिळला शेतकऱ्याचा घाम : आकोलीत दोन एकर गहू जळून खाक

**शेतकरी हतबल**

**सेलू जनमाध्यम :** निसर्गाच्या लहरीपणामुळे आधीच नापिकीच्या संकटाने त्रस्त असलेल्या शेतकऱ्यांवर आणखी एक मोठे संकट कोसळले आहे. आकोली परिसरात लागलेल्या भीषण आगीत शेतातील उभे असलेले दोन एकर गहू चे पीक जळून खाक झाले. या घटनेत शेतकरी पुरुषोत्तम दखणे यांचे मोठे आर्थिक नुकसान झाले असून ते हतबल झाले आहेत.

शनिवार, ७ मार्च रोजी दुपारी सुमारे १२ वाजताच्या सुमारास अचानक ही आग लागल्याचे समोर आले. त्या वेळी गहू पीक पूर्णपणे वाळलेले असल्याने आगीने क्षणार्धात रौद्र रूप धारण केले. पाहता पाहता आगीने संपूर्ण शेताला वेढा घातला आणि दोन एकरातील



उभे पीक राख झाले.

या आगीमध्ये केवळ गहू पीकच नाही तर शेजारील सहारे नावाच्या शेतकऱ्याच्या शेतातील तुषार सिंचनासाठी वापरण्यात येणारे पाईपही जळून खाक झाले. त्यामुळे त्यांचेही मोठे नुकसान झाले आहे.

नुकसानग्रस्त शेतकरी पुरुषोत्तम दखणे यांनी हळहळ व्यक्त करताना सांगितले की, हाता-तोंडाशी आलेला घास या आगीने हिरावून नेला. वर्षभराची मेहनत डोळ्यादेखत राख झाली. या घटनेमुळे परिसरातील शेतकऱ्यांमध्ये हळहळ व्यक्त होत आहे.

घटनेची माहिती मिळताच संबंधित क्षेत्राचे तलाठी अमोल रामटेके यांनी तात्काळ घटनास्थळी धाव घेत पाहणी केली. यावेळी नुकसानीचा पंचनामा करण्यात आला असून शासनाकडून नुकसानग्रस्त शेतकऱ्याला योग्य ती मदत व नुकसानभरपाई मिळवून देण्याचे आश्वासन देण्यात आले आहे.

## बियाणे विक्रेत्यांना दिलासा; कायद्यात प्रामाणिक व्यावसायिकांना त्रास नाही

**वर्धा जनमाध्यम :** केंद्र सरकारने मंजूर केलेल्या बियाणे विधेयक २०२५ मधील काही तरतुदींमुळे राज्यातील कृषी बियाणे विक्रेत्यांमध्ये चिंता निर्माण झाली होती. बोगस बियाणे, खते किंवा कीटकनाशके आढळल्यास संबंधित कंपनीसोबत विक्रेत्यांनाही दोषी धरण्याचे प्रावधान असल्याने किरकोळ विक्रेत्यांमध्ये संभ्रम निर्माण झाला होता. मात्र, केंद्रीय कृषीमंत्री शिवराजसिंह चौहान यांनी प्रामाणिक विक्रेत्यांना या कायद्यामुळे कोणताही त्रास होणार नसल्याचे स्पष्ट केल्याने विक्रेत्यांना दिलासा मिळाला आहे.

महाराष्ट्र राज्य कृषी व्यवसायी संघटनेच्या पदाधिकाऱ्यांनी खासदार अमर काळे यांची भेट घेऊन याबाबत निवेदन दिले होते. आम्ही केवळ कंपन्यांकडून मिळणारे पॅकबंद बियाणे शेतकऱ्यांना विकतो. त्यात कोणताही बदल किंवा हस्तक्षेप करत नाही. त्यामुळे बोगस बियाण्यांबाबत विक्रेत्यांना जबाबदार धरणे योग्य नाही, अशी भूमिका संघटनेने मांडली होती. किरकोळ विक्रेते दुकानाचा खर्च आणि अल्प



नफ्यावर व्यवसाय करीत असल्याने मोठ्या दंडाची तरतूद त्यांच्यासाठी अन्यायकारक ठरेल, असेही त्यांनी नमूद केले. या पार्श्वभूमीवर खासदार अमर काळे यांनी केंद्रीय कृषीमंत्री शिवराजसिंह चौहान यांना पत्र पाठवून या विषयाकडे लक्ष वेधले. किरकोळ कृषी विक्रेत्यांवर अन्याय होऊ नये आणि कायद्याबाबत स्पष्टता यावी, यासाठी त्यांनी पाठपुरावा केला.

## वर्धा नदीच्या पुलावर वृद्धाचा अपघाती मृत्यू

**आष्टी । साहूर जनमाध्यम :** नजीकच्या दृगवाडा येथील वर्धा नदीवरील पुलावर एका वृद्ध व्यक्तीचा अपघात होऊन मृत्यू झाल्याची घटना रविवारी (८ मार्च) दुपारच्या सुमारास घडली. अपघाताचे नेमके कारण अद्याप स्पष्ट झाले नसून पोलिसांनी तपास सुरू केला आहे.

पोलिसांकडून मिळालेल्या माहितीनुसार, दुपारी सुमारे अडीच वाजताच्या सुमारास पुलावर एका व्यक्तीचा अपघात झाल्याची माहिती स्थानिक नागरिकांनी दिली. त्यानंतर बेनोडा पोलिसांनी तातडीने घटनास्थळी धाव घेतली. सुरुवातीला मृत व्यक्तीची ओळख पटली नव्हती. मात्र खिशात मिळालेल्या आधारकार्डवरून मृताचे नाव अशोक केशवराव डाफ (वय ८१, रा. गनोरी रोड, गणेशनगर, यवतमाळ) असे



असल्याचे निष्पन्न झाले.

मृत व्यक्ती एमएच-२९ बीआर ८१२३ क्रमांकाच्या लुना वाहनावरून प्रवास करत होता. मात्र तो नेमका कुठून कुठे जात होता, याची माहिती मिळू शकलेली नाही. पोलिसांनी घटनास्थळी तपास करताना वाहनात दारूच्या दोन निप आढळून आल्याची माहिती दिली. त्यामुळे संबंधित व्यक्ती मद्यप्राशन केलेल्या अवस्थेत असण्याची शक्यता व्यक्त करण्यात येत आहे.

ही घटना बेनोडा पोलीस ठाण्याच्या हद्दीत घडली असून नागरिकांच्या सूचनेवरून पोलिसांनी घटनास्थळी पंचनामा केला. मृतदेह पुढील तपासणीसाठी वरुड येथील सामान्य रुग्णालयात पाठविण्यात आला आहे.

घटनास्थळी बेनोडा पोलीस स्टेशनचे कर्मचारी ललित तायडे व निकिता उमाळे उपस्थित होते. या प्रकरणाचा पुढील तपास बेनोडा पोलीस करीत आहेत.

### जागतिक महिला दिन

## संघर्षातून मिळवलेले हक्क टिकवण्यासाठी महिलांनी संघटित व्हावे : दिलीप उटाणे

**वर्धा जनमाध्यम :** आयटक कामगार केंद्र, वर्धा येथे जागतिक महिला दिन उत्साहात साजरा करण्यात आला. कॉम्रेड ज्योत्स्ना राऊत यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या या कार्यक्रमात आयटकचे राज्य सचिव कॉ. दिलीप उटाणे यांनी प्रमुख मार्गदर्शन केले. सामाजिक कार्यकर्त्या अनिषा मान, महिला फेडरेशनच्या द्वारका इमडवार, अनुराधा उटाणे, आशा संघटनेच्या रेखा तेलतुंबडे, प्रतिभा वाघमारे, प्रमिला वानखेडे, जोशना मुंजेवार, वनिता खडसे यांची प्रमुख उपस्थिती होती.

कार्यक्रमाची सुरुवात सावित्रीबाई फुले व राजमाता जिजाऊ यांच्या प्रतिमेला माल्यार्पण करून करण्यात आली. प्रास्ताविक उज्वला नाखले यांनी केले. यावेळी मार्गदर्शन करताना कॉ. दिलीप उटाणे यांनी जागतिक



महिला दिनाचा इतिहास सांगत महिलांच्या हक्कांसाठी झालेल्या संघर्षाची आठवण करून दिली. संघर्षातून मिळवलेले कायदे आणि अधिकार टिकवून ठेवण्यासाठी महिलांनी अधिक संघटित होणे आवश्यक असल्याचे त्यांनी सांगितले. समाजात स्त्री-पुरुष समानता प्रस्थापित करण्यासाठी महिला चळवळीला अधिक बळ देण्याची गरज त्यांनी व्यक्त केली.

दरवर्षी ८ मार्च रोजी साजरा होणारा जागतिक महिला दिन हा महिलांच्या सामाजिक, आर्थिक, सांस्कृतिक आणि राजकीय योगदानाचा गौरव करण्याचा दिवस आहे. महिलांच्या हक्कांबाबत जनजागृती निर्माण करण्यासाठी तसेच समानतेच्या लढ्याला बळ देण्यासाठी हा दिवस महत्त्वाचा ठरतो, असेही त्यांनी नमूद केले.

कार्यक्रमात माधुरी फुलझले, आम्रपाली बुरबुरे, रंजना फुलझले, प्रतिभा पाचघरे, अनिता बागडे, कविता झिले, सुलोचना पाचेकर, योगिनी अतकरे, छाया देशमुख, तेजस्विनी रघाटाटे, मंगला पाटील, उषा सहारे यांच्यासह अनेक महिला उपस्थित होत्या. कार्यक्रमात महिलांनी एकजुटीने सामाजिक हक्कांसाठी लढण्याचा निर्धार व्यक्त केला.

## लाडक्या बहिणींचा कृतज्ञतेचा सन्मान

### अनुदान पुन्हा सुरू करण्यासाठी केलेल्या प्रयत्नांचे पोटफोडे दाम्पत्याचे कौतुक

**आर्वी जनमाध्यम :** जागतिक महिला दिनाच्या पार्श्वभूमीवर आर्वी शहरातील विविध प्रभागातील महिलांनी मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण योजनेचे बंद झालेले अनुदान पुन्हा सुरू करण्यासाठी प्रयत्न करणाऱ्या राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे आर्वी विधानसभा अध्यक्ष दिलीप पोटफोडे तसेच नगरसेविका व महिला व बालकल्याण सभापती सौ. भारती दिलीप पोटफोडे यांचा भावनिक सत्कार करून कृतज्ञता व्यक्त केली.

राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाच्या कार्यालयात आयोजित या भेटीदरम्यान विविध प्रभागातील महिलांनी औक्षण करून



पुष्पगुच्छ, गुलाबपुष्प देत दोघांचे अभिनंदन केले. काही महिलांनी पेढा भरवून आनंद व्यक्त केला. लाडक्या बहिणींना न्याय मिळवून देण्यासाठी भाऊ म्हणून पाठीशी उभे राहिले या भावनेतून महिलांनी दिलीप पोटफोडे यांचे विशेष कौतुक केले, तर महिलांच्या हक्कासाठी सातत्याने पाठपुरावा केल्याबद्दल सौ. भारती पोटफोडे यांनाही सन्मानित करण्यात आले.

यावेळी बोलताना सौ. भारती पोटफोडे यांनी महिलांचे आभार मानत सांगितले की, मी माझे कर्तव्य आणि जबाबदारी पार पाडत आहे. वंचित लाभार्थ्यांना न्याय मिळवून देण्यासाठी आम्ही सातत्याने प्रयत्न करत आहोत. पुढेही प्रामाणिकपणे काम करत राहू. या प्रक्रियेत आर्वी विधानसभा क्षेत्राचे आमदार सुमितदादा वानखेडे तसेच महिला व बालकल्याण विभाग वर्धा येथील अधिकारी व कर्मचाऱ्यांचे विशेष सहकार्य लाभल्याचे त्यांनी नमूद केले. तसेच राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे आर्वी विधानसभा अध्यक्ष दिलीप पोटफोडे आणि पक्षाचे पदाधिकारी-कार्यकर्ते यांच्या पाठबळामुळे हे शक्य झाल्याचे त्यांनी सांगितले.उर्वरित पात्र लाभार्थ्यांनाही या योजनेचा लाभ मिळावा यासाठी पुढेही प्रामाणिक प्रयत्न सुरू राहतील, असा विश्वासही त्यांनी व्यक्त केला.

### खाकीतल्या बहिणींना सलाम

## महिला दिनी वर्धा वाहतूक शाखेतील महिला पोलिसांचा सत्कार

**वर्धा जनमाध्यम :** उन्हाच्या तडाख्यात, पावसाच्या सरीत आणि शहराच्या गजबजलेल्या चौकांमध्ये तासन्तास उभे राहून वाहतुकीची शिस्त राखणाऱ्या खाकीतल्या महिला पोलिसांना जागतिक महिला दिनी मानाचा मुजरा करण्यात आला. वर्धा वाहतूक नियंत्रण शाखेत आयोजित कार्यक्रमात महिला पोलिसांचा सन्मान करण्यात येत कर्तव्यनिष्ठेला सलाम करण्यात आला.

८ मार्च २०२६ रोजी झालेल्या या कार्यक्रमात पोलीस अधीक्षक सौरभकुमार अग्रवाल यांच्या आदेशानुसार वाहतूक नियंत्रण शाखेचे पोलीस निरीक्षक विलास पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली सर्व पोलीस अमलदारांनी महिला सहकाऱ्यांचा सत्कार केला.

यावेळी महिला पोलीस हवालदार ज्योत्सना मेश्राम, महिला पोलीस शिपाई प्रज्ञा भानारकर, चंदा हाडके, रोशनी कौरती, अंजु गजबे, लक्ष्मी कश्यप, तसेच प्रमोदिनी ढोडरमल यांचा पुष्पगुच्छ देऊन सत्कार करण्यात आला. कर्तव्य बजावताना



उन्हाळ्याच्या तीव्र उकाड्याचा सामना करावा लागतो, हे लक्षात घेऊन महिला पोलिसांना मिल्टन कंपनीच्या पाण्याच्या बाटल्या देण्यात आल्या. तसेच उन्हापासून संरक्षण व्हावे यासाठी दुपट्टा भेट देण्यात आला. कार्यक्रमाच्या शेवटी मिठाई वाटून महिला दिनाचा आनंद साजरा करण्यात आला.

शहरातील वाहतूक सुरळीत ठेवण्यासाठी महिला पोलीस दिवस-रात्र कर्तव्य बजावत असतात. त्यांच्या धैर्य, कर्तव्यनिष्ठा आणि समर्पणाला मानाचा मुजरा म्हणून हा सन्मान करण्यात आला.

## हिंगणघाटला स्वतंत्र जिल्ह्याचा दर्जा देण्याची मागणी

### अतुल वांदिले यांनी जयंत पाटील यांना दिले निवेदन;मुख्यमंत्र्यांना पाठविले पत्र

**हिंगणघाट जनमाध्यम :** हिंगणघाटला स्वतंत्र जिल्ह्याचा दर्जा देण्यात यावा तसेच राज्यात प्रस्तावित ११ अप्पर जिल्हाधिकारी कार्यालयांच्या यादीत हिंगणघाटचा समावेश करण्यात यावा, अशी मागणी राष्ट्रवादी काँग्रेस (शरदचंद्र पवार) पक्षाचे ज्येष्ठ नेते जयंत पाटील यांच्याकडे करण्यात आली. याबाबत वर्धा जिल्हाध्यक्ष अतुल वांदिले यांनी जयंत पाटील यांची भेट घेऊन सविस्तर निवेदन दिले. निवेदनाची दखल घेत जयंत पाटील यांनी राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांना पत्र पाठवून मागणीचा विचार करण्याची विनंती केली आहे.

हिंगणघाट हे भौगोलिकदृष्ट्या महत्त्वाचे शहर असून चार जिल्ह्यांच्या सीमेजवळ वसलेले आहे. चंद्रपूर जिल्ह्याची सीमा अवघ्या १५ किलोमीटरवर असून नागपूर जिल्हा व यवतमाळ जिल्हा यांच्या सीमा सुमारे ३० किलोमीटर अंतरावर आहेत. तसेच नागपूर जिल्ह्यातील बेला, सिर्सी तसेच वर्धा जिल्ह्यातील सिंदी रेल्वे, समुद्रपूर आदी भाग हिंगणघाटच्या जवळ असल्याने या परिसरातील नागरिकांची दैनंदिन बाजारपेठ हिंगणघाटशी



जोडलेली आहे.

हिंगणघाट हे ऐतिहासिक, औद्योगिक, व्यापारी व कृषी दृष्ट्या महत्त्वपूर्ण शहर आहे. येथे कृषी उत्पन्न बाजार समितीची मोठी उलाढाल असून औद्योगिक परंपरा देखील आहे. तसेच अतिरिक्त जिल्हा सत्र न्यायालय आणि केंद्र शासनाकडून मंजूर वैद्यकीय महाविद्यालय यांसारख्या सुविधा उपलब्ध आहेत. त्यामुळे प्रशासकीयदृष्ट्या हिंगणघाट सक्षम असल्याचे निवेदनात नमूद करण्यात आले आहे.

लगतच्या तालुक्यांतील नागरिकांना प्रशासकीय कामांसाठी संबंधित जिल्हा मुख्यालयात जावे लागते. यामुळे वेळ, पैसा व श्रम यांचा अपव्यय होत असल्याने प्रशासन अधिक सुलभ आणि प्रभावी करण्यासाठी हिंगणघाटला स्वतंत्र जिल्ह्याचा दर्जा देण्याची आवश्यकता असल्याचेही निवेदनात नमूद करण्यात आले आहे.

तसेच प्रस्तावित ११ अप्पर जिल्हाधिकारी कार्यालयांच्या यादीत हिंगणघाटचा समावेश करून येथे अप्पर जिल्हाधिकारी कार्यालय स्थापन करण्याची मागणी करण्यात आली आहे.

# संपादकीय

प्रबंध संपादक : प्रदीप देशपांडे

## महाराष्ट्राचा नवसंकल्प

महाराष्ट्राचा अर्थसंकल्प 'प्रगतशील, शाश्वत, सर्वसमावेशक आणि सुशासन' या चार प्रमुख स्तंभांवर आधारित असल्याची आश्वासक ग्वाही देत मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी तो विधिमंडळात मांडताना नवमहाराष्ट्राच्या उभारणीचा संकल्प विस्ताराने स्पष्ट केलाच; त्याची रूपरेषाही मांडली. शहरीकरणापासून गाव-वस्ती-खेड्यापर्यंत प्रत्येक घटकाचा विचार त्यात केलेला दिसतो. त्यातही शेतकरी कर्जमाफीची घोषणा करत बळीराजाला बळ देण्याच्या अनेक योजनांची केलेली मांडणी हे अर्थसंकल्पाचे वैशिष्ट्य. मुंबईच्या नागरीकरणाची कोंडी फोडताना अटल सेतूला जोडून तिसऱ्या मुंबईच्या उभारणीची घोषणाही सरकारचा सुनियोजित शहर समूह उभारणीचा संकल्प स्पष्ट करते. उपमुख्यमंत्री व अर्थमंत्री अजित पवार यांच्या अकाली निधनामुळे यंदाचा अर्थसंकल्प मुख्यमंत्री फडणवीस यांनी मांडला आणि तो अजित पवार यांना समर्पित केला.विधिमंडळाच्या इतिहासात मुख्यमंत्री असताना अर्थसंकल्प मांडणारे फडणवीस पहिलेच मुख्यमंत्री ठरले. यापूर्वी एकनाथ शिंदे मुख्यमंत्री असताना देवेंद्र फडणवीस यांनी अर्थमंत्री म्हणून पहिल्यांदाच अर्थसंकल्प सादर केला होता. गुंतवणुकीमध्ये अग्रेसर राज्य असल्याने महाराष्ट्राच्या अर्थसंकल्पाकडे अवघ्या देशाचे लक्ष होते. गेल्या वर्षी उत्तम पाऊस होऊनही कृषी व संलग्न क्षेत्रांत अगोदरच्या वर्षांच्या तुलनेत पाच टक्क्यांनी घसरण झाली. अवकाळी पाऊस, गारपीट, अतिवृष्टी आणि पूरस्थिती अशा नैसर्गिक आपत्तींमुळे कृषी क्षेत्राचे प्रचंड नुकसान झाले. या पार्श्वभूमीवर शेतकऱ्यांना दोन लाख रुपयांपर्यंत कर्जमाफी देण्यात आली असून नियमित कर्ज फेडणाऱ्या शेतकऱ्यांना ५० हजारांपर्यंत प्रोत्साहन लाभ देण्याची घोषणा अभिनंदनीय. तसेच गोपीनाथ मुंडे अपघात विमा योजनेत शेतमजुरांचाही समावेश करण्यात येणार असल्यामुळे हातावर पोट असणाऱ्या अगणित शेतमजुरांना याचा आधार मिळणार आहे. कृषी क्षेत्राच्या मंदावलेल्या विकास दराला गती देण्यासाठी मुख्यमंत्री नैसर्गिक शेती अभियान, मत्स्यसंपदा योजना, ग्रामीण पशुधन उद्योजक योजनांची घोषणा करण्यात आली असून, त्यामुळे शेतकऱ्यांना दिलासा मिळाला.लाडकी बहीण योजनेवरील खर्च,मोठी महसुली व वित्तीय तूट आणि दहा लाख कोटी रुपयांच्या आसपास कर्जाचा बोजा, यातून मार्ग काढत राज्याची अर्थव्यवस्था रुळावर आणण्याचे आव्हान सरकारपुढे होते. गेल्या काही वर्षांत अन्य राज्यांच्या तुलनेत भांडवली, म्हणजेच विकासकामांवरील खर्च कमी झाल्यामुळे यासाठी भरीव ततूरद करण्याची कसरत करावी लागणार होती. साडेसात अश्वशक्तीपर्यंतच्या कृषी पंपांचे वीज बिल सरकारने माफ केल्याने त्यासाठी १४ हजार कोटी रुपयांचा बोजा सरकारवर आला. राज्याच्या अर्थव्यवस्थेचे एक लाख कोटी डॉलरचे उद्दिष्ट गाठणे, हा महायुती सरकारचा अग्रक्रम आहे. आतापर्यंत ५० लाख कोटी रुपयांपर्यंत अर्थव्यवस्थेचे उद्दिष्ट गाठलेले आहे. पण अजून अर्धे बाकी आहे. त्यासाठी विकास दर दहा टक्क्यांपेक्षा अधिक असावा लागेल, असे मत महाराष्ट्र आर्थिक परिषदेने व्यक्त केले आहे.महायुती सरकार स्थापन झाल्यापासून आतापर्यंत १ लाख २० हजार कर्मचाऱ्यांची पदभरती झाली असून आगामी काळात आणखी ७५ हजार पदांची भरती होणार आहे. मत्स्य व्यवसायासाठी १२४० कोटी रुपयांचा निधी उपलब्ध करून दिल्याने अनेकांना काम मिळणार आहे. गडचिरोलीत ७० हजार रोजगारांची निर्मिती करण्यात येणार आहे. मुंबई-पुण्यात ३० लाखांहून अधिक रोजगारांची निर्मिती करण्याचा संकल्प आहे. मुंबई विमानतळ नवी मुंबई विमानतळाला मेट्रोने जोडण्यात येणार असून, वडाळा ते गेट वे ऑफ इंडिया असा नवा भुयारी मेट्रो मार्ग सुरू केला जाणार आहे. मुंबई-पुणे हायस्पीड ट्रेनही सुरू करण्यात येणार आहे. शहरांच्या विकासासाठी दहा शहर विकास प्राधिकरणे निर्माण करण्यात येणार आहेत. भविष्यकाळात नागरीकरण वाढणार असून, त्यांचे योग्य पद्धतीने नियोजन होणे आवश्यक आहे. धार्मिक पर्यटनाला गती देण्यासाठी सरकारने मोठी पावले उचलली असून, रामटेक येथे 'रामसृष्टी' आणि 'कालिदाससृष्टी' उभारली जाणार आहे.महानुभाव पंथीयांच्या विविध धार्मिक स्थळांवरील पायाभूत सुविधांसाठी खर्चाची तरतूद केली आहे. सातारा जिल्ह्यात वासोटा किल्ला ते मुनावळे रोप वे, छत्रपती संभाजी महाराज यांच्या मौजे तुळापूर येथील स्मारक आणि मौजे वढू बुद्रुक येथील स्मारकाचे काम २०२७ पर्यंत पूर्णत्वास नेण्याचे नियोजन मुख्यमंत्र्यांनी स्पष्ट केले. महात्मा जोतिराव फुले यांचे जन्मगाव कटगुण येथे भव्य स्मारक आणि ज्ञानज्योती सावित्रीबाई फुले यांचे जन्मगाव नायगावला स्मारक आणि महिला प्रशिक्षण केंद्राची घोषणाही लक्षवेधी ठरली. सातारा जिल्ह्यातील संगम माहुली येथे महाराणी ताराराणींच्या समाधिस्थळाचा जीर्णोद्धार केला जाणार आहे. हा ऐतिहासिक वारसा आणि जाज्वल्य इतिहासाची जपणूक केली जाणार आहे. राज्यातून जास्तीत जास्त खेळाडूंनी आंतरराष्ट्रीय स्तरावर पदके मिळवावीत, यासाठी 'मिशन लक्ष्यवेध' योजनेवर भर दिला जात आहे.खेळाडूंना जागतिक दर्जाचे प्रशिक्षण देण्याकरिता आणखी चार नवीन केंद्रे सुरू करण्याची कल्पना चांगली आहे. कर्करोग, मधुमेह व हृदयविकार अशा आजारांचे लवकर निदान करण्याकरिता आशियाई विकास बँकेच्या सहाय्याने ग्रामीण भागात दरवर्षी तपासणी मोहीम राबवण्याकरिता साडेचार हजार कोटी रुपयांची घसघशीत तरतूद केली आहे. मराठी भाषेतील साहित्य इतर भाषांमध्ये आणि अन्य भाषांतील साहित्य मराठीत अनुवादित करण्यासाठी 'यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र अनुवाद अकॅडमी'च्या माध्यमातून मराठीची पताका सर्वदूर पसरेल. त्याचप्रमाणे मराठी भाषेच्या कक्षाही रुंदावणार आहेत. राज्य सरकारकडून ३०० कोटी वृक्ष लागवडीची मोहीम हाती घेतली जाणार आहे. आखाती देशांतील युद्धामुळे कच्चे तेल महागले असून कांदा, केळी वगैरेंची निर्यात करणारा शेतकरी संकटात सापडला आहे. या पार्श्वभूमीवर राजकोषीय तूट ही तीन टक्क्यांपेक्षा कमी ठेवण्यात सरकारला यश आले असले तरीदेखील अपेक्षेपेक्षा ही तूट वाढू शकते, याचे भान ठेवण्याची गरज आहे. अर्थात वास्तवाचे भान ठेवून मुख्यमंत्र्यांनी संतुलित आणि विकसित महाराष्ट्राच्या दिशा निश्चित करणारा अर्थसंकल्प सादर केला आहे. निवडणुकांचे पर्व समाप्त झाले असल्यामुळे आता सवंग अर्थकारणास लगाम बसेल, अशी अपेक्षा.

# दिशाभूल करणाऱ्या अर्थसंकल्पाचे गुलाबी सादरीकरण!



**विधिमंडळात प्रत्येक नव्या आर्थिक वर्षाचे अंदाजपत्रक मांडून सरकारकडून करायच्या नियोजीत संभाव्य खर्चाला विधिमंडळाची मान्यता घेण्याची वैधानिक प्रक्रिया संविधानाने घालून दिली आहे. साधारणपणे कोणतेही सरकार पाच वर्षाचा कार्यकालासाठी त्या विधानसभेचा कार्यकाळ पूर्ण होण्यापर्यंतच्या काळासाठी आर्थिक नियोजन करणे अपेक्षीत असते. मात्र महायुती सरकारने चक्क वीस वर्षानंतर येणा-या २०४७च्या स्वातंत्र्याच्या शतकमहोत्सवी वर्षापर्यंतचे उद्दीष्ट समोर ठेवून अर्थसंकल्पाला'विकसित महाराष्ट्र २०४७' या दीर्घकालीन रोडमॅपवर आधारित असल्याचे सांगत गुलाबी जँकेट घालून गुलाबी चित्र रंगविण्याचा प्रयत्न केला आहे अशी टिका अर्थ तज्ज्ञांकडून केली जात आहे.**

केंद्र सरकारकडून देशात वस्तू आणि सेवा कर लागू करण्यात आला त्यानंतर राज्यांचा कर धोरणाचा अधिकार लोप पावला असून आता नवे कर लावण्याचा किंवा कमी करण्याचा अधिकार जीएसटी परिषदेकडे गेल्याने तसेही वैधानिक व्यवस्था नावालाच राहिली आहे. त्यामुळे मुख्यमंत्र्याच्या भाषणाचा भाग दोन अक्षरशः दोन पानांचा होता! मात्र राज्याचा सन२०२६-२७ या आर्थिक वर्षाचा ७,६९,४६७ कोटींचा अर्थसंकल्प मुख्यमंत्र्यानी विधानसभेत सादर केला. त्याच्या आदल्या दिवशी ते सहकुटूंब वानखेडे स्टेडियम येथे क्रिकेट सामन्याचा आनंद घेताना दिसले होते. त्यामुळे मुख्यमंत्र्याकडून सादर झालेल्या अर्थसंकल्पाचे सर्वत्र कौतुक होताना उपमुख्यमंत्र्यानी वित्तसचिव ओपी गुप्ता यांचे विशेष करताना 'तुमच्या शिवाय काहीच शक्य नसल्याचा' अभिप्रायही जाहिरपणे दिल्याचे दिसले आहे. त्यानंतर विधीमंडळाच्या परिसरात या 'ओपी आणि पीपीं'च्या अर्थसंकल्पाची दबक्या आवाजातील कुजबूज चर्चा ही पहायला मिळाल्या! मात्र त्यात ४०५५२ कोटीची महसुली तूट प्रस्तावित केली आहे तर 'विकसित महाराष्ट्र २०४७' या दीर्घकालीन रोडमॅपवर आधारित तयार करण्यात आला आहे.

**प्रगतिशील, शाश्वत, सर्वसमावेशक आणि सुशासन**

या अर्थसंकल्पात राज्यातील पात्र शेतकऱ्यांना दोन लाखापर्यंत कर्जमाफी देणारी पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर शेतकरी कर्जमाफी योजना जाहीर केल्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी सांगितले. तसेच नियमित कर्जफेड करणाऱ्या शेतकऱ्यांना ५० हजार प्रोत्साहन देण्याचा निर्णयही घेण्यात आला. विधान सभेत दुपारी २वाजता सन २०२६-२७ चा अर्थसंकल्प सादर केल्यानंतर मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री सुनेत्रा अजित पवार, महसूल मंत्री चंद्रकांत बावनकुळे, वित्त राज्यमंत्री ॲड.आशिष जयस्वाल तसेच वित्त विभागाचे अपर मुख्य सचिव ओ.पी.गुप्ता यांनी विधानभवनात पत्रकारांशी संवाद साधला.

मुख्यमंत्री सौर कृषी वाहिनी योजनेत आतापर्यंत चार हजार मेगावॅट क्षमता पूर्ण झाली असून यावर्षी ती १३ ते १४ हजार मेगावॅटपर्यंत नेण्याचा मानस आहे, ज्यामुळे शेतकऱ्यांना दिवसा वीज देता येईल. सिंचन क्षेत्रात विविध नदीजोड प्रकल्प, तसेच सांगली–कोल्हापूर येथील पुराचे पाणी दुष्काळी भागाकडे वळविले जाईल. जागतिक बँकेच्या सहकार्याने छोट्या शहरांमध्ये सहा हजार कोटींच्या मलनिस्सारण आणि सांडपाणी प्रक्रिया योजना राबवण्यात येणार आहेत. असे असलेतरी केंद्र सरकारकडून करण्यात आलेल्या टेरिफ करारामुळे देशातील शेती आणि शेतकरी देशोध डिला लागण्याची चिंता या क्षेत्रातील जाणकार व्यक्त करत आहेत. त्यावर या अर्थसंकल्पात चकार शब्द नसल्याने हे गुलाबी चित्र रंगविण्याचा प्रयत्न म्हणजे धुळफेकच म्हणायला हवी अशी विरोधकांनी टिका केली आहे.मुख्यमंत्री फडणवीस म्हणाले की, 'मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण' योजना सुरूच राहणार असून यासाठी आवश्यक निधी उपलब्ध करून देण्यात आला आहे. ही व्यक्तीगत लाभाची योजना असल्याने आदिवासी आणि सामाजिक न्याय तसेच ओबीसी विभागाच्या निधीतून त्यासाठीचा निधी मोठ्या प्रमाणात देण्यात आला आहे.असा खुलासाही मुख्यमंत्र्याकडून करण्यात आला. तर आतापर्यंत ३७ लाख महिलांना लखपती दीदी बनवण्यात आले असून यावर्षी आणखी २५ लाख महिलांना लखपती दीदी बनवण्याचे लक्ष्य आहे. राज्यात स्थापन होत असलेल्या एज्युसिटी प्रकल्पात आतापर्यंत पाच आंतरराष्ट्रीय विद्यापीठे आली असून आणखी सात विद्यापीठे येणार आहेत. या ठिकाणी एक लाख विद्यार्थ्यांना शिक्षणाची संधी मिळेल आणि परदेशातील खर्चाच्या एक चतुर्थांश खर्चात शिक्षण घेता येईल. स्टार्टअप्ससाठी फंड्स ऑफ फंड तयार करण्यात आला असून निवडक स्टार्टअप्सना २५ लाख रुपयांपर्यंतची शासकीय कामे थेट देण्यात येणार आहेत. तसेच ७५ हजार नवीन नोकऱ्या देण्याचा निर्णयही राज्य शासनाने घेतला आहे.

राज्यातील वनाच्छादन ३३ टक्क्यांपर्यंत नेण्यासाठी सात वर्षांत तीनशे कोटी वृक्षारोपणाचे मिशन हाती घेण्यात आले आहे. या मोहिमेतून रोजगारनिर्मितीलाही चालना मिळणार असल्याचे मुख्यमंत्री फडणवीस म्हणाले. मुख्यमंत्री म्हणाले की, राज्याचा वित्तीय तुटीचा दर २.६० टक्के असून तो राजकोषीय उत्तरदायित्व व वित्तीय व्यवस्थापन कायद्यानुसार ३ टक्क्यांच्या मर्यादेत आहे. महसुली तूट १ टक्क्यांच्या आत आणि राज्याचे कर्ज जीडीपीच्या १८.५ टक्क्यांवर नियंत्रित ठेवण्यात आले आहे.राज्याचा विकासदर ७.९ टक्के असून तो केंद्राच्या ७.३ टक्क्यांपेक्षा जास्त आहे. महाराष्ट्राची अर्थव्यवस्था सध्या ५६६ अब्ज डॉलर (सुमारे ५१ लाख कोटी रुपये) इतकी झाली असल्याचे मुख्यमंत्री म्हणाले. सध्याच्या वाढीच्या गतीने महाराष्ट्र देशातील पहिली ट्रिलियन डॉलर अर्थव्यवस्था बनू शकतो. भांडवली खर्चात २१ टक्के वाढ करून तो १.१२ लाख कोटींवर नेण्यात आल्याचे त्यांनी शेवटी नमूद केले.मुख्यमंत्री व वित्तमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी सादर केलेला २०२६-२७ चा अर्थसंकल्प विकसित महाराष्ट्र २०४७ या ध्येयाकडे खंबीरपणे वाटचाल करणारा दूरदृष्टीपूर्ण अर्थसंकल्प असल्याचे मत उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी व्यक्त केले.

**पायाभूत सुविधांच्या विकासावर विशेष भर**

उपमुख्यमंत्री शिंदे म्हणाले की, माजी उपमुख्यमंत्री दिवंगत अजित पवार यांच्या दुःखद निधनानंतर सादर होणारा हा पहिलाच अर्थसंकल्प असून त्यांना त्या माध्यमातून भावपूर्ण श्रद्धांजली अर्पण करण्यात आली आहे. या अर्थसंकल्पात राज्यातील पायाभूत सुविधांच्या विकासावर विशेष भर देण्यात आला आहे. रस्ते, मेट्रो, रेल्वे आणि जलमार्ग यांचे जाळे मजबूत करण्याबरोबरच ग्रामीण भागातील गावांपर्यंत काँक्रीट रस्ते उभारण्याचा निर्णय घेण्यात आल्याचे शिंदे यांनी नमूद केले. सध्या राज्यात ८ ते १० लाख कोटी रुपयांहून अधिक किमतीचे पायाभूत सुविधा प्रकल्प सुरू असून देशात सर्वाधिक इन्फ्रास्ट्रक्चर प्रकल्प महाराष्ट्रात सुरू असल्याचे उपमुख्यमंत्री शिंदे यांनी सांगितले.

राज्य शासनाने जाहीर केलेली 'मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण' योजना सुरूच राहणार असून शेतकऱ्यांसाठी कर्जमाफीचा निर्णयही अर्थसंकल्पात जाहीर करण्यात आला आहे. ३० सप्टेंबर २०२५ पर्यंत दोन लाख रुपयांपर्यंतच्या कर्जाची माफी देण्याचा निर्णय तसेच नियमित कर्जफेड करणाऱ्या शेतकऱ्यांना ५० हजार रुपयांचे प्रोत्साहन अनुदान देण्याची तरतूद करण्यात आली असल्याचे त्यांनी सांगितले.प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी मांडलेल्या 'विकसित भारत २०४७' संकल्पनेत महाराष्ट्राचे मोठे योगदान राहणार असून राज्याचा एक ट्रिलियन डॉलर अर्थव्यवस्थेचा उद्देश साध्य करण्यासाठी हा अर्थसंकल्प महत्त्वाचा टप्पा ठरेल, असेही उपमुख्यमंत्री शिंदे म्हणाले.राज्यातील पर्यटन विकासालाही चालना देण्यासाठी विविध उपक्रम हाती घेण्यात आले आहेत. सातारा जिल्ह्यातील वासोटा किल्ला येथे रोपवे उभारण्याची घोषणा करण्यात आली असून त्यामुळे पर्यटकांना ऐतिहासिक वारसा स्थळांचा अनुभव घेणे सुलभ होईल, असे त्यांनी सांगितले.

मुख्यमंत्री व वित्तमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी सादर केलेला अर्थसंकल्प सर्वसमावेशक आणि विकसित महाराष्ट्राच्या दिशेने वाटचाल करणारा असल्याचे मत उपमुख्यमंत्री सुनेत्रा अजित पवार यांनी व्यक्त केले. हा अर्थसंकल्प माजी उपमुख्यमंत्री दिवंगत अजित पवार यांच्या स्मृतींना समर्पित करण्यात आल्याबद्दल मुख्यमंत्री फडणवीस यांचे त्यांनी आभार मानले. तसेच दिवंगत अजित पवार यांच्या नावाने 'गतिमान नागरिक सेवा पुरस्कार' सुरू करण्याची घोषणा ही त्यांना दिलेली खरी श्रद्धांजली असल्याचेही त्यांनी नमूद केले.

**दिन दुबळ्या वंचित दलितांना ठेंगा?**

असे असले तरी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी शुक्रवारी वर्ष २०२६-२७ च्या सादर केलेल्या राज्य अर्थसंकल्पात सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभागाच्या तरतुदीत २ टक्के तर आदिवासी विभागाच्या तरतुदीमध्ये केवळ एक टक्का वाढ करण्यात आली आहे. मुस्लीम समुहास या अर्थसंकल्पाने काहीही दिलेले नाही. अनुसूचित जाती घटक कार्यक्रमासाठी या अर्थसंकल्पामध्ये २३ हजार १५० कोटीची तरतूद आहे. मागच्या वर्षी २२ हजार ६५८ कोटींची तरतूद होती. ही वाढ अवघी २.१७ टक्के आहे. आदिवासी घटक कार्यक्रमासाठी २१ हजार ७२३ कोटी रुपये तरतूद करण्यात आली आहे. मागच्या वर्षी आदिवासी विभागाला २१ हजार ४९५ कोटी नियतव्यय होता. यंदाची वाढ अवघी १.६ टक्के आहे. सरकार अनुसूचित जाती, जमातीच्या कार्यक्रमांसाठी अर्थसंकल्पामध्ये पुरेशी तरतुद दाखवत असले तरी प्रत्यक्षात निम्मा निधीसुद्धा उपलब्ध होत नसल्याचे गुरुवारी जाहीर झालेल्या राज्य आर्थिक पाहणी अहवालाने दाखवले.

बौद्धांसाठी बार्टी, मातंगांसाठी आर्टी, आदिवासींसाठी टीआरटीआय व अल्पसंख्याकासाठी मार्टी या विविध जात समुहांच्या संशोधन व प्रशिक्षण संस्थांसाठी पुरेशी तरतूद केल्याचे अर्थसंकल्पात म्हटले आहे. प्रत्यक्षात मात्र या संस्थांच्या लाभार्थींच्या संख्येमध्ये घट दिसून येत आहे. आदिवासी समाजामध्ये नवउद्योजक निर्माण करण्यासाठी आत्मनिर्भयता बिरसा ही योजना जाहीर केली. तसेच कातकरी, कोलाम, माडिया व पारधी समाजाच्या विकासाठी विशेष पॅकेज दिले आहे. वांद्रे येथे चर्मकला डीझाईन व उत्पादकता केंद्र स्थापन करण्यात येणार आहे.२०११ च्या जनगणनेनुसार राज्यात मुस्लीम लोकसंख्या ११ टक्के आहे. मात्र या समाजासाठी अर्थसंकल्पामध्ये अवाक्षर सुद्धा नाही. आदिवासी, धनगर, चर्मकार व मातंग समाजांवर अर्थसंकल्पामध्ये कृपादृष्टी दाखवली तो न्याय मुस्लीम समाजाला दिलेला नाही. अल्पसंख्याक विभागाचा नियतव्यय केवळ ८४४ कोटी रुपयांचा आहे. दिव्यांगाकरिता जिल्हा वार्षिक योजनेअंतर्गत १ टक्का निधी राखून ठेवण्याचे निकष निश्चित करण्याचे एकल महिलांसाठी धोरण आणण्याचे वचन अर्थसंकल्पामध्ये आहे.अनुसूचित जातींना शासकीय नोकरी व शिक्षणामध्ये १३ टक्के आरक्षण आहे. त्या आरक्षणामध्ये अ, ब, क, ड असे वर्गीकरण करण्यासाठी त्रिसदस्यीय समिती नेमली आहे. त्या समितीचा अहवाल लवकरच प्राप्त करुन समितींच्या शिफारशींनुसार अनुसूचित जात घटकांना १३ टक्के आरक्षणातील वाटा देण्यात येईल, असे आश्वासन अनुसूचित जाती प्रवर्गात बौद्धेतर ज्या लहान ५८ जाती आहेत, त्यांना या अर्थसंकल्पात दिले आहे.

**केवळ व्याजापोटी दरवर्षी ७०,०५५.१६ कोटी**

२०२६-२७ च्या अधिकृत अर्थसंकल्पीय आकडेवारीचे वाभाडे काढताना वित्तीय क्षेत्राच्या जाणकारांनी मात्र राज्यावर ११ लाख कोटींच्या कर्जाचा डोंगर असल्याचे आणि एकूण कर्ज २०२६-२७ च्या अर्थसंकल्पीय अंदाजानुसार तब्बल ११,०२,६५४ कोटी रुपयांवर पोहोचले आहे. हे कर्ज राज्याच्या स्थूल उत्पन्नाच्या (GSDP) २०.३८% इतके महाकाय झाले आहे याकडे लक्ष वेधले आहे. वाढत्या कर्जामुळे केवळ व्याजापोटी सरकारला दरवर्षी ७०,०५५.१६ कोटी रुपये मोजावे लागणार आहेत, जे राज्याच्या एकूण महसुली जमेच्या ११.३७% आहेत. त्यामुळे महसुली तूट ४०,५५२.३५ कोटी रुपयांवर गेली आहे.

कर्जमाफीच्या घोषणेच श्रेय सरकारकडून घेतले जात असताना बीड आणि संपूर्ण महाराष्ट्रातील शेतकरी आज दुष्काळ, अवकाळी आणि नापिकीच्या संकटात होरपळत असताना, कृषी व संलग्न कार्यक्रमांची अर्थसंकल्पीय तरतूद १,३३,९८९.०५ कोटींवरून (२०२५-२६ सुधारित अंदाज) थेट १,२२,९१३.८२ कोटींवर आणली आहे. तब्बल ११ हजार कोटींची ही कपात शेतकऱ्यांच्या जखमेवर मीठ चोळणारी आहे.तर 'समाजकल्याण आणि पोषण आहार' या अत्यंत महत्त्वाच्या विभागाची तरतूद ८०,७३५.८१ कोटींवरून अमानुषपणे ५३,०००.७४ कोटींवर आणली आहे.

तब्बल २७ हजार कोटींची कपात करून सरकारने थेट गरिबांच्या आणि कुपोषित बालकांच्या ताटातील घास हिरावून घेतला आहे. आरोग्य आणि रोजगाराला कात्री: आरोग्यावरील खर्च ३८,४५४.४९ कोटींवरून ३३,६५३.८६ कोटींवर, तर रोजगार निर्मिती करणाऱ्या 'उद्योग व खनिजे' विभागाची तरतूद ३७,७३२.८६ कोटींवरून थेट २४,२३८.४३ कोटींपर्यंत खाली आणली आहे.राज्याचा विकासेतर खर्च वाढून २,९०,८६६.३७ कोटी रुपयांवर पोहोचला आहे. प्रशासकीय उधळपट्टी आणि अनुत्पादक खर्चाला आळा घालण्याऐवजी, सरकार कामगार हक्क आणि सामाजिक कल्याणाच्या योजनांचा गळा घोटत आहे. बहुजन, कष्टकरी आणि शेतकरी वर्गाला वाऱ्यावर सोडणाऱ्या या दिशाभूल करणाऱ्या अर्थसंकल्पाचे सादरीकरण मात्र गुलाबी जँकेट घालून करण्यात आले असल्याची टिका अर्थ तज्ज्ञांकडून केली जात आहे.

**किशोर आपटे**

## इंधनाच्या किमती केव्हा कमी होणार?

जगात आंतरराष्ट्रीय स्तरावर सुरु असलेल्या राजकारणामुळे भारतातील तेल कंपन्या कच्च्या तेलाच्या व्यापारातून मालामाल होत आहेत. जागतिक स्तरावर कच्चे तेल स्वस्त झालेले असताना त्याचा थेट फायदा भारतीय ग्राहकांना न होता तेल कंपन्यांनाच अफाट आर्थिक लाभ होताना दिसत आहे. देशामध्ये पेट्रोल आणि डिझेलच्या किमती सध्या स्थिर असल्या तरी त्या कमी करण्याचे सरकार मनावर घेताना दिसत नाही. सामान्य जनतेच्या डोक्यावरच महागाईचे ओझे सतत वाढत चालले आहे. एकीकडे अमेरिकेच्या निर्बंधामुळे भारताने रशिया, इराण अशा मित्र राष्ट्रांकडून कच्चे तेल आयात करणे कमी केले आहे. आता अमेरिकेकडून भारतावर व्हेनेझुएलासारख्या राष्ट्राकडून कच्चे तेल घेण्यासाठी दबाव सुरु आहे. परिणामी रशियासारखा देश आता चीनला आपले कच्चे तेल निर्यात करीत आहे. ज्याचा चीन पुरेपूर फायदा उठवत आहे. या पार्श्वभूमीवर भारतातील पेट्रोलियम कंपन्यांना नफेखोरीसाठी मोकळे रान मिळाल्याचे दिसते. इंधन विक्रीतून तेल कंपन्यांनी अव्वाच्या सव्वा नफा कमावल्याचे अलीकडच्या आकडेवारीवरून सिद्ध झाले आहे. अपेक्षेहून अधिक नफा कमवूनदेखील भारतीय तेल कंपन्या त्याचा लाभ सामान्य ग्राहकांना देताना दिसत नाही. म्हणूनच आजही भारतीय ग्राहकांना एलपीजी किंवा इतर इंधन पूर्वीच्याच किमतीत खरेदी करावे लागत आहे. आंतरराष्ट्रीय बाजारात भारतीय कंपन्यांना कच्चे तेल स्वस्तात मिळत असूनदेखील त्यांनी दर कमी न करणे अतिशय संतापजनक बाब आहे. केंद्र सरकारचे तेल कंपन्यांवर नियंत्रण आहे.की नाही, याचीही शंका लोकांना निर्माण होत आहे. भारताच्या शेजारी राष्ट्रातदेखील इंधनाच्या किमती आपल्यापेक्षा कमी आहेत. मग भारतीय कंपन्यांकडूनच महाग तेल विकण्याचे कारण काय असायला पाहिजे हा प्रश्न निर्माण होतो. एकीकडे सर्वसामान्य वाहनचालकांना सध्या तिहेरी भुर्दंड सोसावा लागत आहे. वाहन खरेदी करताना सरकारला टॅक्स भरावा, पुन्हा वाढत्या दराने पेट्रोल-डिझेल खरेदी करावे. आणि त्यानंतर टोल नाक्यावरची सक्तीची वसुली आहेच. तर दुसरीकडे मध्यपूर्वेतील तेलसंपन्न राष्ट्रांकडून स्वस्तात तेल पदरात पडून भारतीय कंपन्यांची सध्या चांदी सुरु असल्याचे चित्र पाहायला मिळते.

**प्रा. मधुकर चुटे,** नागपूर

## दिल्लीतील हत्याकांड आणि 'सोयीस्कर' धर्मनिरपेक्षतेचा बुरखा!

देशाची राजधानी असलेल्या दिल्लीतील उत्तम नगर परिसरात नुकतीच एक धक्कादायक आणि माणुसकीला काळिमा फासणारी घटना घडली. होळीचा रंग एका लहान मुली कडून अनावधाने उडाला म्हणून तिच्या वडिलांची हत्या जिहादी मानसिकतेच्या टोळक्य[illegible] केल्याची बातमी ऐकली.दिल्लीतील दिवसाढवळ्या घडलेल्या या घटनेने संपूण देश हादरला असला, तरी राजकीय वर्तुळाती आणि तथाकथित विचारवंत या घटनेबाबत 'सोयीस्कर मौन साधून आहे. रंग खेळताना अनावधानाने रंग उडाला, यांसारख्या क्षुल्लक कारणावरून एका तरुणाला गाठून त्याचा जीव घेणे, ही केवळ गुन्हेगारी नसून ती एका विशिष्ट द्वेषमूलक मानसिकतेचे दर्शन घडवते. पीडित तरुण आपल्या कुटुंबाचा आधार होता, परंतु त्याच्या हत्येने एका हिंदू कुटुंबाचा आधार आज कायमचा हिरावला गेला आहे. जेव्हा हीच घटना उलट्या क्रमाने घडते, तेव्हा 'लोकशाही धोक्यात आहे' किंवा 'असहिष्णुता वाढली आहे' असा टाहो काँग्रेस नेते राहुल गांधी, प्रियंका गांधी सहित [illegible]डावे विचारवंत, सिने कलाकार आणि स्वतःला [illegible] मानवाधिकार वादी म्हणवून घेणारे कार्यकर्ते [illegible]ही सगळी मंडळी आज मात्र या घटनेवर [illegible] चकार शब्दही काढायला तयार नाहीत. कारण [illegible]य तर मतांचे राजकारण आहे. हा एकूण 'निवडक संवेदनशीलता' प्रकार संताप जनक आहे. जर अन्यायाला धर्माचा चष्मा लावून पाहिले जात असेल, तर याला 'सर्वधर्मसमभाव' म्हणायचे का? हा महत्त्वाचा प्रश्न पडतो.आजही काश्मीरमधील हिंदू आपल्याच देशात विस्थापित म्हणून जगत आहेत.

**अविनाश देशपांडे**

E-mail :-ytljanmadhyam@gmail.com

जनमाध्यम

एक प्रतिष्ठित सवय

## नगरपरिषदेच्या दुर्लक्षामुळे यवतमाळच्या डिव्हायडरवरील झाडे सुकण्याच्या मार्गावर

# सौंदर्यीकरणासाठी लावलेले वृक्षच तहानलेले!

**जनमाध्यम प्रतिनिधी**





यवतमाळ - हिवाळा संपताच उन्हाळ्याची चाहूल लागत असून सूर्याच्या तीव्र उष्णतेची दाहकता आता सर्वत्र जाणवू लागली आहे. अशा परिस्थितीत शहरातील वृक्षांचे महत्त्व अधिक वाढते. मात्र यवतमाळ शहरातील मुख्य रस्त्यांच्या मधोमध सौंदर्यीकरणासाठी लावण्यात आलेली झाडेच आज पाण्याअभावी सुकण्याच्या मार्गावर असल्याचे चित्र पाहायला मिळत आहे.

नगरपरिषदेच्या दुर्लक्षित धोरणामुळे ही झाडे अक्षरशः तहानलेली दिसत असून "वृक्ष लावा, वृक्ष जगवा" या घोषणेलाच एकप्रकारे तिलांजली दिली जात असल्याची भावना नागरिकांतून व्यक्त होत आहे. शहराचे सौंदर्य वाढावे आणि पर्यावरणाचे संतुलन राखले जावे या उद्देशाने नगरपरिषदेच्या वतीने शहरातील अनेक मुख्य रस्त्यांच्या मधोमध दुभाजक तयार करून त्यामध्ये मोठ्या प्रमाणावर वृक्षांची लागवड करण्यात आली. या कामासाठी मोठ्या प्रमाणावर निधीही खर्च करण्यात आला. पावसाळा आणि हिवाळ्यात या झाडांना नैसर्गिकरीत्या पाण्याची उपलब्धता असते. मात्र उन्हाळा सुरू होताच या झाडांच्या संगोपनासाठी नियमित पाणी देणे आणि देखभाल करणे अत्यंत आवश्यक ठरते. स्टेट बँक चौक, एलआयसी चौक, आर्णी रोड, दारव्हा रोडसह शहरातील अनेक मुख्य रस्त्यांवरील दुभाजकांमध्ये लावलेली झाडे सध्या कोमेजलेली दिसत आहेत. अनेक झाडांची पाने सुकली असून काही झाडे पूर्णपणे वाळण्याच्या अवस्थेत आली आहेत. या झाडांना नियमित पाणी देणे आणि त्यांची काळजी घेण्याची जबाबदारी नगरपरिषदेच्या संबंधित विभागांवर सोपविण्यात आली असतानाही प्रत्यक्षात मात्र त्याकडे दुर्लक्ष होत असल्याचा आरोप नागरिकांकडून केला जात आहे. नुकत्याच झालेल्या नगरपरिषद निवडणुकीत नव्या नगरसेवक व नगराध्यक्षांची निवड झाली आहे. शहराच्या विकासासाठी नवे प्रतिनिधी पुढाकार घेतील, अशी अपेक्षा नागरिकांना होती. मात्र शहराच्या सौंदर्यीकरणासाठी लावलेल्या झाडांकडेच दुर्लक्ष होत असल्याने नागरिकांमध्ये नाराजी पसरत आहे. "झाडे खरेदी करताना आणि लागवड करताना लाखो रुपयांचा खर्च केला जातो, पण त्यांचे संगोपन करण्याकडे दुर्लक्ष केले जाते. मग हा खर्च नेमका कोणासाठी?" असा सवाल नागरिक उपस्थित करत आहेत. दरम्यान मार्च महिन्यापासूनच उन्हाची तीव्रता वाढू लागली आहे. पुढील काही महिन्यांत उष्णतेचा कडाका अधिक वाढणार आहे. अशा वेळी शहरातील वृक्ष हे नागरिकांना सावली देण्याबरोबरच शुद्ध ऑक्सिजनचा महत्त्वाचा स्रोत ठरतात. त्यामुळे या झाडांचे जतन करणे ही केवळ प्रशासनाची जबाबदारी नसून पर्यावरण संवर्धनासाठी अत्यावश्यक बाब आहे.

मात्र प्रशासनाने याकडे वेळेत लक्ष न दिल्यास शहरातील अनेक झाडे उन्हाच्या झळांमध्ये नष्ट होण्याची भीती व्यक्त केली जात आहे. त्यामुळे या झाडांचे तात्काळ संगोपन करून त्यांना नियमित पाणी देण्याची व्यवस्था करण्यात यावी, अशी मागणी नागरिकांकडून होत आहे. अन्यथा या प्रश्नावर जनआंदोलन उभे करण्याचा इशाराही काही नागरिकांनी दिला आहे. शहराच्या सौंदर्यीकरणासाठी लावलेली ही झाडे जगली तरच यवतमाळचा हरित श्वास टिकून राहील, अन्यथा "वृक्ष लावा, वृक्ष जगवा" ही घोषणा केवळ कागदावरच राहण्याची भीती व्यक्त होत आहे.

# राळेगाव नगरपंचायतीत खळबळ


## नगरसेवकावरच रस्ता बळकावल्याचा आरोप, ७–८ महिन्यांपासून तक्रारी प्रलंबित!

**जनमाध्यम प्रतिनिधी**

राळेगाव - नगरपंचायत क्षेत्रात रस्त्यावर अतिक्रमण करून पक्के बांधकाम केल्याचा गंभीर आरोप नगरसेवकावरच करण्यात आल्याने शहरात मोठी खळबळ उडाली आहे. सामाजिक कार्यकर्ते वसंत कोमेजवार यांनी नगरपंचायत मुख्याधिकाऱ्यांना दिलेल्या लेखी तक्रारीत नगरसेवक बाळु उर्फ शशिकांत धुमाळ व त्यांची पत्नी सौ. प्रणाली शशिकांत धुमाळ यांनी लेआउट प्लॉटमधील निर्धारित जागेपेक्षा जास्त जागेवर अतिक्रमण करून लेआउटचा अर्धा रस्ता ताब्यात घेत पक्के बांधकाम केल्याचा गंभीर आरोप केला आहे.

तक्रारीनुसार, संबंधितांनी स्वतःच्या प्लॉटच्या मर्यादेबाहेर जाऊन अतिरिक्त जागेवर अतिक्रमण केले असून त्यामुळे लेआउटमधील सार्वजनिक रस्ता अर्धा कमी झाला आहे. या प्रकारामुळे परिसरातील नागरिकांना मोठा त्रास सहन करावा लागत असल्याचेही तक्रारीत नमूद करण्यात आले आहे. विशेष म्हणजे, या प्रकरणाबाबत मागील ७ ते ८ महिन्यांपासून नगरपंचायत प्रशासनाकडे वारंवार तक्रारी देण्यात आल्या, मात्र अद्याप कोणतीही ठोस व कायमस्वरूपी कारवाई करण्यात आलेली नाही, असा आरोप अर्जदारांनी केला आहे. उलट संबंधित व्यक्तींना पाठीशी घालून प्रकरण दडपण्याचा प्रयत्न होत असल्याचा संशयही त्यांनी व्यक्त केला आहे. तक्रारीत असेही नमूद करण्यात आले आहे की, या अतिक्रमणामुळे स्थानिक नागरिकांची मोठी गैरसोय होत असून सार्वजनिक रस्ता बळकावल्याने वाहतुकीस अडथळा निर्माण होत आहे. तरीही नगरपंचायत यंत्रणा, मुख्याधिकारी, बांधकाम अभियंता व इतर अधिकारी याबाबत ठोस भूमिका घेत नसल्याचे दिसत आहे. माहिती अधिकारांतर्गत मागविलेल्या माहितीलाही दोन ते तीन महिने उलटूनही उत्तर देण्यात आले नसल्याचा आरोपही करण्यात आला आहे. अर्जदारांनी नगरपंचायतीकडे मागणी केली आहे की, शासकीय मोजमाप करून निश्चित सीमारेषेपेक्षा जास्त असलेले अतिक्रमण तात्काळ हटवावे, रस्ता पूर्ववत खुला करावा आणि नियमबाह्य बांधकाम पाडण्यात यावे. तसेच संबंधित नगरसेवक व त्यांच्या पत्नीवर कठोर कायदेशीर कारवाई करून त्यांचे पद रद्द करण्याची प्रक्रिया देखील सुरू करावी, अशी मागणी करण्यात आली आहे. तक्रारीत आणखी एक धक्कादायक आरोप करण्यात आला आहे. शहरातील १५ ते २० ठिकाणी मोकळ्या जागांवर अतिक्रमण करून दुकाने भाड्याने देण्यात आली असून त्यातून दर महिन्याला साधारण २ ते अडीच लाख रुपये भाडे मिळत असल्याचा दावा करण्यात आला आहे. जर हे आरोप खरे ठरले तर हा प्रकार नगरपंचायत प्रशासनासाठी अत्यंत गंभीर मानला जात आहे. दरम्यान, या संपूर्ण प्रकरणामुळे राळेगाव शहरात चर्चांना उधाण आले असून नगरपंचायत प्रशासन आता काय भूमिका घेते आणि अतिक्रमणावर कारवाई करते का, याकडे नागरिकांचे लक्ष लागले आहे. नागरिकांमध्ये मात्र एकच प्रश्न उपस्थित होत आहे — सामान्य नागरिकांवर नियमांची कडक अंमलबजावणी करणारे प्रशासन लोकप्रतिनिधींवरही तितकीच कारवाई करणार का?

# • वेचक




## घाटंजीत बांधकाम कामगार महिलाचा विरांगणा सन्मान

घाटंजी - 8,03,2026 ला घाटंजी येथे जागतिक महिला दिनानिमित्त औपचारिकता साधून घाटंजी परिसरातील बांधकाम कामगार महिलांचा "विरांगणा सन्मानपत्र " देऊन गौरव करण्यात आला हा उत्स्फूर्त उपक्रम बांधकाम कामगार संघटना जि.अध्यक्ष महेश ठाकरे यांच्या संकल्पनेतून राबविण्यात आला. घाटंजी येथील बांधकाम कामगार संघटना कार्यालय येथे हा कार्यक्रम घेण्यात आला. यावेळी विशेष प्रमुख पाहुणे म्हणून रोज मजुरी करणारे ,बांधकाम कामगार ,वीटभट्टीवर काम करणारे मजूर, अशा महिला सौ मंगला राजू शेंडे, सौ संजीवनी कुणाल शेंडे, सौ योगिता विष्णू मडावी, सौ.सविता सुनील लेनगुरे ,सौ.रेखा अनिल वाडगुरे ,सौ. सोनू मनोज सलाम ,सौ.प्रीती विजय शेडमाके, सौ जोशना गजानन बावणे, सौ.मंदा दीपक जंगले, सौ लता धनराज सावरकर, सुनिता किरण राठोड, प्रामुख्याने उपस्थित होत्या. या सर्व प्रमुख महिलांना वीरांगणा सन्मानपत्र देऊन गौरव करण्यात आले कार्यक्रमाचे सूत्रसंचालन सौ दुर्गा गजानन करपते यांनी केल.ज्या कर्तुत्वान महिलांचा सन्मान करण्यात आला त्यामध्ये शेतमजुरी,घर काम करणे, वीटभट्टीवर काम करणारे, बांधकाम करणे व आपल्या पोटाची खळगी भागवणारे "हातावर आणून पानावर खाणारे "अशा या सर्व विविध क्षेत्रात काम करणाऱ्या महिलांचा यावेळी सन्मान करण्यात आला.

## अमेरिकेतील प्रख्यात सर्जन व लेखक डॉ. अतुल गावंडे यांची १० मार्च रोजी गावंडे महाविद्यालयास भेट

उमरखेड - येथील गोपिकाबाई सीताराम गावंडे महाविद्यालयाच्या संजीवक, मूळ भारतीय वंशाच्या रोटेरियन कै. डॉ. सुशीलाताई आत्मारामजी गावंडे यांचा अस्थिकलश घेऊन अमेरिका निवासी, प्रसिद्ध सर्जन व लेखक डॉ. अतुल गावंडे आणि सुकन्या प्रसिद्ध विधिज्ञ ॲड. सुमिता गावंडे १० मार्च रोजी भारतात येणार असून गावंडे महाविद्यालयात डॉ. सुशीलाताई गावंडे यांच्या अस्थिकलशाचे दर्शन,पूजन आणि श्रद्धांजली अर्पण कार्यक्रम आयोजित करण्यात आला आहे. गोपिकाबाई सीताराम गावंडे महाविद्यालयाचे संजीवक कै. डॉ. आत्मारामजी गावंडे आणि कै. डॉ. सुशीलाताई गावंडे यांनी गावंडे महाविद्यालयास आपले तिसरे अपत्य मानले होते. भरघोस आर्थिक मदत देऊन त्यांनी गावंडे महाविद्यालयाच्या विकासासाठी मदत केली होती. दि. १७ डिसेंबर २०२५ रोजी डॉ. सुशीलाताई गावंडे यांचे अमेरिकेत वास्तव्यास असताना दुःखद निधन झाले होते. आता त्यांचे सुपुत्र डॉ. अतुल आणि सुकन्या ॲड. समिता हे त्यांचा अस्थिकलश घेऊन गावंडे महाविद्यालयात येणार आहेत.

## सुराणा भवन येथे काँग्रेसचा मेळावा ; अनीस पोसवाल शहराध्यक्ष



पांढरकवडा - सुराणा भवन, पांढरकवडा येथे काँग्रेस पक्षाचा कार्यकर्ता मेळावा उत्साहात संपन्न झाला. या मेळाव्यात पदाधिकारी व कार्यकर्त्यांशी संवाद साधत त्यांच्या अडचणी व अपेक्षा जाणून घेण्यात आल्या. तसेच मतदारसंघातील विविध विकासात्मक विषयांवर सविस्तर चर्चा करण्यात आली. याप्रसंगी काँग्रेस पक्षात नव्या कार्यकर्त्यांचा पक्षप्रवेश करण्यात आला. तसेच संघटन बळकट करण्याच्या दृष्टीने नवीन पदाधिकाऱ्यांची नियुक्ती करण्यात आली. त्यामध्ये अनीस पोसवाल यांची काँग्रेस कमिटी शहर अध्यक्षपदी तर संतोष राऊत यांची युवक काँग्रेस शहर अध्यक्षपदी नियुक्ती करण्यात आली. कार्यकर्त्यांनी तळागाळातील प्रश्न प्रभावीपणे मांडण्यासाठी एकजुटीने काम करण्याचा निर्धार यावेळी व्यक्त केला. या मेळाव्यास माजी मंत्री ॲड. शिवाजीराव मोघे, आमदार वामनराव कासावार (वणी), जितेंद्रभाऊ मोघे (सरचिटणीस, यवतमाळ जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँक), ॲड. अनिल किनाके (अध्यक्ष, आदिवासी काँग्रेस कमिटी) यांच्यासह रामकृष्ण पाटील वंजारीकर, निमीष मानकर, अमर पाटील, ॲड. शेंडे, अनीस पोसवाल आदी मान्यवर उपस्थित होते.

# जागतिक महिला दिनानिमित्त POCSO कायद्यावर प्रशिक्षण कार्यशाळा

## जिल्हा परिषदेत केंद्रप्रमुखांसाठी विशेष मार्गदर्शन बाल संरक्षणाबाबत जनजागृतीवर भर

**जनमाध्यम प्रतिनिधी**



यवतमाळ - जागतिक महिला दिनाच्या औचित्याने जिल्हा परिषद यवतमाळ येथे 'बालकांचे लैंगिक अपराधापासून संरक्षण अधिनियम २०१२' (POCSO Act) या कायद्याविषयी एक दिवसीय प्रशिक्षण कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले. ही कार्यशाळा जिल्हा परिषद यवतमाळचे मुख्य कार्यकारी अधिकारी मंदार पत्की यांच्या संकल्पनेतून आयोजित करण्यात आली. जिल्हा बाल संरक्षण कक्ष, महिला व बाल कल्याण विभाग आणि शिक्षण विभाग, जिल्हा परिषद यवतमाळ यांच्या संयुक्त विद्यमाने जिल्हा परिषद सभागृहात जिल्ह्यातील सर्व केंद्रप्रमुखांसाठी या विशेष प्रशिक्षण कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले होते.

कार्यशाळेत 'बालकांचे लैंगिक अपराधापासून संरक्षण अधिनियम २०१२' (POCSO Act) मधील विविध तरतुदी, गुन्ह्यांचे स्वरूप, शिक्षेच्या तरतुदी, तसेच शिक्षकांची भूमिका आणि बाल संरक्षण यंत्रणेची ओळख याबाबत सविस्तर मार्गदर्शन करण्यात आले. मुख्य मार्गदर्शिका ॲड. ज्योती खांडपासोळे यांनी POCSO कायद्यांतर्गत गुन्हे, पोलीस प्रशासन, बाल कल्याण समिती (CWC), जिल्हा बाल संरक्षण कक्ष, चाईल्ड हेल्पलाइन तसेच संबंधित शासकीय विभागांच्या कामकाजाविषयी माहिती दिली. यावेळी उपस्थितांनी बालविवाह प्रतिबंधाबाबत शपथही घेतली.कार्यशाळेला उपमुख्य कार्यकारी अधिकारी (बा.क.) विशाल जाधव, शिक्षणाधिकारी प्रकाश मिश्रा, बाल कल्याण समितीचे अध्यक्ष वासुदेवराव डायरे, सदस्य अनिल गायकवाड व लीना आदे, शासकीय मुलांचे बालगृह व निरीक्षण गृहाचे अधीक्षक गजानन जुमळे तसेच परिविक्षा अधिकारी रवींद्र गजभिये आदी मान्यवर उपस्थित होते. या प्रशिक्षणाच्या माध्यमातून जिल्ह्यातील सर्व तालुक्यांमध्ये बाल लैंगिक शोषणाविरोधात जनजागृती करण्यासाठी आणि संरक्षणात्मक उपाययोजना राबविण्यासाठी अशा प्रकारच्या जनजागृती सत्रांचे आयोजन जिल्हा बाल संरक्षण कक्ष व शिक्षण विभागाच्या वतीने करण्यात येणार असल्याचे यावेळी सांगण्यात आले. आजच्या तंत्रज्ञानाच्या युगात आणि बदलत्या सामाजिक परिस्थितीत बालकांच्या सुरक्षिततेचा प्रश्न अधिक गंभीर बनत चालला आहे. अशा परिस्थितीत ही कार्यशाळा जिल्हा स्तरावर जनजागृती आणि क्षमता बांधणीसाठी महत्त्वपूर्ण ठरेल, असा विश्वास आयोजकांनी व्यक्त केला.या प्रशिक्षण कार्यशाळेच्या यशस्वितेसाठी जिल्हा बाल संरक्षण अधिकारी देवेंद्र राजुरकर यांच्यासह स्वप्नील शेटे, महेश हळदे, माधुरी पावडे, आकाश बुर्रेवार तसेच चाईल्ड हेल्पलाइनचे फाल्गुन पालकर, गणेश आत्राम, मनीष शेळके, पूजा शेलारे, पूनम कनाके आणि अश्विनी नासरे यांनी सहकार्य केले.

# लोहार लाईन पुसद येथे जिव घेणा हल्ला करनाऱ्या आरोपीस अटक

## पुसद शहर डी.बी.पथकाची कारवाई

**जनमाध्यम प्रतिनिधी**




पुसद - पोलीस स्टेशन पुसद शहर येथे दि.07/03/2026 रोजी अल्ताफ हुशेन अब्दुल अजिज चव्हाण रा.लोहार लाईन पुसद याने रिपोर्ट दिला की, तो त्याचे किराणा दुकाणात असताना त्यांचे किराणा दुकानात आलेल्या गि-हाईकास आरोपी बिलाल फारुक चव्हाण वय 25 वर्ष रा.अमराईपुरा सुभाषवार्ड पुसद याने वादकरुण मारहाण करीत असताना किराणा दुकाणदार अल्ताफ याने तु येथे गि-हाईकास का मारहाण करीत आहेस असे म्हटले असता आरोपी बिलाल फारुख चव्हाण याने तु कोण मेरे को बताने वाला असे म्हणुन फिर्यादी सोबत वाद घालुन तेरे को जान से खतम कर देता म्हणुन जिव घेना हल्ला करुण धारदार चाकुने छातीवर व हातावर वार करुण फिर्यादीस गंभीर जखमी केले फीर्यादीचे भाउ सोडवन्यासाठी आले असता त्यांना सुध्दा जिवाने मारन्याची धमकी दिली व आरोपीने हल्ला करुण घटनास्थळावरुण रात्रीला अंधाराचा फायदा घेवुन पसार झाला जखमीस वैद्यकीय उपचार करुण पो.स्टे.ला दिलेल्या रीपोर्ट वरुण कलम 109,118(1),351(2) (3) भारतीय न्याय संहिता प्रमाणे गुन्हा नोंद करुण गुन्हयाचा तपास पोउपनि अक्षय सनगर करीत आहे. गुन्हा गंभीर स्वरुपाचा असल्याने गुन्ह्यातील फरार आरोपीचा शोध घेन्या करीता ठाणेदार सेवानंद वानखडे यांनी लगेच रात्रीला डी. बी. पथक पुसद शहर यांना मार्गदर्शन करुण आरोपीस तात्काळ अटक करन्याचे आदेश दिले त्यावरुण डी. बी. पथक आरोपी शोध घेने कामी रवाना होवुन गोपनिय बातमीचे आधारे आरोपी हा पुस नदिचे बाजुला असलेल्या वाटर सप्लाई येथे दबा धरुण बसल्याची माहीती मिळाली त्यावरुन डी. बी. पथक पुसद सपोनि केदार, पो. हवा. मनोज कदम, पो.काँ. शुद्धोधन भगत, आकाश बाभुळकर यांनी सापळा रचुन आरोपीस चाहुल लागताच पळुन जात असताना मोठ्या शिताफीने पकडुन त्यास अटक करन्यात आली आहे.

सदरची कारवाई - पोलीस अधिक्षक, कुमार चिंता, अप्पर पोलीस अधिक्षक, थोरात, उपविभागीय पोलीस अधिकारी पुसद श्री. हर्षवर्धन बि.जे.साहेब यांचे मार्गदर्शनाखाली ठाणेदार सेवानंद वानखडे यांचे सुचने प्रमाणे स.पो.नि.प्रेमकुमार केदार, पोउपनि अक्षय सनगर, पो.हवा. मनोज कदम, पो, काँ, शुध्दोधन भगत, पो.काँ. आकाश बाभुळकर, सचिन राउत यांनी केली आहे.

# जागतिक महिला दिनी वणीत कष्टकरी महिलांचा सन्मान ; फळे व थंड पाण्याच्या बाटल्यांचे वाटप

**जनमाध्यम प्रतिनिधी**



वणी - जागतिक महिला दिनाचे औचित्य साधून वणी येथे धनोजे कुणबी महिला विकास संस्था आणि शारदा उत्सव समितीच्या वतीने कष्टकरी व गरजू महिलांचा सन्मान करण्यात आला. शारदा उत्सव समितीच्या अध्यक्षा संगीता संजय खाडे यांच्या पुढाकारातून श्रमजीवी महिला तसेच रुग्णालयातील माता-भगिनींना फळे व थंड पाण्याच्या बाटल्यांचे वाटप करून सामाजिक बांधिलकी जपणारा उपक्रम राबविण्यात आला.

कार्यक्रमाची सुरुवात छत्रपती शिवाजी महाराज चौक येथे शिवरायांच्या पुतळ्यास पुष्पहार अर्पण करून अभिवादनाने करण्यात आली. त्यानंतर संघटनेच्या पदाधिकाऱ्यांनी प्रत्यक्ष मैदानात उतरून उन्हातान्हात काम करणाऱ्या महिलांशी संवाद साधत त्यांना फळे व पाण्याच्या बाटल्या वितरित केल्या. ग्रामीण रुग्णालय, नगराळे हॉस्पिटल परिसर तसेच शिवाजी चौक परिसरातील भाजी विक्री करणाऱ्या महिलांसह रस्त्याच्या कडेला लघु व्यवसाय करून संसार चालवणाऱ्या महिलांचा यामध्ये समावेश होता. रणरणत्या उन्हात काम करणाऱ्या या महिलांना या उपक्रमामुळे मोठा दिलासा मिळाला. यावेळी सरकारी रुग्णालयातील प्रसूती झालेल्या महिला रुग्णांना देखील फळे व पाण्याच्या बाटल्या देण्यात आल्या. तसेच पोलीस स्टेशनमध्ये कार्यरत महिला कर्मचाऱ्यांचा शाल व पाण्याची बाटली देऊन गौरवपूर्ण सत्कार करण्यात आला. प्रतिकूल परिस्थितीतही स्वाभिमानाने जीवन जगणाऱ्या महिलांच्या श्रमांचा सन्मान करणे, हा या उपक्रमाचा मुख्य उद्देश असल्याचे आयोजकांनी सांगितले. या प्रसंगी धनोजे कुणबी महिला विकास संस्थेच्या अध्यक्षा सौ. साधनाताई गोहोकार, शारदा उत्सव समितीच्या अध्यक्षा सौ. संगीताताई खाडे, समिती सल्लागार किरणताई देरकर, वंदनाताई आवारी, अर्चनाताई बोधाडकर, कविताताई चटकी, साधनाताई मत्ते, स्मिताताई नांदेकर, प्रमिलाताई पावडे, हर्षाताई सपाट, वंदनाताई बल्की, कांचनताई देरकर, रिताताई पहापळे, अर्चनाताई पिदुरकर, वर्षाताई खाडे, शामाताई तोटावार, सीमाताई खाडे, सविताताई आवारी, सुरेखाताई ढेंगळे यांसह धनोजे कुणबी समाजातील महिला पदाधिकारी व कार्यकर्त्या मोठ्या संख्येने उपस्थित होत्या. वणी शहरात राबविण्यात आलेल्या या उपक्रमाचे सर्वत्र कौतुक होत आहे.

# यवतमाळच्या नवनिर्वाचित नगराध्यक्षा ॲड. प्रियदर्शनीताई उईके यांचा राळेगाव येथे भव्य नागरी सत्कार

**जनमाध्यम प्रतिनिधी**



राळेगाव - राळेगाव विधानसभा मतदारसंघाची लेक आणि यवतमाळ नगरपरिषदेच्या नवनिर्वाचित नगराध्यक्षा ॲड. प्रियदर्शनीताई अशोकरावजी उईके यांनी महाराष्ट्रातील प्रथम क्रमांकाच्या यवतमाळ नगरपरिषदेत प्रचंड मताधिक्याने विजय मिळविल्याबद्दल त्यांचा राळेगाव येथे भव्य नागरी सत्कार आयोजित करण्यात आला आहे. विविध सामाजिक, धार्मिक व व्यापारी संस्थांच्या संयुक्त विद्यमाने हा कार्यक्रम आयोजित करण्यात येत असून या सोहळ्याला मोठ्या प्रमाणावर नागरिकांची उपस्थिती राहणार आहे.

हा भव्य नागरी सत्कार रविवार दिनांक ८ मार्च २०२६ रोजी सायंकाळी ५ वाजता त्रिमूर्ती मंगल कार्यालय, वडकी रोड, राळेगाव येथे पार पडणार आहे. कार्यक्रमानंतर उपस्थितांसाठी स्नेहभोजनाचेही आयोजन करण्यात आले आहे. या कार्यक्रमाचे उद्घाटक विलासराव बापू भोयर (सचिव – ऑर्किड्स एज्युकेशन सोसायटी, नागपूर तथा संचालक – यवतमाळ जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँक) राहणार आहेत. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी दिपकराव एंबडवार राहणार असून ना. प्रा. डॉ. अशोकराव उईके यांची विशेष उपस्थिती लाभणार आहे. कार्यक्रमाला प्रमुख उपस्थिती म्हणून मा. भुपेंद्रजी कारिया, मा. शुभमताई इंगोले, मा. अशोकरावजी केवटे, मा. सौ. छायाताई पिंपरे, मा. अंकुशरावजी रामगडे, मा. रविंद्रजी शेराम, मा. गोपालबाबुजी कहूरुके, ॲड. प्रफुल्लभाऊ चौहान, मा. चित्तरंजनदादा कोल्हे, मा. नारायणरावजी काकडे, मा. अरविंदभाऊ वाढोणकर, मा. डॉ. ज्ञानेश्वरजी मुडे, मा. हरिभाऊजी पंढरपुरे, मा. मधुकररावजी गेडाम तसेच फिरोजभाऊ लाखानी यांची उपस्थिती राहणार आहे. राळेगाव शहरातील विविध संस्था, मंडळे व सामाजिक संघटनांच्या वतीने या नागरी सत्काराचे आयोजन करण्यात आले आहे. महिला सक्षमीकरण, विकासकामे आणि जनतेच्या प्रश्नांबाबत असलेली त्यांची बांधिलकी लक्षात घेता नागरिकांकडून हा सत्कार म्हणजे त्यांच्या कार्याचा गौरव असल्याची भावना आयोजकांनी व्यक्त केली आहे. राळेगाव परिसरातील नागरिकांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहून या सोहळ्याला यशस्वी करावे, असे आवाहन आयोजकांच्या वतीने करण्यात आले आहे.

# शहरात शेतमालाला उत्स्फूर्त प्रतिसाद

## थेट शेतकरी ते थेट ग्राहक उपक्रमाअंतर्गत विक्री

**जनमाध्यम प्रतिनिधी**

पांढरकवडा - शहरात थेट शेतकरी ते ग्राहक विक्री उपक्रमाअंतर्गत तालुक्यातील खैरगांव (देशमुख) येथील शेतकरी रविंद्र देशट्टीवार यांनी आपल्या शेतातील (विषमुक्त/सेंद्रीय) वायगाव हळद पावडर,ओली हळद लोणचं तयार करण्यासाठी,मोसंबी,शेतकऱ्यांकडून ग्राहकांना उपलब्ध करून दिला जात असल्यामुळे पांढरकवडा शहरात शेतमालाला ग्राहकांकडून उत्स्फूर्त प्रतिसाद मिळत आहे.रासायनिक खते व कीटकनाशकांशिवाय उत्पादित केलेला शेतमाल पांढरकवडा येथील बिरसा मुंडा चौक येथे स्टॉल लावून थेट शेतकरी ते ग्राहक उपक्रमाअंतर्गत विक्री करण्यात येत आहे.

थेट शेतकरी ते ग्राहक विक्री या उपक्रमामुळे ग्राहकांना आरोग्यदायी अन्न,तर शेतकऱ्यांना रास्त भाव मिळण्यास मदत होत आहे. मध्यस्थांना (दलाल) फाटा देऊन शेतकरी रविंद्र देशट्टीवार यांनी शेतातील (विषमुक्त/सेंद्रीय)आपला माल थेट ग्राहकांना विकत असुन ग्राहकांना परवडणाऱ्या दरात आणि शेतकऱ्यांना योग्य मोबदला मिळत आहे.गेल्या दोन वर्षांपासून शेतकरी रविंद्र देशट्टीवार यांनी शेतातील शेतमाल शहरात विक्री करीत असून ग्राहकांचा खूप छान प्रतिसाद मिळत आहे.शेतकरी रविंद्र देशट्टीवार यांनी आपल्या शेतात देशी गाईचे शेण गोमूत्रा चा वापर करून जीवामृत,घनजीवामृत,पिकाला देत आहे.पिकांवरील किडीच्या आळी च्या नियंत्रणाकरीता दशपर्णी अर्क,नीम अर्क,ब्रम्हास्त्र अर्क,चा वापर करीत आहे.बुरशीच्या नियंत्रण करीत आंबट ताक अर्क वापर करतो.रासायनिक खते व कीटकनाशकांशिवाय उत्पादित केलेला (विषमुक्त/सेंद्रीय) शेतमाल थेट शेतकऱ्यांकडून ग्राहकांना उपलब्ध करून दिला जात आहे.या उपक्रमामुळे ग्राहकांना आरोग्यदायी अन्न,तर शेतकऱ्यांना रास्त भाव मिळण्यास मदत होत आहे.जो लोकांचे आरोग्य उत्तम राखण्यासाठी आणि विषमुक्त अन्नाला प्रोत्साहन देण्यासाठी उपयुक्त ठरत आहे.

# विजेच्या लंपडावाने बागायतदार शेतकरी त्रस्त

**जनमाध्यम प्रतिनिधी**



महागाव - सवना वाकोडी वेणी शिवारात ऊस पिकाची मोठ्या प्रमाणात लागवड झालेली आसुन ऊस पिकाला ईतर पिकांच्या तुलनेत पाणी जास्त प्रमाणात लागते. त्यामुळे सहाजीकच विहीर, बोअरवेल, कॅनाल वरुन पाणी ऊपसा करुन सीचंन करावे लागते आणि या करिता पुरेसा वीज पुरवठा होणे आवश्यक आहे. सवना शिवारात या करीता 33 के.व्ही.केन्द्र सुध्दा कार्यरत आहे आणि सध्याच्या परीस्थितीत ऊन्हाचा पारा चढता असल्याने ऊस पिकाची पाण्याची गरज वाढली आसतांना केंद्रांवर ओव्हरलोड येत असल्याने दर तासाला विजेचा लपंडाव सुरू आहे. त्यामुळे परीसरातील बागायतदार वैतागून गेले आहेत.

सवना शिवारातील काही भाग गुंज येथील केंद्रावर जोडला गेला तिकडे सुध्दा सारखीच परिस्थिती असल्याने पिकांना पाण्याचा आजच खुप ताण सहन करावा लागत आहे. आणखी पुढे तर काय परिस्थिती ऊदभवेल या चीतेंत शेतकरी आहेत. याबाबत गोविंदराव देशमुख यांनी संबंधित अधिकाऱ्यांना चौकशी केली आसता गुजं ते सवना येणारी लिकं लाईन व बॅक कॅपेसिटर चे काम आपुर्ण अवस्थेत असल्याने सबस्टेशन ओव्हरलोड होत असल्याचे सांगण्यात आले. संबंधित अधिकाऱ्यांना लेखी निवेदन सादर करुन कळविण्यात येणार असल्याचे ऊस उत्पादक शेतकरी गोविंदराव देशमुख व ईतर शेतकऱ्यांनी आमचे प्रतिनिधीशी बोलताना सांगितले आहे.

# गोवंश जनावरांचे मांस विक्री करणाऱ्या ईसमावर पोलीस स्टेशन पुसद शहर पथकाची कारवाई!

**जनमाध्यम प्रतिनिधी**



पुसद - आज दि.08/03/2026 रोजी सकाळी ठाणेदार सेवानंद वानखडे सा.यांना गोपनिय बातमीदार मार्फत माहीती मिळाली की, ईसम नामे मोहम्मद आशिफ मोहम्मद तयव कुरेशी रा. गढीवार्ड पुसद गोवंश जना नराचे मांस विक्री करीता कटल्यामध्ये भरुण घेउन जात आहे असे मिळालेल्या माहीती वरुण सोबत पोलीस स्टॉप व पंच गडीवार्ड पुसद रोडवर सापळा लावुन थांबले असता एक ईसम कटल्यामध्ये प्लॅस्टीकचे फारीने झाकुन काहीतरी घेउन जात असताना दिसला त्यास पंचा समक्ष थांबवुन कटल्यात काय आहे याबाबत विचारणा केली असता बडे का गोश है असे सांगीतले.

त्यावरुण पंचासमक्ष नाव गाव विचारले असता त्याने त्याचे नाव मोहम्मद आशिफ मोहम्मद तयव कुरेशी रा.गढीवार्ड पुसद असे सांगीतले त्यावरुण त्यास गोवंश मास कटल्यासह ताब्यात घेउन पशु वैद्यकीय अधिकारी पुसद यांचे मार्फतीने सदर मास हे गोवंश जनावराचे आहे. किंवा कसे याबाबत तपासणी करुण पशुवैद्यकीय अधिकारी यांनी अहवाल दिल्याने सदर आरोपी विरुध्द कलम 5,5 बी. महाराष्ट्र प्राणि संरक्षण अधिनियम प्रमाणे गुन्हा नोंद करुण पुढील तपास पोउपनि रमेश इंगळे करीत आहे.

सदरची कारवाई-पोलीस अधिक्षक,कुमार चिंता, अप्पर पोलीस अधिक्षक, अशोक थोरात, एस.डी. पी.ओ. हर्षवर्धन बि.जे. साहेब यांचे मार्गदर्शनाखाली ठाणेदार सेवानंद वानखडे, सपोनि प्रेमकुमार केदार, पो.काँ. अमित पाटील यांनी केली आहे.

जनमाध्यम
एक प्रतिष्ठीत सवय

## संक्षिप्त

### हव्याप्रला जिंदा शहीद मनिंदरजीतसिंह बिट्टा यांची भेट



**अमरावती -** अखिल भारतीय दहशतवाद विरोधी मोर्चाचे अध्यक्ष तथा जिंदा शहीद म्हणून प्रख्यात असलेले मनिंदरजीतसिंह बिट्टा यांनी श्री हनुमान व्यायाम प्रसारक मंडळाला भेट देत मंडळाचे प्रधान सचिव पद्मश्री प्रभाकरराव वैद्य यांची भेट व त्यांचा आशीर्वाद घेतला. यावेळी पद्मश्री वैद्य साहेब यांचेसह मंडळाच्या सचिव प्रा. डॉ. माधुरीताई चेंडके, प्रा. दीपाताई कान्हेगावकर यांनी मनिंदरजीतसिंह बिट्टा, शिवसेना शिंदे गटाचे महाराष्ट्र मुख्य समन्वयक नानकरामजी नेभनानी त्यांचे पुष्पगुच्छ देऊन स्वागत केले. पद्मश्री देश व समाजाचे गौरव असून अमरावती शहराला भेट देतांना त्यांची थोडक्यात का होईना पण भेट घेण्याचे नियोजन फलीत झाले.हनुमान व्यायाम प्रसारक मंडळ केवळ संस्था नसून ते अखंड भारताचे स्वरूप असल्याचे गौरवद्गार त्यांनी काढले. विशेष म्हणजे, पद्मश्री वैद्य साहेब यांनी मनिंदरजीतसिंह यांचे स्वागत केले तेव्हा बिट्टा यांनीही पद्मश्रींचे स्वागत करीत त्यांचे आशीर्वाद घेतले. यावेळी या यशस्वी भेटीसाठी मंडळाच्या माजी विद्यार्थी संघाचे प्रा. आशिष हटेकर, डॉ. ललित शर्मा यांचे मोलाचे सहकार्य लाभले.

### राष्ट्रीय चर्मकार महासंघाची महिला आघाडी जाहीर



**अचलपुर** - राष्ट्रीय चर्मकार महासंघाचे संस्थापक राष्ट्रीय अध्यक्ष बबनराव घोलप माजी समाज कल्याणमंत्री यांच्या आदेशानुसार राष्ट्रीय चर्मकार महासंघाची अचलपूर येथे महिला जिल्हाध्यक्षा राधाताई कुरील यांच्या अध्यक्षतेखाली तसेच राष्ट्रीय चर्मकार महासंघाचे अमरावती जिल्हाध्यक्ष निलेश जामठे,जिल्हा संपर्कप्रमुख पी.बी.वनस्कर, शिक्षक आघाडीचे विदर्भ अध्यक्ष प्रा.गजानन वानरे,जिल्हा उपाध्यक्ष मनोहर कोथळकर, अचलपूर तालुका अध्यक्ष रामा लाहाळके, चिखलदरा तालुका अध्यक्ष सतिश घोरे,सामाजिक कार्यकर्ते दिलीप तायडे यांच्या प्रमुख उपस्थितीत पार पडलेल्या बैठकीमध्ये महिला कार्यकारणी नियुक्तीपत्र देऊन जाहीर करण्यात आली. यामध्ये अचलपूर महीला तालुका अध्यक्षा जयश्री निलेश डामरे,जिल्हा उपाध्यक्षा रश्मी रविंद्र भागवतकर,अचलपूर शहर अध्यक्षा पुष्पा आशिष भागवत,अचलपूर शहर उपाध्यक्षा दिपाली किशोर भागवतकर,अचलपूर शहर सचिव वर्षा गजानन सरोदे,अचलपूर शहर कोषाध्यक्षा वैशाली अमोल डामरे,अचलपूर शहर संघटका अल्का संजय भागवतकर,अचलपूर शहर कार्याध्यक्षा अंजली दिनकर भागवतकर,महिराबपुरा महिला कार्यकारणी मध्ये शाखा अध्यक्षा मोनू चेतन सरोदे,शाखा उपाध्यक्षा मीनाक्षी सुकेश भागवतकर,शाखा सचिव पूजा नरेंद्र गव्हाळे यांना नियुक्तीपत्र देऊन निवड करण्यात आली.

# शिरजगाव येथे विद्युत तारेच्या घर्षणाने २ एकरातील गहू जळला

## ■कर्ज काढून केली होती गव्हाची पेरणी ■शेतकऱ्याचे तब्बल दीड लाखांचे नुकसान

**तिवसा/ वार्ताहर**

कृषी पंपासाठी उभारण्यात आलेल्या विद्युत विभागाच्या नादुरुस्त लोंबत्या तारांमधून स्पार्किंग होऊन शिरजगाव मोझरी येथील अरविंद डफळ यांच्या शेतातील दोन एकरातील गहू जळून खाक झाला. शनिवारी दुपारी १२.४५ वाजेच्या दरम्यान ही घटना घडली दरम्यान शेजारच्या शेतकऱ्यांना आगीची माहिती मिळताच स्पिंकलरच्या सहाय्याने आणि शेतकऱ्यांनी हाताने गव्हाच्या पिकात लागलेली आग तब्बल अर्ध्या तासानंतर रोखण्यात त्यांना यश आले.

मात्र तोपर्यंत २ एकरातील गहू जळून खाक झाला.

अरविंद गोपाळराव डफळ यांचे मौजा कोळवण येथे रब्बीच्या पिकांमध्ये गव्हाची लागवड केली होती.

लागवडीसाठी कर्ज आणि ऊसनवारी घेऊन गव्हाची लागवड केली होती. येत्या ५ दिवसात गहू कापणीला आला होता. मात्र त्यापूर्वीच विद्युत विभागाच्या हलगर्जीपणामुळे



लोंबलेल्या तारांमधून स्पार्किंग होऊन आगीचे गोळे गव्हाच्या उभ्या पिकावर पडून पिक जळून खाक झाल्याने शेतकरी पुन्हा अडचणीत सापडले आहे.

लोंबलेल्या तारांच्या विरोधात शेतकऱ्यांनी अनेकदा तक्रारी केल्या आहे.

मात्र, विद्युत विभागाकडून याकडे दुर्लक्ष केले जात असल्याने इथून पुढेही अशा आगीच्या घटना होण्याची शक्यता आहे.

या घटनेनंतर विद्युत विभागाचे अभियंता मिश्रा यांनी घटनास्थळी येऊन मोक्का पंचनामा केला आहे. तर घटनेची तहसीलदार मयूर कळसे आणि तलाठी यांच्याकडे सामाजिक कार्यकर्ते प्रशांत कांबळे यांनी तक्रार केली आहे.

ज्यामध्ये विद्युत विभागाकडून कृषी पंपाच्या खांबावरील तारा दुरुस्ती करणे, ट्री कटिंग करणे आणि पीडित शेतकऱ्यांना तातडीने नुकसान भरपाई देण्याची मागणी केली आहे.

> कर्ज आणि ऊसनवारी घेऊन गव्हाची पेरणी केली होती. मात्र पिक हाती येण्यापूर्वीच पिक विद्युत विभागाच्या हलगर्जीपणामुळे जळले. तब्बल दीड लाखांचे नुकसान झाले आहे. त्यामुळे तातडीने हे नुकसान भरपाई देण्यात यावी.
>
> **अविनाश डफळ,**
> नुकसानग्रस्त शेतकरी

### मनीष पावडे यांचा विद्यापीठात दुहेरी पुरस्कार

**अमरावती -** गेली दहा-बारा वर्षापासून सरस्वती नगर व्हीएमव्ही निवासस्थानी आपल्या राहत्या घरी अंध अपंग दिन दुबळ्यांची सेवा करणाऱ्या पावडे परिवारातील मनीष पावडे यांना यंदाचा संत गाडगेबाबा अमरावती विद्यापीठाचा प्रतिष्ठेचा असा पुरस्कार प्राप्त झाला दहा हजार रुपये धनादेश स्मृतिचन्ह प्रमाणपत्र असा स्वरूपाचा हा पुरस्कार



व्यक्तिगत गटात त्यांना मिळाला.पुरस्कार घोषित झाल्याबरोबर डॉ. गोविंद कासट मित्र मंडळ तर्फे लड्ढा मॉल येथे मनीष पावडे यांचा त्यांच्या पत्नीसह सत्कार करण्यात आला. कुलगुरूंच्या हस्ते पुरस्कार त्यांना मिळाला त्यावेळी डॉ. गोविंद कासट हजर होते नंतर पावडे परिवाराच्या निवासस्थानी या पुरस्काराचा आनंद सोहळा साजरा केला तेव्हाही हजर होते. यावेळी त्यांनी सर्व समक्ष विद्यापीठाकडून मिळालेले आकर्षक स्मृतीचिन्ह मनीष व वैशाली पावडे व मातोश्री पुष्पाताई पावडे यांना त्यांनी व उमेश वैद्य यांनी भेट देत पुरस्काराचा पूर्व आनंद व्यक्त केला व मनीषा पावडे यांच्या पुरस्कारा कौतुकाचे हॅट्रिक पूर्ण केली. या पुरस्कारासाठी विद्यापीठाचे निवड समितीचे कुलगुरू डॉ. बाराहाते व स्व. बबनदादा मेटकर परिवारचे ही डॉ. गोविंद कासट यांनी अभिनंदन केले.

## नारीशक्तीचा गौरव

### बी.डी.एस. हायस्कूलमध्ये जागतिक महिला दिन साजरा

**चांदूर रेल्वे/ वार्ताहर**

बापूसाहेब देशमुख शिवाजी हायस्कूल व कनिष्ठ महाविद्यालय, चांदूर रेल्वे येथे जागतिक महिला दिन मोठ्या उत्साहात व प्रेरणादायी वातावरणात साजरा करण्यात आला. या कार्यक्रमाला शाळेचे प्राचार्य डॉ. अतुल ठाकरे अध्यक्ष म्हणून उपस्थित होते.

कार्यक्रमाला विशेष अतिथी व मार्गदर्शक म्हणून जिल्हा परिषद प्राथमिक शाळा चांदूरवाडीच्या मुख्याध्यापिका रेखा वडतकर, नेहरू शाळा चांदूर रेल्वेच्या शिक्षिका छाया बडगे, महिला महाविद्यालयाच्या प्राध्यापिका अनिता धुर्वे, तसेच प्रमुख अतिथी म्हणून एस. बी. देशमुख व शोभा उदापुरे यांची उपस्थिती लाभली. कार्यक्रमाची सुरुवात शिक्षणमहर्षी डॉ. पंजाबराव देशमुख यांच्या गौरवगीताने करण्यात आली. जागतिक महिला दिनाचे औचित्य साधून शाळेचे



प्राचार्य डॉ. अतुल ठाकरे यांच्या हस्ते प्रमुख अतिथी कर्तृत्ववान महिलांचा शाल, श्रीफळ, पुष्पगुच्छ व पुस्तके देऊन सत्कार करण्यात आला कार्यक्रमाचे प्रस्ताविक ज्येष्ठ शिक्षिका एस. बी. देशमुख यांनी केले. यावेळी काही विद्यार्थ्यांनी महिला दिनानिमित्त प्रभावी भाषणे सादर केली. तसेच इयत्ता ५ अ आणि ५ ब च्या विद्यार्थीनींनी नारीशक्ती या गीतावर सादर केलेल्या सुंदर नृत्याने उपस्थितांची मने जिंकली. तसेच विद्यार्थीनींनी डॉक्टर, इंजिनिअर, चित्रपट नायिका, सैनिक, पोलीस आणि पत्रकार अशा विविध वेशभुषेत येऊन महिलांची महती स्पष्ट केली. शेवटी अध्यक्षीय भाषणात डॉ. अतुल ठाकरे यांनी महिलांचे समाजातील योगदान अधोरेखित करत, आजची महिला कोणत्याही क्षेत्रात मागे नसून ती जिद्द, परिश्रम आणि आत्मविश्वासाच्या जोरावर प्रत्येक क्षेत्रात यश संपादन करत आहे, असे प्रेरणादायी विचार व्यक्त केले. कार्यक्रमाचे उत्कृष्ट नियोजन व प्रभावी संचालन घोरपडे यांनी केले, तर बनसोड यांनी आभार प्रदर्शन केले. या कार्यक्रमाला शाळेतील सर्व शिक्षक-शिक्षकेत्तर कर्मचारी व विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# राष्ट्रीय एकात्मता शिबिरामध्ये विद्यापीठ आठ कला प्रकारामध्ये प्रथम

**अमरावती/ क्रा.प्र.**

भारत सरकारच्या युवा कार्य व क्रीडा मंत्रालयाच्या निर्देशानुसार आदिकवी श्री महर्षी वाल्मिकी युनिव्हर्सिटी, सयचूर (कर्नाटक) येथे नुकतेच राष्ट्रीय एकात्मता शिबीर पार पडले. या राष्ट्रीय एकात्मता शिबीरामध्ये संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठाच्या राष्ट्रीय सेवा योजनेच्या चमूने बारा पैकी आठ कला प्रकारामध्ये प्रथम क्रमांक पटकाविला आहे.

शिबिरामध्ये सहा राज्यांच्या विविध विद्यापीठांतील एकूण १५० स्पर्धक सहभागी झाले होते. अमरावती विद्यापीठाशी संलग्नित महाविद्यालयातील १० स्वयंसेवक (५ मुले व ५ मुली) व चमू व्यवस्थापक सहभागी झाले होते. राष्ट्रीय सेवा योजनेच्या चमूला १२ कलाप्रकारांपैकी कल्चरल, मोनो ॲक्टींग, सिंगिंग, इन्स्टप्रमेंट, स्कीट, इंडियन फेस्टिव्हल,



इंडियन फोक डान्स, प्रोसेशन या आठ कलाप्रकारामध्ये प्रथम पुरस्कार प्राप्त झाला आहे. यामधील सिंगिंग इव्हेंटमध्ये सादर केलेल्या पोवाडयाच्या सादरीकरणावर रूपये अकरा हजारचा रोख पुरस्कार सुध्दा प्राप्त झाला आहे. चमूंमध्ये श्री शिवाजी कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय, अकोलाचा ऋषिकेश खरडे, भारतीय महाविद्यालय, मोर्शीचा कमलेश तंतरपाळे, सावित्री ज्योतिराव समाजकार्य महाविद्यालय, यवतमाळचा प्रणय अरुथे, नारायणराव नागरे महाविद्यालय, दुसरबिडचा ओम पवार, शासकीय औषध निर्माणशास्त्र महाविद्यालय, अमरावतीचा जय चत्रेश्वर, भारतीय महाविद्यालय, अमरावतीची भक्ती गायकवाड, श्री तुळशीरामजी जाधव कला आणि विज्ञान महाविद्यालय, वाशिमची सागर आठवले, बाबाजी दाते कला आणि वाणिज्य महाविद्यालय, यवतमाळचा सुहानी राठोड,पुंडलीक महाराज महाविद्यालय, चांदुररेल्वेची राधिका पांडव व शासकीय विदर्भ ज्ञान विज्ञान संस्था, अमरावतीचा साक्षी स्वर्गीय यांचा, तर स्वयंसेवक व चमूव्यवस्थापक म्हणून इंदिरा गांधी कला महाविद्यालय, राळेगावचे रासेयो कार्यक्रम अधिकारी डॉ. स्वप्निल गोरे यांचा समावेश होता.संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठाला राष्ट्रीय स्तरावर मिळालेल्या सर्वोच्च यशाबद्दल कुलगुरू डॉ. मिलींद बारहाते यांनी सर्व चमू व व्यवस्थापक यांचे भरभरून कौतुक व अभिनंदन केले. याप्रसंगी प्र-कुलगुरू डॉ. महेंद्र ढोरे, कुलसचिव डॉ. अविनाश असनारे, रा.से.यो. संचालक डॉ. निलेश कडू उपस्थित होते.

### छत्रपती शिवाजी महाराज समाधान शिबीरात ५४१ लाभार्थ्यांना सहभाग

**अमरावती/ क्रा.प्र.**

अमरावती तालुक्यातील वलगाव मंडळात छत्रपती शिवाजी महाराज समाधान शिबिर' उत्साहात पार पडले. सिकची रिसॉर्ट येथे आयोजित या शिबिरामध्ये शासनाच्या विविध लोककल्याणकारी योजनांचा लाभ एकाच छताखाली मिळाल्याने नागरिकांनी समाधान व्यक्त केले आहे.

या शिबिराचे आयोजन पालकमंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांच्या प्रमुख उपस्थितीत करण्यात आले. यावेळी आमदार राजेश वानखेडे, रवी राणा, विभागीय आयुक्त डॉ. श्वेता सिंघल आणि जिल्हाधिकारी आशिष येरेकर उपस्थित होते.

कार्यक्रमादरम्यान महसूल मंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांच्या कार्यकाळातील महत्त्वपूर्ण आणि लोकाभिमुख शासन निर्णयांचे वाचन करण्यात आले.या शिबिरात एकूण ५४१ लाभार्थ्यांना विविध विभागांतर्गत प्रमाणपत्रे, धनादेश, सात बारा उतारा आणि फेरफार पत्रांचे वाटप करण्यात आले. तसेच शिबिरात ६४ नागरिकांना ई-शिधापत्रिकांचे वाटप करण्यात आले.

रेवसा येथील पूरग्रस्तांना पुनर्वसन भूखंडांचे २२७ सात बारा उतारे देण्यात आले. तसेच ६८ विधवा आणि अपंग लाभार्थ्यांना श्रावणबाळ योजनेची प्रमाणपत्रे देण्यात आली. ६१ नागरिकांना अधिवास प्रमाणपत्रे प्रदान करण्यात आली. राज्य कृषी यांत्रिकीकरण योजनेअंतर्गत ६ लाभार्थ्यांना ट्रॅक्टरचे वाटप करण्यात आले. तसेच लेक लाडकी योजना, आयुष्मान गोल्डन कार्ड आणि पी.आर. कार्डचेही वाटप करण्यात आले.

कार्यक्रमाचे प्रास्ताविक अमरावतीचे उपविभागीय अधिकारी अनिल भटकर यांनी केले.

आभार प्रदर्शन तहसीलदार विजय लोखंडे यांनी मानले.

### दाभ्याच्या मशरूम उत्पादकांची यशोगाथा सह्याद्रीवर

*डॉ. अर्चना काकडे यांच्याशी नितीन भट साधणार संवाद*



**अमरावती/ का.प्र.**

बडनेरापासून जवळच असलेल्या दाभा येथील मशरूम उत्पादक महिलांची यशोगाथा दि. ११ मार्च रोजी संध्याकाळी ६ वाजता सह्याद्री वाहिनीवरील 'कृषिदर्शन' या कार्यक्रमात झळकणार आहे.

दुर्गापूर (बडनेरा) येथील साधना कृषी विज्ञान केंद्राकडून मार्गदर्शन घेत दाभा गावातील स्वाती कडू आणि रजनी वाठ या महिलांनी आपल्या घरीच मशरूम उत्पादनाचा उद्योग सुरू केला असून तो यशस्वी करून दाखवला आहे.

याशिवाय अमरावती येथील प्रमोद येवतीकर आणि वरुड येथील जय निकम या दोन युवकांनीदेखील याच कृषी विज्ञान केंद्रातून मार्गदर्शन घेत मशरूमपासून विविध पदार्थ तयार केले असून त्या पदार्थांची गाथाही या कार्यक्रमात दिसणार आहे.

कृषी विज्ञान केंद्राच्या गृहविज्ञान शाखेच्या विषय विशेषज्ञ डॉ. अर्चना काकडे यांच्या मार्गदर्शनाखाली या उद्योजकांनी ही प्रगतीची वाट सर केली असून डॉ. अर्चना काकडे यांच्याशी 'धिंगरी मशरूमचे उत्पादन आणि व्यवस्थापन' या विषयावर अमरावतीचे सुप्रसिद्ध निवेदक नितीन भट यांनी साधलेला संवाददेखील या कार्यक्रमातून बघायला मिळणार आहे.

या कार्यक्रमाचे कार्यकारी निर्माता मनोज जैन असून निर्मिती साह्य मिलिंद नेटके यांचे आहे.

सह्याद्री वाहिनीवरील कार्यक्रमाचा आस्वाद घेण्याचे आवाहन साधना कृषी विज्ञान केंद्र, दुर्गापूरचे वरिष्ठ शास्त्रज्ञ आणि केंद्रप्रमुख डॉ. के. पी. सिंग यांनी केले आहे.

# समाजशील मानव घडविण्यासाठी राष्ट्रसंताचा वैचारिक वारसा जपणे-आ. सुलभा खोडके

**अमरावती/ क्रा.प्र.**

राष्ट्रसंत तुकडोजी महाराज यांनी ग्रामस्वराज्य, सेवा, संस्कार आणि राष्ट्रभक्तीचा संदेश दिला. ग्रामीण संस्कृतीचा वारसा जपत राष्ट्रसंतांनी आपल्या ग्रामगीते तून आधुनिक भारताच्या वैचारिक परिवर्तनाचा पाया रचला. आजच्या युगात माणसाचे जीवनमान बदलत जात असतांना कुठे तरी माणूस हा समाजापासून हिरावला जात असल्याचे दिसत आहे. म्हणून समाजशील मानव घडविण्यासाठी आज राष्ट्रसंताचा वैचारिक वारसा जपणे आजची खरी गरज असल्याचे प्रतिपादन आ.सुलभा खोडके यांनी केले.

श्री गुरुदेव सेवाश्रम ट्रस्ट,राधा नगर, अमरावती येथे वंदनीय राष्ट्रसंत तुकडोजी महाराज यांचा ५७ वा पुण्यस्मृती महोत्सवाचे आयोजन करण्यात आले असता आ.सुलभा खोडके यांनी कार्यक्रमास उपस्थित राहून गुरुदेवांच्या चरणी मानवंदना अर्पण केली.

यावेळी सामुदायिक प्रार्थना, पूजन व समाज प्रबोधनाचे विविध सत्र आयोजित करण्यात आले होते.

यावेळी आ.संजय खोडके, गुरुदेव सेवाश्रम ट्रस्ट,राधा नगर,अमरावतीचे अध्यक्ष डॉ. सतीश तराळ, यश खोडके,



कीर्तन केसरी ह.भ.प.लक्ष्मणदास काळे महाराज, गुरुदेव सेवा मंडळाचे प्रचार विभाग प्रमुख गोपाल कडू, आदी मान्यवर प्रामुख्याने उपस्थित होते.

समाज परिवर्तना च्या प्रक्रियेत राष्ट्रसंतांच्या विचारांचा उपयोग कशा प्रकारे करून घेता येईल, याकडेच समाजशील मानवाने लक्ष देणेही तितकेच गरजेचे असून राष्ट्र संतांच्या विचारांचा त्यांच्या सेवाव्रताचा आणि राष्ट्र निर्माणाच्या मूल्यांची जोपासना करण्याचे आवाहन सुद्धा केले.या पुण्यस्मरण महोत्सवाला उपस्थित कीर्तन केसरी ह.भ.प.लक्ष्मणदास काळे महाराज यांनी वंदनीय राष्ट्रसंत तुकडोजी महाराज यांच्या ग्रामगीतेतील विचारांशी एकरूपता घेतल्यास सर्वांसाठीच संयम व शांततेचा मार्ग सुखमय होणार असल्याचे प्रवर्चन दिले. या महोत्सवाला ट्रस्टचे सचिव श्रीधरराव डाहाके, डॉ. दिलीप काळे, वसंतराव वंडलकर तसेच सर्वश्री शंकरराव वसु,ज्ञानेश्वरराव वानखडे,कृष्णराव पाचखंडे गुरुजी, प्राचार्य-रामकृष्णराव धारपवार,रामदासजी सदार, डॉ. श्रीधरराव जावरकर, आदींसह श्री गुरुदेव सेवाश्रम ट्रस्ट सर्व पदाधिकारी, विश्वस्त व समस्त गुरुदेव प्रेमी भक्त मंडळी उपस्थित होती.

# नारीशक्तीच्या हाती विकसित भारताची दोरी

**ज**गभरातील विकसित देशांत कामकाज आणि उद्योग क्षेत्रात महिलांचा सहभाग अधिक आहे. हे लक्षात घेता आपल्यालाही 'विकसित भारत २०४७'चे ध्येय गाठायचे असेल, तर देशाने महिलाशक्तीचा लाभ उचलणे क्रमप्राप्त आहे. यासाठी अर्थव्यवस्थेतील मा हिलांचा सहभाग ३५.६ टक्क्यांवरून ५० टक्क्यांपर्यंत नेण्याची गरज आहे. आर्थिक सक्षमीकरणामुळे स्त्री-पुरुष समानतेचे उद्दिष्टही साध्य होण्यास मदत होणार आहे.

जागतिक बँकेने जारी केलेल्या'बिकमिंग अ हाय इन्कम इकॉनॉमी इन अ जनरेशन' अहवालात २०४७ पर्यंत भारताला उच्च वेतन श्रेणी असणारा देश होण्यासाठी सरासरी ८ टक्के दराने विकास करावा लागेल, असे म्हटले आहे. या अहवालानुसार २०४७ पर्यंत विकसित भारताचे ध्येय गाठायचे असेल, तर देशाने महिलाशक्तीचा लाभ उचलला पाहिजे आणि यानुसार त्यांचा सहभाग ३५.६ टक्क्यांवरून ५० टक्के करायला हवा. आंतरराष्ट्रीय नाणेनिधी म्हणजेच 'आयएमएफ'च्या एका अंदाजानुसार, भारताची अर्थव्यवस्था २०२७ पर्यंत तिसऱ्या क्रमाकांची होऊ शकते. त्याचबरोबर पाच वर्षांत जागतिक विकासात भारताचे योगदान दोन टक्क्यांनी वाढू शकते. यानिमित्ताने एक प्रश्न पडतो तो म्हणजे, दहा वर्षांत भारताने असे काय केले की, आर्थिक विकासाची गती एवढ्या वेगाने वाढली. यामागचे सरकारचे आर्थिक धोरण असल्याचे सांगितले जात असेल, तर २०१४ च्या अगोदर आर्थिक विकासाला चालना देण्यासाठी रणनीती आखली गेली नव्हती का? स्वातंत्र्यप्राप्तीनंतर सहा दशकांपर्यंत ग्रामीण विकास आणि महिला कल्याण केंद्रित योजना कार्यान्वित झाल्या नाहीत का? अर्थात, योजना आकारास आणल्या आणि महिला स्वावलंबनासाठी अनेक योजनाही आल्या; परंतु महिला सक्षमीकरणाचा प्रश्न हा अनुत्तरीतच राहिला.

आर्थिक स्वावलंबनात महिला सशक्तीकरण अनिवार्य आहे; परंतु महिलांत 'स्व'त्त्व जोपर्यंत जागे होत नाही, तोपर्यंत ही बाब अशक्य आहे. आत्मसन्मानाच्या अभावामुळे अकार्यक्षमता आणि उदासिनतेचा जन्म होतो. अंधारात शौचासाठी सुरक्षित जागा शोधणे, चूल पेटविण्यासाठी जंगलात लाकडासाठी भटकंती करणे, पाण्यासाठी अनेक अंतर पायी चालणे, मासिक पाळीच्या काळात एखादा गुन्हा केल्याच्या भावनेतून दिवस व्यतीत करणे या गोष्टी एखाद्या संवेदनशील लेखाचा भाग नाहीत; परंतु हे महिलांचे रोजच्या जगण्यातील वास्तव आणि कटू सत्य होते आणि ते अमान्य करता येणार नाही.

जगभरातील आकड्यांचे आकलन केल्यास महिलाप्रणीत उद्योगांची संख्या वाढताना दिसते



आणि महिला कौटुंबिक उत्पन्न आणि राष्ट्रीय अर्थव्यवस्थेच्या विकासात मोलाचे योगदान देताना दिसतात. आर्थिक विकासाला चालना देण्यासाठी सूक्ष्म, लघू आणि मध्यम आकाराचे उद्योग (एमएसएमई) जागतिक अर्थव्यवस्थेच्या केंद्रस्थानी आहेत. 'इंटरनॅशनल फायनान्स कॉर्पोरेशन'च्या मते, एमएसएमई व्यवस्था ही जागतिक अर्थव्यवस्थेत ९० टक्क्यांपेक्षा अधिक व्यवसायाचे प्रतिनिधित्व करत असून ती एकूण मनुष्यबळांपैकी ७० टक्के जणांना रोजगार देण्याचे काम करते. भारताच्या जीडीपीत 'एमएसएमई'चे योगदान आर्थिक वर्ष २०१७-१८ मध्ये २९.७ टक्के होते आणि ते २०२२-२३ मध्ये ते ३०.०१ टक्के झाले आहे. पुरुषांचे वर्चस्व असलेल्या उद्योगांत देखील महिलांनी स्वतःचे स्थान निर्माण केले आहे. त्याचा पुरावा म्हणजे 'एमएसएमई'च्या एकूण नोंदणीत पुरुषांचे प्रमाण ५९.५२ टक्के असताना महिलांचे प्रमाण ४०.१० टक्के असणे.

जागतिक बँकेचा अभ्यास अहवाल 'फोस्टरिंग फॉर्मल ग्रोथ आंत्रप्रेन्योरशिप इन रुरल इंडिया?'च्या मते, महिलांची मालकी असणाऱ्या उद्योगाला चालना दिल्याने भारतात महिलाशक्तीचा सहभागाचा दर आणि आर्थिक विकासाला बूस्ट मिळू शकतो. अहवालानुसार, या क्षेत्रात युद्धपातळीवर प्रयत्न केले, तर २०३० पर्यंत महिलांवर्गाकडे देशभरातील ३,९५ कोटी उद्योगांची मालकी राहू शकते. बॅन अँड कंपनी आणि गुगलचा एक संयुक्त अहवाल 'वूमन आंत्रप्रेन्योरशिप इन इंडिया-पॉवरिंग द इकॉनॉमी विथ हर'च्या मते, भारतात २०३० पर्यंत महिला उद्योजिका या सुमारे १५ ते १७ कोटी रोजगारांची निर्मिती करू शकतात आणि हे प्रमाण नोकरदारांसाठी आवश्यक असलेल्या रोजगारांच्या २४ टक्क्यांपेक्षा अधिक आहे. भारताच्या विकासात ग्रामीण अर्थव्यवस्था महत्त्वाची असून विकसित भारताची संकल्पना साकार करण्यासाठी ही अर्थव्यवस्था मोलाची भूमिका बजावू शकते.

कामकाजाच्या ठिकाणी महिलांचा वाढता सहभाग हा आर्थिक विकासासाठी महत्त्वाचे आणि निर्णायक पाऊल ठरत आहे. महिलांचा वाढता सहभाग हा उत्पादकता वाढविण्यास, नवोन्मेषाला चालना देण्यास आणि आर्थिक स्थैर्य आणण्यात मोलाचे योगदान देत आहे. अर्थव्यवस्थेत महिलांची वाढते योगदान हे आकडेवारीपेक्षा अधिक असून ते एकप्रकारे सक्षम अर्थव्यवस्थेचे संकेत देत आहेत. त्याचवेळी शाश्वत आर्थिक विकासाला प्रोत्साहन आणि २०४७ पर्यंत विकसित भारताचा दृष्टिकोन अंगीकारण्यास महिलांचे विकासाभिमुख धोरण देखील कारणीभूत ठरत आहे. कामकाजाच्या ठिकाणी महिलांचा सहभाग वाढल्याने २०४७ पर्यंत विकसित देशाचे स्वप्न पूर्ण करण्याबरोबरच स्त्री-पुरुष सामनतेचे ध्येयदेखील साध्य होणार आहे. जगभरातील विकसित देशांत कामकाज आणि उद्योग क्षेत्रात महिलांचा सहभाग अधिक आहे, हे विसरता येणार नाही. राष्ट्रीय पातळीवर १५ मंत्रालयांतर्गत ७० केंद्रीय योजना या प्रामुख्याने उद्योगशीलता वाढविण्याचे काम करतात. शिवाय सरकारने महिला कामगारांच्या रोजगार क्षमतेत सुधारणा करण्यासाठी विविध योजना आणि उपक्रमांची अंमलबजावणी सुरू केली आहे. यात सर्वात महत्त्वाची पंतप्रधान कौशल्य भारत योजना याचा उल्लेख करता येईल. सुमारे नऊ कोटी महिला या राष्ट्रीय ग्रामीण उपजीविका मोहिमेनुसार स्वयंसहायता गटात सामील झाल्या आहेत.

**डॉ. ऋतू सारस्वत**

# आदिवासी महिलांचे समाजातील योगदान

**म**हिला दिन हा महिलांच्या हक्कांसाठी, समानतेसाठी आणि त्यांच्या योगदानाच्या गौरवासाठी महत्त्वाचा दिवस आहे. या दिवशी आदिवासी महिलांचे समाजातील योगदान आणि संघर्ष विशेषपणे लक्षात घेणे आवश्यक आहे. ८ मार्च १९०८ मध्ये अमेरिकेतील न्यूयॉर्क वस्त्रोद्योगातील हजारो स्त्रियांनी जमून कामाचे तास कमी करणे व सुरक्षितता इत्यादी मागण्या केल्या व निदर्शने केली स्त्रियांनी स्वतःच्या हक्कासाठी दिलेला हा पहिला लढा होता. सन १९१० आंतरराष्ट्रीय महिला परिषदेत क्लारा जेटगी यांनी आठ मार्च हा दिवस 'जागतिक महिला दिन' म्हणून साजरा करण्यात यावा हा ठराव मांडला व तो पास सुद्धा झाला. तेव्हापासून हा दिवस साजरा केला जातो हा दिवस महिलांच्या सन्मानाचा, त्यांच्या हक्कांचा आणि त्यांच्या योगदानाचा गौरव करण्याचा दिवस आहे. ग्रामीण शहरी महिलांप्रमाणेच आदिवासी समाजात महिलांची भूमिका अत्यंत महत्त्वाची आहे. आदिवासी महिला कुटुंब, शेती, जंगल आणि समाज यांची जबाबदारी सांभाळतात. त्या आपल्या परंपरा, संस्कृती आणि निसर्गाशी असलेले नाते जपतात. त्यांच्या कष्टामुळेच अनेक कुटुंबांचे जीवन चालते.



परंतु आजही अनेक आदिवासी महिलांना शिक्षण, आरोग्य आणि रोजगाराच्या संधी कमी प्रमाणात मिळतात. त्यामुळे त्यांना सशक्त करणे, त्यांना शिक्षण देणे आणि त्यांच्या हक्कांबद्दल जागरूक करणे ही समाजाची जबाबदारी आहे.आदिवासी महिला केवळ त्यांच्या कुटुंबाचा कणा नाही तर जल, जंगल, जमीन आणि परंपरांच्या रक्षक मानल्या जातात. जागतिक महिला दिनी आदिवासींच्या विशिष्ट संघर्षावर भर दिला जातो. दयमांती बारला यासारख्या अनेक आदिवासी महिलांनी जमिनीचे हक्क आणि त्यांच्या अस्तित्वासाठी लढा दिला. आदिवासी स्त्री ही निसर्गाशी नाते सांगणारी आणि आधुनिकतेकडे पाऊल टाकणारी एक जिद्दी शक्ती आहे. आता बऱ्यापैकी आदिवासी भगिनी शिक्षण घेत आहे व विविध क्षेत्रांमध्ये आपले नाव कमावत आहे. पूर्वी शेती व जंगलाशी संबंधित कार्य करणारी आदिवासी महिला आज वन अधिकारी, पोलीस, शिक्षिका इत्यादी क्षेत्रात आपली ओळख निर्माण करण्याचा प्रयत्न करीत आहे. परंतु सक्षमीकरणाच्या मार्गावर असूनही आजही आदिवासी भगिनींना शिक्षण आरोग्य मूलभूत सुविधा इत्यादींसाठी संघर्ष मात्र करावा लागतो. पण संघर्षाला घाबरेल तर ती आदिवासी भगिनी कुठली? आज स्थानिक स्वराज्य संस्थेच्या माध्यमातून विविध आदिवासी भागांमध्ये महिलांकरिता ३३ टक्के जागा आरक्षित करण्यात आल्या आहे. महिला सभापती, सरपंच आहे परंतु असे पाहायला मिळते की, या महिला फक्त नावापुरत्याच पद भूषवित आहे. मात्र याविषयीचे सर्व अधिकार एक तर त्या महिलेचा पती, गावातील पुरुष नागरिक किंवा इतर पुरुष वर्गाला असतात. याचे कारण आजही एकविसाव्या शतकामध्ये आपण पदार्पण केले असताना सुद्धा आदिवासी महिला राजकारणामध्ये तेवढी प्रभावी दिसून येत नाही. याचे कारण एक तर ती अज्ञानी,निरक्षर असते तिला बाहेरील जगाचे ज्ञान नसते आणि असल्यास पुरुषप्रधान समाजाचा पगडा सतत तिच्या डोक्यावर रेंगाळत असतो. त्यामुळे ती फक्त पुरुषांच्या हाती कटपुतली बनून राहते. (डॉ. के.बी. नायक २०१२) असो परंतु, राजकारणामध्ये ती आपले पाऊल टाकत आहे मतदान करीत आहे हा त्यामागचा एक सकारात्मक दृष्टिकोन आहे. आजच्या जागतिक महिला दिन सर्व स्त्री जातीचा तिच्या कर्तुत्वाचा सन्मान करूया तिच्या कलागुणांना वाव देऊया.

**डॉ. रोहिणी देशमुख**
अमरावती विद्यापीठ

# आजची महिला सुरक्षित आहे का ?

**जा**गतिक महिला दिन नुकताच पार पडला. भारतात या दिवसाची विशेष क्रेझ असते. आपल्या कर्तृत्वाने नावलौकिक मिळवलेल्या स्त्रियांचा या दिवशी विविध कार्यक्रमांतून, वृत्तवाहिन्यांतून, वृत्तपत्रांतून गौरव केला गेला. महिला दिनाच्या निमित्ताने ऑनलाईन विक्रीच्या संकेतस्थळांवरसुद्धा महिलांसाठी विशेष सवलती देण्यात आल्या होत्या. अनेक कंपन्यांच्या खासगी कार्यालयांतून महिला अधिकाऱ्यांचा गौरव केला गेला. हे सर्व पाहिल्यावर एक प्रश्न पडतो कि स्त्री ही केवळ एक दिवस गौरवण्याची बाब आहे का? या भारतभूमीचा, येथील प्राचीन हिंदू संस्कृतीचा अभ्यास केल्यास येथे स्त्रीला नेहमीच सर्वोच्च स्थान दिले गेल्याचे लक्षात येईल. हिंदू धर्मशास्त्राने स्त्रीला शक्तिरूप मानले आहे. कोणतेही कार्य असो वा संकल्प, त्यासाठी शक्ती अनिवार्य आहे. शक्तीविना कोणताही जीव अथवा वस्तू निर्जीव स्वरूप असते. शक्तीचा सन्मान करणारी या देशात ५१ शक्तिपीठे आहेत, त्यांतील साडेतीन शक्तिपीठे आपल्या महाराष्ट्रात आहेत. सज्जनांच्या रक्षणार्थ आणि दृष्टांच्या संहारार्थ शक्तीने आपले मारक रूप वेळोवेळी प्रकट करून असुरी शक्तीचा



विनाश केल्याचे आपण धार्मिक कथांतून, मालिकांतून वाचले आणि पाहिले आहे. ज्या दृष्ट शक्तींपुढे देवताही हतबल झाल्या अशांचा नाश देवींनी आपल्या अगाध सामर्थ्याने केला आहे. रामायण घडले ते माता सीतेच्या हरणामुळे, महाभारत घडले द्रौपदीच्या अपमानामुळे. स्त्रीचा सन्मान करण्याची आणि तिच्या रक्षणासाठी सर्वस्व पणाला लावण्याची शिकवण येथील संस्कृती आपल्याला देते.

गेल्या काही वर्षांमध्ये स्त्री अत्याचाराच्या घटनांमध्ये कमालीची वाढ झाली आहे. बलात्कार, विनयभंग, अपहरण, कौटुंबिक हिंसाचाराच्या घटनांमध्ये दिवसागणिक वाढ होत आहे. ज्यामध्ये महाराष्ट्र आघाडीवर आहे. शाळकरी मुलीच काय वृद्धाही वासनांधांच्या अत्याचारापासून वाचलेल्या नाहीत. राज्यातील प्रतिदिन होणाऱ्या स्त्री अत्याचाराच्या वाढत्या घटना मनाला अस्वस्थ करणाऱ्या आहेत. पोलीस असो, शिक्षण असो वा वैद्यकीय क्षेत्र कोणतेच क्षेत्र आज महिलांसाठी सुरक्षित राहिलेले नाही. ज्या क्षेत्रांवर महिला पूर्वी डोळे झाकून विश्वास ठेवत असत त्या क्षेत्रातही वासनांधांचा भरणा झाला आहे. स्त्रीच्या निर्बलतेचा फायदा घेऊन संधी साधण्यासाठी टपून बसलेल्या वासनांधांची संख्या समाजात वाढू लागली आहे. स्त्री अत्याचारविरोधी कायदे अधिक कठोर करूनही स्त्री अत्याचारांच्या घटनांमध्ये तिळमात्र घट न होता वाढच होत चालली आहे. पोलीस ठाण्यामध्ये नोंद झालेल्या गुन्ह्यांपैकी किती गुन्हे न्यायालयात तग धरतात आणि किती गुन्हेगारांना शिक्षा मिळते ? गुन्हेगारी कृत्यांना चाप बसण्यासाठी आणि गुन्ह्यांची मीमांसा करून गुन्हेगारांना दंडित करण्यासाठी देशात न्यायपालिका कार्यरत आहे; मात्र न्यायपालिकेचा रटाळ कारभार, यादरम्यान गुन्हेगारांना पुरावे नष्ट करण्यास मिळणारी मोकळीक, पोलिसांवरील राजकीय दबाव, पोलीस व्यवस्थेतील भ्रष्टाचार यांमुळे उशिरा मिळाला तरी तो न्याय असेलच याची शाश्वती नसते. स्त्री अत्याचारांच्या गुन्ह्यांमध्ये तत्परतेने आणि कठोर शासन केले गेले तरच गुन्हेगारांमध्ये भय निर्माण होते, हेच या प्रसंगातून सिद्ध होते. त्यामुळे स्त्री अत्याचाराचा चढता आलेख थांबवायचा असेल तर शिक्षाही स्वराज्याप्रमाणेच असायला हवी.

आजच्या स्त्रीपुढे कोण्या मॉडेलचा किंवा नटीचा आदर्श असून चालणार नाही. आजच्या स्त्रीपुढे आदर्श हवा आपल्या पराक्रमाने शत्रूला नामोहरम करणाऱ्या झाशीच्या राणीचा, अहील्याबाई होळकरांचा, वीरमाता जिजाऊंचा, राणी पद्मिनीचा आणि राणी चेन्नम्माचा. जेव्हा प्रत्येक स्त्री स्वतःचे रक्षण करण्यास सक्षम होईल, तेव्हा कोणाची हिम्मत होणार नाही तिच्याकडे वाकड्या नजरेने पाहण्याची. यासाठी प्रत्येक शाळेमधून मुलींसाठी स्वरक्षण प्रशिक्षणाचे नियमितपणे धडे दिले जावेत. येणाऱ्या प्रतिकूल प्रसंगाला कसे सामोरे जावे आणि त्याचा प्रतिकार कसा करावा याचे अद्यावत ज्ञान प्रत्येक मुलीला शालेय जीवनापासूनच दिले जावे. जेणेकरून आज नाहीतर येणाऱ्या काही वर्षांत याचे सकारात्मक परिणाम आपल्याला नक्कीच दिसतील. राज्य सरकरने यासाठी पुढाकार घेण्याची आवश्यकता असून स्वरक्षणासाठी सिद्ध होणाऱ्या मुली भविष्यात समाजातील वाढत्या स्त्री अत्याचारावर नक्कीच अंकुश आणू शकतात. ज्या दिवशी स्त्री अत्याचाराच्या आलेखला उतरती कला लागेल, ज्या दिनी स्त्रियांविषयी सन्मानाची भावना समस्त समाजात निर्माण होईल तोच खऱ्या अर्थाने महिला दिन असेल.

**जगन घाणेकर**
मुंबई

# विठू रखुमाय

## एक टक नाटक

**समीक्षण**

**म**हाराष्ट्र कामगार कल्याण मंडळ अंतर्गत, ७१ वा प्राथमिक नाट्य महोत्सव २०२५-२६. स्व.भाऊसाहेब लिमये सभागृह सिपना कॉलेज अमरावती, येथे रत्नाकर मतकरी लिखित विठो रखुमाय या दोन अंकी नाटकाचे सादरीकरण झाले. कर्तव्य व प्रेमाच्या निर्णयात देवाची फरफट करणारी भावनिक भांडवलाने गुंतलेली ही कथा 'सुंबरान'या धनगर गीताने सूत्रधार उकलत प्रसंगाचे दर्शन, प्रवेश दर प्रवेश करीत चालतो.



भानुसवाड्याचे मालक पंढरीनाथचे रूपक रूप पदुराणीच्या कथेची कहाणी, शिपाई उर्फ हुजऱ्या, दिवाण, प्रधान संवादाने राजाचा प्रवेश माळीराया ची फेरी येण्यावर चर्चा, स्वागताची तयारी व पदु राणीला सूचना करावी असा आदेश! पदु राणी व दासी सई संवादात दादला फुरसदी नाही? येथे सुहासिनी त्याची 'री'ओढत अल्पनृत. भरल्या घरात वनवासी ! ही पदुची देवाला कळवळनी. भक्तीदरबार राजाचे सर्वांना आवाहन !! माळीरायाचे स्वागत नियोजन. निरोप्यास राजा मोतीहार भेट माळ निघण्यास विलंब..

असा सर्व प्रसंग नाटकात सुरू असताना रटाळ संवाद, कुपोषित अभिनय आणि पौराणिक नाटकात बालनाटकाचे सादरीकरण असा प्रकार दिसायला आला.मुख्य भूमिकेचा राजा हाच चारित्र्याने देखणा पण अभियानात चकणा झाला.कारण संवाद फेक करताना चुकताच 'च्य' उच्चारून मंचावरचे भान निमिषभर हरपले.आधीच राज्य दरबारी नाटकाचे नेपथ्य नाही? त्यात कलावंतचे अभिनय पोकळ! त्यामुळे नाटकाचा प्रवास शिवशाई वातानुकूलित पण जुनाट बसगाडीने होत असल्यागत प्रेक्षकांचे मनोरंजन (मनोगत) होत असा आहे.

पदुराणी कच्च्या कानाची,सई मनाची! असा प्रसंग; भोळा विठुराया भक्ताची छाया, पण आड बायकोची माया असा थाटात नाटकाचे छंदातील संवाद.पाचशेजन खान्देशचा माळीराया घेऊन येईल, त्याचेसाठी रांधा करने हे राणी नाकारून, 'नवऱ्याचे मन जाणत नाही ती बायको कसली' या भावनेतून विठूराया वितूष्ण होतो.त्यावेळी भक्त अन् भगवान भेटीचा प्रसंगात विठुची धावपळीने एन्ट्री घोंगडे पांघरूण होते. तेव्हा प्रसंगात विदूषक दिसतो.वेषांतर करण्यात वेळ घेतला नाही; त्यामुळे देव हा चोर दिसला.त्यात राजा असून बराच अनवाणी राहिला. राजाचा थाट दिसलाच नाही.तुळशीचे पात्र उमटताना विठ्ठल भक्तीचे प्रारूप आणि बापाचा विरोध त्यावर विठ्ठलाची तुळशीला मागणी.याप्रसंगाने देवाला द्विभार्या पर्याय उपलब्धतेची ट्विश नाटकात दिसते. प्रसंग उभारताना नृत्यगीताने त्यात रंग भरण्याचा प्रयत्न. त्यामुळे रसिकत्व ठहराव. संगीत प्रसंग-प्रसंग तंत्र बिघडवत होते. कदाचित मनुष्य बाळाचा अभाव दिग्दर्शकाला असेल. मात्र नाटकात ठासूनठुसून एन्ट्री करणारी वेषधारी भरपूर होती. त्यामुळे ह्या नाटकाला वेशभूषा विभागाने सजावट दिली. कारण राजा त्याच्या राजवाडा नेपथ्य नसलेला होता. तुळशी तरुण अन् पदु वयान दिसत होती. त्यात राजा वेंधळलेला जाणवत. अशा तोऱ्यात नाटकाचा ओघ. मांत्रिक एन्ट्री सर्प मंत्र ऐवजी सर्प श्लोक! सई खलनायकीन हुबेहुब चारित्र्य. ती पदुच्या डायलॉगवर डोलत. तुळशीचा काटा कट करून मोतीहार निमित्त प्रसंगात एक स्पेशल पार्ट सजवून नाट्य खुलवता आले असते. संगीत व प्रकाशाची संधी साधण्याची संधी होती.

त्यामुळे दिग्दर्शक हे नाटक सजवण्यापासून वंचित दिसतो. बिंद्राबनात तुळशीच्या अंगणात बापाचा मृत्यू उत्तरार्धात तुळशीचे दिव्य सुद्धा सजवण्याचा प्रसंग हा सफसेल फसला. कारण नाटकाचे द्वंद पदु आणि तुळशी या भूमिकेतून प्रगट करताना विठूचा न्याय अभिनय उभारता आला नाही. घालमेल व क्रोधाच्या छटेला छाटले गेले.त्यामुळे नाटकातील रस भंग कायम जाणवले. पौराणिक नाटकात कल्पना विकासाला खूप स्कोप असतो. वेशभूषा करून घाशीराम कोतवाल नाटकाचे प्रसंग जसा सजवत नाट्य बहार करतो तसा याही नाटकात करण्याचा पुरेपूर स्कोप गमावला. माळीराया चारित्र्य धरून त्याचा आवाज त्याला साथीदार होता. पण त्याला उजेड अन् पार्श्व ध्वनीची अडचण गेली. पदुराणीचे शापित मरणे त्यावेळी जलदर्शनासाठी वापरलेले श्वेतवसन आयडिया छान होती. नेपथ्य इथे साकारण्याचा प्रयत्न प्रकाशने केला. पण बाजू बदलून घेता आली असती तर त्याचे नैपुण्य असते. रानातनिश्चित पडलेल्या राणीला व्याकळून गेलेला विठू (भुजंग) आणि तिचे आई वडील ह्यांची वेशभूषा वय दाखवताना मुलगी व आई वडील यांच्यात विषमता दिसून आली. मुलगी प्रौढ तर मायबाप जवान. येथे दर्यावती चे स्थान देवीप्रमाणे देखणे दर्शनीय होते ते अदलाबदल झाले असे वाटले. त्यामुळे चारित्र्य निवडीवर दिग्दर्शक कमजोर भरतो.

पद्मावतीचे पद्म आणि पंढरीत विसर्जन ही सेपरेट ठेवणे नाटकात शिखरबिंदू आहे. मात्र त्याला ही प्रसंगी बुलडोझर लागले. सर्व नाटक वेशभूषेने रंगमंचावर उमटले. हुजाऱ्याचे विनोद, प्रधान दिवाणची जुगलबंदी, सवतीची जळपोळ, चुगलीची जागा, प्रेम,भक्तीचा मिलाप आणि प्रसंगातून नृत्य शृंगाराचा धागा सूत्रधाराने दिग्दर्शकाचे सुईने सहज उठावदार नाटकाला शिवण्यासाठी वापरणारी लोककथा आधारित कथानक लेखनाने लिहिले. संगीत नाटक व आख्यानाची एकरूपता. पंढरीचे निमित्ताने दिसते. रुख्मिणी व विठोबाची १२ वर्षाची ताटातूट त्यांच्या विभक्त तेची निशाणी पंढरपुरात खानदेशचा माळीराया मंदिराचे रूपाने उभारतो.तुळशी व पद्म यांची पंढरीनाथशी नात जोडणारी कहाणी ङविठू रखुमायङ निमित्ताने दाखवण्यात आली.



प्रशांत गोडे निर्देशित शुभदा रणधीर, स्वामीनी कुलकर्णी, प्रशांत गोडे, अक्षय मुडे, बेबी सेवतकर, सतीश इसाळकर, लीना आदे, संदीप मिसळे, अश्विन मिरासे, रवी शेंडे, योगेश शेटे, जयश्री जतकर, नितीन जतकर महेंद्र गुल्हाने प्रतिमा, मोहन खिळापुरे, प्रियंका गोडे, राजेंद्र मंडळे, योगेश शेटे अशा भरगच्च कलावंताच्या सहभागाने उजेड शंतनु सोलव संगीत हिमांशू वेशभूषा-प्रियंका गोडे, रंगभूष-मुक्तरंग सोनटक्के शालीग्राम शेटे .नृत्यदिग्दर्शक पूर्वेश ईजगमवार. यांनी रत्नाकर मतकरी लिखित नाटकाचे सादरीकरण केले. प्रेक्षकांची उमेद आणि नाटकाचे सादरीकरण यात पंढरपूरची वारी पुन्हा चांगल्या सोयीने करून अशा टप्प्यात एक टक नाटक पाहून दिसले.

**कबीर फादर**
७७९८६४५५६५.


# डासांचा शहरावर कहर ; मनपा प्रशासन कुंभकर्णी झोपेत ?

## मलेरिया–डेंग्यूचा वाढता धोका ; करवसुलीत आघाडी, पण आरोग्य सुरक्षेत पिछाडी

■ प्रतिनिधी | अकोला ■

*शहरात गेल्या काही दिवसांपासून डासांचा प्रादुर्भाव मोठ्या प्रमाणात वाढला असून नागरिकांचे जगणे अक्षरशः हैराण झाले आहे. सायंकाळ होताच शहरातील विविध भागात डासांची भुणभुण वाढत असल्याने नागरिकांना घराबाहेर पडणे तर दूरच, घरातसुद्धा शांत बसणे कठीण झाले आहे. वाढत्या डासांमुळे मलेरिया, डेंग्यू यांसारख्या गंभीर आजारांचा धोका वाढला असून नागरिकांच्या आरोग्याचा प्रश्न ऐरणीवर आला आहे. मात्र या गंभीर परिस्थितीतही महानगरपालिका प्रशासनाकडून ठोस उपाययोजना होत नसल्याने प्रशासनाविरोधात नागरिकांमध्ये तीव्र नाराजी व्यक्त होत आहे.*

शहरातील अनेक भागात उघड्या नाल्या-गटारे, तुडुंब साचलेला कचरा आणि नदी पात्रात वाढलेली जलपर्णी यामुळे डासांच्या उत्पत्तीस पोषक वातावरण निर्माण झाले आहे. विशेषतः शहरातून वाहणाऱ्या मोर्णा नदीत मोठ्या प्रमाणात वाढलेली जलपर्णी डासांच्या वाढीस कारणीभूत ठरत असल्याचे नागरिकांचे म्हणणे आहे.



शहरातील काही भागात नालेसफाई नियमित होत नसल्याने साचलेल्या घाणीतून डासांची पैदास झपाट्याने वाढत आहे.

परिणामी नागरिकांना रात्री झोप लागत नसून लहान मुले, वृद्ध आणि आजारी व्यक्तींना याचा सर्वाधिक त्रास सहन करावा लागत आहे. अनेक कुटुंबांमध्ये ताप, अंगदुखी आणि सर्दी यांसारख्या आजारांची लक्षणे वाढू लागल्याने नागरिकांमध्ये भीतीचे वातावरण निर्माण झाले आहे. शहरात मलेरिया व डेंग्यूचा प्रादुर्भाव वाढण्यापूर्वीच मनपा प्रशासनाने तातडीने धुरीकरण, फॉगिंग आणि औषध फवारणीसह स्वच्छतेची व्यापक मोहीम राबविण्याची मागणी नागरिकांकडून जोर धरू लागली आहे.

मात्र वास्तव चित्र पाहता शहरातील अनेक भागात धुरीकरण किंवा औषध फवारणीचा कोणताही मागमूस दिसत नाही. मनपाच्या आरोग्य विभागाकडून डास नियंत्रणासाठी प्रभावी मोहीम राबविली जात नसल्याचा आरोप नागरिकांकडून केला जात आहे. त्यामुळे 'डासांचा त्रास वाढत असताना प्रशासन मात्र हातावर हात धरून बसले आहे का?' असा संतप्त सवालही नागरिक उपस्थित करीत आहेत.

### प्रभाग १ २ मध्ये नगरसेवक सागर भारुका यांचा पुढाकार

शहरात सर्वत्र डासांचा उच्छाद वाढलेला असताना प्रभाग क्रमांक १ २ मध्ये मात्र परिस्थिती काहीशी नियंत्रणात असल्याचे दिसून येत आहे. यामागे नगरसेवक सागर भारुका यांनी घेतलेला पुढाकार कारणीभूत ठरत आहे. नागरिकांच्या समस्या जाणून घेण्यासाठी ते नियमितपणे प्रभागात दारोदारी भेट देत असताना डासांचा त्रास वाढल्याचे त्यांच्या लक्षात आले. मनपा प्रशासनाकडून कोणतीही ठोस कारवाई होत नसल्याचे दिसून आल्याने त्यांनी स्वखर्चाने दोन फवारणी मशीन खरेदी करून संपूर्ण प्रभागात नियमित औषध फवारणी सुरू केली. या उपक्रमामुळे प्रभागातील डासांचा त्रास काही प्रमाणात कमी झाल्याचे नागरिक सांगत आहेत. परिणामी 'प्रशासनाने दुर्लक्ष केले तर लोकप्रतिनिधींनाच पुढे येऊन काम करावे लागते' अशी प्रतिक्रिया नागरिकांमध्ये उमटत आहे.

### नाल्या तुडुंब, कचऱ्याचे ढीग; रोगराईला निमंत्रण

शहरातील अनेक भागात नाल्या तुडुंब भरलेल्या असून जागोजागी कचऱ्याचे ढीग साचलेले दिसून येतात. पावसाळा नसतानाही काही भागात साचलेले पाणी आणि घाण यामुळे डासांची पैदास वाढत आहे. याशिवाय नदी पात्रातील जलपर्णीचा प्रश्नही गंभीर बनला आहे. या सर्व बाबींची माहिती प्रशासनाला असूनही प्रभावी उपाययोजना न केल्याने नागरिक संताप व्यक्त करीत आहेत. 'डासांमुळे त्रस्त झालेल्या नागरिकांच्या आरोग्याची जबाबदारी नेमकी कोण घेणार?' असा प्रश्नही आता उपस्थित होऊ लागला आहे.

### करवसुली जोरात, पण सुविधांवर मात्र बोंबाबोंब

आर्थिक वर्ष संपण्यास अवघे काही दिवस शिल्लक असताना महानगरपालिका प्रशासनाने करवसुलीचा धडाका लावला आहे. पाणीपट्टी व मालमत्ता कर वसुलीसाठी कर्मचारी थेट नागरिकांच्या दारात पोहोचत असून थकीत कर न भरल्यास मालमत्ता सील करण्याची कारवाईही केली जात आहे. मात्र दुसरीकडे शहरातील मूलभूत सोयीसुविधांची अवस्था दयनीय असल्याचे चित्र आहे. नालेसफाई, स्वच्छता, धुरीकरण, कचरा व्यवस्थापन या प्राथमिक कामांमध्ये मनपा प्रशासन अपयशी ठरत असल्याचा आरोप नागरिकांकडून केला जात आहे.

कर भरण्यासाठी नागरिकांवर दबाव आणला जात असताना त्यांच्या आरोग्य आणि सुरक्षिततेकडे मात्र प्रशासन दुर्लक्ष करीत असल्याची भावना शहरात निर्माण झाली आहे. परिणामी 'करवसुलीत आघाडी आणि सुविधांमध्ये पिछाडी' अशीच परिस्थिती अकोला शहरात पाहायला मिळत असल्याची चर्चा नागरिकांमध्ये रंगू लागली आहे.

# अभियानाच्या पहिल्या दिवशी चार हजारपेक्षा अधिक दाखल्यांचे वाटप

■ प्रतिनिधी | अकोला ■

जिल्ह्यातील नागरिकांच्या महसूल विभागाशी संबंधित दैनंदिन समस्यांचे निराकरण करण्यासाठी 'छत्रपती शिवाजी महाराज महाराजस्व समाधान शिबिर अभियान – टप्पा-१' राबविण्यात येत असून, अभियानाच्या पहिल्या दिवशी अकोला जिल्ह्यातील सर्व तालुक्यांत एकूण ७ महसूली मंडळ मुख्यालयी समाधान शिबिरांचे आयोजन करण्यात आले होते. जिल्ह्यातील अधिकाधिक नागरिकांनी त्याचा लाभ घ्यावा, असे आवाहन जिल्हाधिकारी वर्षा मीना यांनी केले होते . या आवाहनाला अकोला जिल्ह्यातील नागरिकांनी उत्स्फूर्त प्रतिसाद देऊन उपस्थिति नोंदवली व अभियानांद्वारे दिलेल्या सेवेचा लाभ घेतला



या शिबिरांमध्ये सात-बारा, नमुना-८, नामबदल, महसूल कर, वन-विभागाच्या मान्यता, नाहरकत प्रमाणपत्र, उत्पन्न दाखले, जात प्रमाणपत्र , श्रावण बाळ योजनेचा लाभ , संगायो योजना , पुरवठा विभागमार्फत रेशन कार्ड वाटप अशा अनेक महसूल आणि इतर सरकारी सेवांचा लाभ एकाच ठिकाणी प्रदान करण्यात आला. त्यामुळे शेतकरी बांधव व नागरिकांना कार्यालयात चकरा मारण्याची आता गरज राहणार नाही.

जिल्हाधिकारी श्रीमती वर्षा मीना यांच्या मार्गदर्शनात या शिबिरांचे आयोजन करण्यात आले होते. इतर शासकीय विभागही या अभियानामध्ये सहभागी झाले . त्यामुळे विविध दाखले, लाभ आदी मिळून प्रलंबित बाबींचे निराकरण होण्यास मदत झाली. अभियानाच्या पहिल्या दिवशी अकोला तालुक्यात दहीहंडा व घुसर , पातुर तालुक्यात आलेगाव , बाळापुर तालुक्यात उरळ , मुर्तीजापुर तालुक्यात जामठी , अकोट तालुक्यात मुंडगाव , तेल्हारा तालुक्यात पाथर्डी या ठिकाणी स्थानिक लोकप्रतिनिधींच्या उपस्थिती मध्ये शिबिरे आयोजित केली होती . अकोट तालुक्यातील मुंडगाव व तेल्हारा तालुक्यातील पाथर्डी येथील समाधान शिबिरांचे उद्घाटन अकोट-तालुका विधानसभा मतदारसंघाचे आमदार श्री. प्रकाश भरसाकळे यांनी केले. तर पातुर तालुक्यातील आलेगाव येथील शिबिराची सुरुवात अपर जिल्हाधिकारी श्री. प्रमोद गायकवाड यांच्या शुभहस्ते करण्यात आली. अभियानाच्या पहिल्या दिवशी अकोला जिल्ह्यात एकूण ४३२ फेरफार निकाली काढण्यात आले. संपूर्ण जिल्ह्यात एकूण २०० सात बारा अभिलेखामध्ये १५५ अंतर्गत दुरुस्ती करण्यात आली. अभियानांतर्गत पहिल्या दिवशी लाभार्थी यांला एकूण २३१२ सात-बारा वाटप , १८१७८-अ वाटप , एकूण ४८३६ विविध प्रमाणपत्रांचे वाटप वाटप करण्यात आले.

# मोर्णा नदीतील जलकुंभी काढण्याच्या कामाला सुरुवात

- महापौर शारदा खेडकर यांच्या हस्ते शुभारंभ
- डासांच्या वाढत्या प्रादुर्भावाच्या पार्श्वभूमीवर निर्णय

■ प्रतिनिधी | अकोला ■

शहराच्या मध्यभागातून वाहणाऱ्या मोर्णा नदीमध्ये मोठ्या प्रमाणावर जलकुंभी वाढू लागल्याने परिसरात डासांचा प्रादुर्भाव वाढत असल्याची नागरिकांकडून तक्रार होत होती. या पार्श्वभूमीवर अकोला महानगरपालिकेने मोर्णा नदीतील जलकुंभी काढण्याच्या कामाला शुक्रवारपासून सुरुवात केली.





महापौर सौ. शारदा रणजीत खेडकर व स्थायी समिती सभापती विजय अग्रवाल यांच्या निर्देशानुसार हे काम हाती घेण्यात आले. दि. ६ मार्च रोजी महापौर सौ. शारदा रणजीत खेडकर यांच्या हस्ते हार अर्पण करून व नारळ फोडून या कामाचा शुभारंभ करण्यात आला. यावेळी महानगर अध्यक्ष तथा नगरसेवक जयंत मसने, उपमहापौर अमोल गोगे, शहर सुधार आघाडीचे गटनेते पवन महल्ले, महिला व बालकल्याण समिती सभापती सौ. आरतीताई घोगलिया, माजी उपमहापौर तथा नगरसेविका सौ. वैशालीताई शेळके, नगरसेविका सौ. उषाताई वीरक, मंजुषाताई शेळके, अॅड. कल्पना गोटफोडे तसेच नगरसेवक नितीन ताकवाले उपस्थित होते.

तसेच सामाजिक कार्यकर्ते रणजीत खेडकर, संजय गोटफोडे, दीप मनवानी, सतीश मिरजामले यांच्यासह शहर सुधार आघाडीचे पदाधिकारी उपस्थित होते. महानगरपालिकेच्या मोटार वाहन विभागाचे प्रमुख अनिल बिडवे व शाम गाढे यांच्यासह इतर अधिकारी-कर्मचारीही यावेळी उपस्थित होते. मोर्णा नदीतील जलकुंभीमुळे पाण्याचा प्रवाह अडथळला जात असून दुर्गंधी व डासांची वाढ होत असल्याने नागरिकांकडून सातत्याने स्वच्छतेची मागणी केली जात होती. त्यामुळे महानगरपालिकेने ही मोहीम हाती घेतली असून नदीतील जलकुंभी काढून स्वच्छता करण्यात येणार असल्याचे प्रशासनाकडून सांगण्यात आले.

## 'प्रभात'च्या अर्णव ने दुचाकीसाठी विकसित केले पर्यावरण संवर्धनाचे वैशिष्ट्यपूर्ण उपकरण



■ प्रतिनिधी | अकोला ■

डॉ. होमी भाभा बालवैज्ञानिक स्पर्धेअंतर्गत अंतिम फेरीत निवड झालेल्या प्रभात किड्स स्कूलमधील इयत्ता सहावीचा विद्यार्थी अर्णव गोलोकार याने दुचाकी वाहनांमधून होणारे वायू प्रदूषण कमी करण्यासाठी एक अभिनव ई.जी.आर.( निष्कासित वायू पुनर्चक्रण प्रणाली ) उपकरण विकसित केले आहे. वाहने सिग्नलवर थांबलेली असताना किंवा आयडल मोडमध्ये असताना मोठ्या प्रमाणावर नायट्रोजन ऑक्साइडसारखे हानिकारक वायू वातावरणात सोडले जातात. या समस्येचा अभ्यास करून अर्णवने हे वैशिष्ट्यपूर्ण उपकरण तयार केले आहे.

अर्णवने विकसित केलेले हे उपकरण दुचाकी वाहनांमधून होणारे नायट्रोजन ऑक्साइडसारखे घातक वायूंचे उत्सर्जन कमी करण्यास मदत करणार आहे. विशेषतः वाहने सिग्नलवर थांबलेली असताना किंवा आयडल स्थितीत असताना निर्माण होणारे प्रदूषण कमी करण्यासाठी ही प्रणाली उपयुक्त ठरणार आहे. यामुळे केवळ ग्रीन हाऊस गॅसेसचे प्रमाण कमी होणार नाही, तर वाहनांमधून निर्माण होणारी अतिरिक्त उष्णताही कमी होण्यास मदत होणार आहे.

लहान वयात पर्यावरण संवर्धनाचा विचार करून तयार केलेल्या अर्णवच्या या नावीन्यपूर्ण संशोधनाला प्रभात किड्स स्कूलचे संस्थापक संचालक डॉ.गजानन नारे, संचालिका सौ. वंदना नारे, प्राचार्य वृषाली वाघमारे, परीक्षा विभाग प्रमुख व्ही. अनुराधा यांचे कुशल मार्गदर्शन लाभले आहे.

## महिला आयोगाचा राज्यस्तरीय पुरस्काराने जनाई निराधार वृद्धाश्रमाचा गौरव

### अकोट तालुक्याच्या शिरपेचात आणखीन एक मानाचा तुरा




■ प्रतिनिधी | अकोला ■

सातपुड्याच्या पायथ्याशी असलेल्या वसाळी नागापूर बोर्डी येथे कार्यरत असलेल्या जनाई निराधार वृद्धाश्रमाला महाराष्ट्र राज्य महिला आयोगाचा राज्यस्तरीय पुरस्कार देऊन सन्मानित करण्यात आले. सामाजिक क्षेत्रात निराधार, बेघर आणि अनाथ नागरिकांसाठी निस्वार्थ सेवा देणाऱ्या या संस्थेच्या कार्याची दखल घेत हा सन्मान प्रदान करण्यात आला.

मुंबईतील प्रभादेवी येथील रवींद्र नाट्य मंदिर येथे ७ मार्च रोजी जागतिक महिला दिनानिमित्त आयोजित कार्यक्रमात महाराष्ट्राच्या उपमुख्यमंत्री ना. सुनेत्रा अजित पवार यांच्या हस्ते हा पुरस्कार प्रदान करण्यात आला. यावेळी महाराष्ट्र राज्य महिला आयोगाच्या अध्यक्षा रुपालीताई चाकणकर, महिला व बालविकास मंत्री आदिती तटकरे तसेच सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री मेघना बोर्डीकर यांची प्रमुख उपस्थिती होती. अकोला येथील प्रीतीसागर बहुउद्देशीय संस्था संचालित जनाई निराधार वृद्धाश्रम गेल्या काही वर्षांपासून नागापूर बोर्डी परिसरात निराधार, बेघर आणि अनाथ नागरिकांना निवारा, अन्न व मूलभूत सुविधा निशुल्क उपलब्ध करून देत आहे. या सेवाभावी कार्यामुळे संस्थेची समाजात वेगळी ओळख निर्माण झाली आहे. सन २०१४ पासून प्रीतीसागर बहुउद्देशीय संस्था विविध सामाजिक उपक्रम राबवत असून बेघर व निराधार नागरिकांना मदत, विद्यार्थ्यांना शालेय साहित्य वाटप, वृक्षारोपण, महिलांवरील अन्याय-अत्याचारांविरोधात लढा तसेच बालकांना कायदेशीर मार्गदर्शन अशा अनेक उपक्रमांद्वारे समाजसेवा केली जात आहे.

या कार्याची दखल घेत संस्थेचे अध्यक्ष जनार्दन जामनिक, सचिव एस्तेर जामनिक, कोषाध्यक्ष सुदेश रजाने तसेच विक्की वाकोडे, समीर स्वामी आणि श्रीकांत शिरसाट यांचा राज्यस्तरीय पुरस्कार देऊन गौरव करण्यात आला.

दरम्यान, महिला शक्तीचा गौरव करणाऱ्या या कार्यक्रमात महिला सक्षमीकरणासाठी उल्लेखनीय कार्य करणाऱ्या व्यक्ती व संस्थांचा सन्मान करण्यात आला. तसेच महाराष्ट्र राज्य महिला आयोगाच्या 'महिला सन्मान पोर्टल'चे अनावरण, आयोग कार्यालयातील 'सायबर वेलनेस' कक्षाचे उद्घाटन आणि 'आत्मसन्मानाच्या वाटा' या पुस्तक व भित्तीपत्राचेही अनावरण करण्यात आले.

## पाटील समाज महिला मंडळातर्फे ११ मार्चला महिला दिन कार्यक्रम

■ प्रतिनिधी | अकोला ■

पाटील समाज महिला मंडळ, अकोला यांच्या वतीने जागतिक महिला दिनानिमित्त बुधवार, दि. ११ मार्च २०२६ रोजी विशेष कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले आहे. हा कार्यक्रम स्थानिक जुन्या आरटीओ कार्यालयासमोरील मराठा सेवा संघाच्या सभागृहात दुपारी ४ वाजता होणार आहे.

कार्यक्रमाला अकोला महानगरपालिकेच्या महापौर सौ. शारदा खेडकर या प्रमुख अतिथी म्हणून उपस्थित राहणार आहेत. महिला सक्षमीकरणाचा संदेश देणाऱ्या या कार्यक्रमात महिलांसाठी पाककला स्पर्धेसह विविध उपक्रमांचे आयोजन करण्यात आले आहे.

या कार्यक्रमास समाजातील महिलांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहून सहभाग नोंदवावा, असे आवाहन पाटील समाज महिला मंडळाच्या अध्यक्षा वैशाली बहाकर, कार्याध्यक्षा रूपाली नाकट, सचिव अॅड. दिपाली जानोरकर, जिल्हा संघटिका सरिता वाकोडे, उपाध्यक्षा अर्चना पाटील, मुख्य मार्गदर्शिका प्रा. डॉ. ममता इंगोले, कोषाध्यक्षा स्वाती बारब्दे तसेच संगीता ताथोड, सोनाली मोरे, वर्षा पोरे, संगीता दाळू, संगीता वानखडे, रेणुका पाथ्रीकर, सुमित्रा काकड, वनमाला ठाकरे व जयश्री राऊत यांनी केले आहे.

## बुध्दीबळ, कॅरम व टेबल टेनिस स्पर्धेतील मातृशक्तीचा गौरव

**अकोला :** स्थानिय गोरक्षण रोड येथील ब्रिलियंट चेस अकादमी व प्रो कोड अकादमीच्या वतीने जागतिक महिला दिनावर महिलासाठी मोफत बुध्दिबळ,कॅरम व टेबल टेनिस स्पर्धेचे आयोजन केले होते. यास मातृशक्तीनी उत्स्फूर्त प्रतिसाद दिला.या आगळ्या वेगळ्या स्पर्धांचा प्रारंभ प्रो कोड अकादमीच्या संस्थापिका वर्षा पटेल, एसओएस शाळेच्या प्राचार्या डॉ श्वेता दिक्षीत, जीवन प्रेरक सौ कविता खंडेलवाल, प्रशिक्षक जितेन्द्र अग्रवाल यांच्या हस्ते करण्यात आला.

# टिप्परच्या कटमुळे एसटी बसचा अपघात; सुदैवाने ४० प्रवाशांचे प्राण बचावले

■ प्रतिनिधी | हिवरखेड ■

अकोट–हिवरखेड राज्य मार्गावर भरधाव टिप्परने अचानक कट मारल्यामुळे एसटी बस अपघातग्रस्त होण्याची घटना घडली. बस रस्त्याच्या कडेला जाऊन मातीत अडकली आणि पलटी होता होता थांबली. या बसमध्ये सुमारे ४० प्रवासी प्रवास करत होते. सुदैवाने कोणतीही जीवितहानी झाली नाही आणि सर्व प्रवासी सुरक्षित बचावले.



मिळालेल्या माहितीनुसार, अकोट–हिवरखेड राज्य मार्गाचे नूतनीकरणाचे काम अनेक महिन्यांपासून सुरू आहे. त्यामुळे अनेक ठिकाणी रस्ता खोदलेला असून वाहनांची मोठ्या प्रमाणात वर्दळ आहे. जड टिप्पर, यंत्रसामग्री आणि इतर वाहनांमुळे रस्त्यावर मोठ्या प्रमाणात धूळ उडत असून वाहनचालकांना समोरचे नीट दिसत नाही, अशी परिस्थिती निर्माण झाली आहे.

दरम्यान, अकोटवरून जळगाव जामोदकडे जाणारी एसटी बस (क्र. एमएच ४० ए क्यू ६३३५) खंडाळा व चितलवाडी फाट्यादरम्यान पोहोचली असताना एका भरधाव टिप्परने बसला कट मारला.

त्यामुळे चालकाचे बसवरील नियंत्रण सुटताच बस रस्त्याच्या कडेला उतरली आणि ८४ खेडी योजनेच्या पाईपलाईनजवळील मातीत अडकली. बस तिरकी होऊन काही चाके हवेत गेल्याने बस पलटी होण्याची भीती निर्माण झाली होती. मात्र चालकाच्या प्रसंगावधानामुळे मोठा अनर्थ टळला. घटनेनंतर बसमधील प्रवाशांमध्ये एकच घबराट उडाली. अपघाताची माहिती मिळताच गोपाल शालिग्राम वानखडे, अमोल पिसोडे, अक्षय ढोकणे, प्रसाद दही यांसह स्थानिक नागरिकांनी तातडीने घटनास्थळी धाव घेत प्रवाशांना सुरक्षितपणे बाहेर काढण्यास मदत केली. तसेच पोलिस व संबंधितांना घटनेची माहिती देण्यात आली. दरम्यान, अकोट–हिवरखेड–जळगाव जामोद मार्गावर सुरू असलेल्या रस्त्याच्या कामामुळे धूळ व वाहतुकीचा त्रास वाढला आहे. त्यामुळे रस्त्याचे काम तातडीने व दर्जेदार पद्धतीने पूर्ण करण्याबरोबरच धूळ कमी करण्यासाठी नियमित पाणी मारणे, खोदकाम टप्प्याटप्प्याने करणे तसेच सुरक्षेच्या आवश्यक उपाययोजना कराव्यात, अशी मागणी वाहनचालक व नागरिकांकडून केली जात आहे.

जनमाध्यम
जनमाध्यम न्युज अँड पब्लीकेशन प्रा.लि.च्या मालकीचे हे वृत्तपत्र मुद्रक, प्रकाशक प्रदीप देशपांडे यांनी प्लॉट नं. बी -५०, सातुर्णा औद्योगिक वसाहत, बडनेरा रोड, अमरावती-४४४६०७ येथे छापून बी-२४ दोरकर हाऊस, महसुल कॉलनी, एसटी स्टॅण्डच्या मागे अकोला - ४४४००१ येथे प्रकाशित केले.

**संपादक - प्रदीप देशपांडे**
संचालक (वृत्त) - अभिराम देशपांडे
(Responsible for selection of News Under PRB Act)

**अकोला आवृत्ती वर्ष - ३० अंक ९८**
आर.एन.आय.रजी.नं. MAHMAR/1997/04048 पोस्टल लायसन क्र. AKL/HO/03/2004

**मुख्य कार्यालय :–** अंबापेठ, राजकमल चौक, अमरावती - ४४४६०१
फोन - ९८२३०१६३००, ९४२२९५६२६८
ई-मेल - atimadhyam@gmail. com, abhiram.deshpande70@gmail.com

## सुपर स्पेशलिटी हॉस्पिटल येथे ६८ वी किडनी प्रत्यारोपण शस्त्रक्रिया

# वडिलांनी किडनी देऊन वाचविले मुलाचे प्राण

**अमरावती/प्रतिनिधीः-** स्थानिक विभागीय संदर्भ सेवा रुग्णालय ( सुपर स्पेशलिटी) हॉस्पिटल अमरावती. येथे ६८ वी किडनी प्रत्यारोपण शस्त्रक्रिया पूर्ण करण्यात आली.

सदर रुग्ण हा अडीच वर्षांपासून किडनी आजाराने त्रस्त असल्याने त्यासाठी बाहेर उपचार पद्धती चालू होती व काही वर्षांपासून डायलिसिस करत होता . तेव्हा डॉक्टरांनी रुग्णास व त्याच्या कुटुंबीयास किडनी प्रत्यारोपण विषयी माहिती दिली व विभागीय संदर्भ सेवा रुग्णालय ,अमरावती येथे महात्मा ज्योतिराव फुले जन आरोग्य योजनेच्या माध्यमातून होत असलेल्या यशस्वी व विनामूल्य शस्त्रक्रिया यासाठी रुग्ण विविध जिल्ह्यांमधून नव्हे तर इतर राज्यामधून सुद्धा येत असतात याविषयी महिती दिली. रुग्णालयात झालेले ६८ वे किडनी प्रत्यारोपण, हे ३७ वर्षीय सचिन विजय जयस्वाल यांची शस्त्रक्रिया यशस्वीरित्या पूर्ण करण्यात आली आहे. सदर रुग्ण हा मु अंजनखेड ता. अरनी, जि. यवतमाळ येथील रहिवासी असुन मागील काही वर्षापासून डायलिसिस चालु होते मात्र डायलिसिस यावर दीर्घकाळ उपाय नसून व होणारा त्रास बघुन किडनी प्रत्यारोपण हा यावरील योग्य उपाय आहे, असे जेव्हा डॉक्टरांनी सांगितले त्यावेळी मुलाच्या पुढील भविष्याचा विचार करून वडील विजय प्रीतमलाल जयस्वाल (६६) यांनी आपली एक किडनी मुलगा सचिन ला देण्याचा निर्णय घेतला, व आपली एक किडनी सचिन ला देऊन त्याला नवीन जीवन दिले.महात्मा ज्योतिराव फुले जन आरोग्य योजने अंतर्गत शस्त्रक्रिया विनामुल्य करण्यात आली.सुपर स्पेशलिटी हॉस्पिटल अमरावती येथील वैद्यकीय अधीक्षक डॉ. अमोल नरोटे व विशेष कार्य अधिकारी डॉ. मंगेश मेंढे यांच्या मार्गदर्शनाखाली नेफरोलॉजिस्ट डॉ. अविनाश चौधरी ,युरो सर्जन डॉ.राहुल पोटोडे, डॉ.विक्रम देशमुख, डॉ. प्रतिक चिरडे, डॉ विशाल बाहेकर,बधिरिकरण तज्ञ- डॉ. रोहित हातगावकर, डॉ. बाळकृष्ण बागवाले, डॉ. दिपाली देशमुख, डॉ शीतल सोळंके, डॉ.रमणीका ढोमणे,हृदयरोगतज्ञ डॉ आदित्य गुप्ता , इनसेंटिविस्ट डॉ पूजा चांडक ,डॉ.विक्रांत कुळमेथे, डॉ.माधव ढोपरे,डॉ. जयश्री पुसदेकर, डॉ.नाहीद, डॉ. रमणीय,डॉ. उज्वल अभ्यंकर, डॉ. प्रियंका कांबळे, डॉ. श्रद्धा जाधव,समाजसेवा अधीक्षक (वैद्यकीय) शितल बोंडे, ऋषिकेश धस, डॉ.सोनाली चौधरी,महात्मा ज्योतिराव फुले जन आरोग्य योजने मधील एम.सी.ओ.डॉ. पायल रोकडे ,डॉ. दिव्यांनी मुंदाने, आशिष तायडे त्याचप्रमाणे अधीसेविका चंदा खोडके यांच्या सूचनेनुसार इन्चार्ज सिस्टर ज्योती तायडे, सरला राऊत, नीता कांडलकर, दिपाली तायवाडे, माधुरी सोनटक्के, , विवेक तायडे, वैष्णवी निकम, कीर्ती तायडे, अक्षय पवार, मयुरी खेरडे, ओम महल्ले ,अनु वडे,योगिश्री पडोळे,वैशाली ढोबळे, विशाखा बरवान, अर्चना मढावी, वैष्णवी टाकरखेडे ,कोमल भालेकर, आर. गवई, दीक्षा बेलखेडे, आहारतज्ञ कविता देशमुख, रश्मिता दिघडे, शिवा भोंगाळे , आशिष मिश्रा, रुपेश हरडे,संगीता, दिपटे, भेंडकर, इंदू पाटील, गजानन चौधरी,प्रशांत थेटे, निलेश आत्राम इत्यादींचे किडनी प्रत्यारोपण शस्त्रक्रियेमध्ये विषेश सहकार्य होते.





# केबल, मोटर पंप चोरी करणारी टोळी जेरबंद

## मोर्शी पोलिसांची कामगिरी



**अमरावती/प्रतिनिधीः-** शेती अवजारे चोरी करणाऱ्या टोळीला मोर्शी पोलिसांनी ताब्यात घेतले. त्यांच्या कडून १ लाख ३ हजाराचा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे. गौरव विजय सिरसाम (वय २६), राहुल जानराव भलावी (वय ३३,दोघे रा. उमरखेड) व प्रशांत अशोकराव पाचारे (वय ३५, हिवरखेड ) असे अटक करण्यात आलेल्या आरोपींची नावे आहे. मोर्शी परिसरामध्ये होत असलेल्या शेती अवजारांच्या चोरीच्या घटनांवर आळा बसवण्याकरिता निर्देश देण्यात आले. त्या नुसार गुन्हे प्रगटिकरण शाखेने गुप्त माहितीच्या आधारावर हिवरखेड रोडवर माळू नदीच्या पुलाजवळ कार्यवाही करून आरोपींना ताब्यात घेतले. त्यांच्या कडून ५ किलो तांबा तार किंमत ५ हजार, काळ्या रंगाचा २० फूट तांबा तार किंमत ३ हजार, पान डुबा मोटर पंप १५ हजार, एक काळया रंगाची होंडा शाईन कंपनीची बिना नंबर प्लेटची मोटरसायकल ८० हजार असा एकूण १ लाख ३ हजार रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आलेला आहे.

ही कारवाई पोलीस अधीक्षक विशाल आनंद, अप्पर अधीक्षक पंकज कुमार, उपविभागीय अधिकारी संतोष खांडेकर यांच्या मार्गदर्शनात पोलीस निरीक्षक राहुल आठवले यांच्या नेतृत्वात उपनिरीक्षक आकाश शिवणकर, छत्रपती करपते, स्वप्निल बायस्कर, अथर्व कोहळे, सुनील अकोलकर यांनी केली.

# सेवानिवृत्त शिक्षिकेची ३० लाखांनी फसवणूक

**अमरावती/प्रतिनिधीः-** म्हाडा कॉलनीत राहणाऱ्या ८० वर्षीय सेवानिवृत्त शिक्षिकेसोबत ३० लाख रुपयांची फसवणूक झाल्याची धक्कादायक घटना ५ मार्च रोजी उघडकीस आली आहे. शिक्षिकेच्या तक्रारीवरून खोलापुरीगेट पोलीसांनी आरोपी प्रफुल अरुण खेडकर (मलकापुर, पांढरी) याच्यावर गुन्हा दाखल करून तपास सुरू केला आहे.

माहितीनुसार, शिक्षिकेच्या पतीचे २०२३ मध्ये निधन झाले. त्यानंतर शिक्षिकेने आपले घर ६३ लाखात विकले व भाड्याने रूम घेऊन राहू लागली. शिक्षिकेची एक मुलगी जिल्हा परिषद शाळेत शिक्षिका असून, आरोपी प्रफुल खेडकर याची त्यांच्याशी ओळख होती. त्यामुळे आरोपी हा शिक्षिकेच्या घरी येत जात होता. त्याने शिक्षिकेच्या ३० लाख रुपयांचा वापर करून स्वतःसाठी फ्लॅट घेतला, तसेच ४० लाख रुपयांचे कोरे चेक दिले. कौटुंबीक सलोखा पाहून शिक्षिकेने आरोपीला पैसे दिले. परंतु त्यानंतर काही दिवसांनी शिक्षीकेने त्याला पैसे मागितले असता, आरोपीने त्यांना टाळाटाळ केली. त्यामुळे शिक्षिकेने चेक बँकेत टाकले. त्यावेळी ते बाउंस झाले. त्यानंतर पैसे मागितल्यावर आरोपीने शिक्षिकेला जीवे मारण्याची धमकी दिल्याची तक्रार शिक्षिकेने पोलिसांकडे नोंदवली. सदर प्रकरणाचा तपास खोलापुरीगेट पोलीस करत आहेत.

# वलगाव येथे 'छत्रपती शिवाजी महाराज समाधान शिबिर'

## -५४१ लाभार्थ्यांना विविध योजनांचा लाभ

**अमरावती/प्रतिनिधीः-** अमरावती तालुक्यातील वलगाव मंडळात आज ७ मार्च रोजी 'छत्रपती शिवाजी महाराज समाधान शिबिर' उत्साहात पार पडले. सिकची रिसॉर्ट येथे आयोजित या शिबिरामध्ये शासनाच्या विविध लोककल्याणकारी योजनांचा लाभ एकाच छताखाली मिळाल्याने नागरिकांनी समाधान व्यक्त केले आहे.

या शिबिराचे आयोजन पालकमंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांच्या प्रमुख उपस्थितीत करण्यात आले. यावेळी आमदार राजेश वानखेडे, रवी राणा, विभागीय आयुक्त डॉ. श्वेता सिंघल आणि जिल्हाधिकारी आशिष येरेकर उपस्थित होते. कार्यक्रमादरम्यान महसूल मंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांच्या कार्यकाळातील महत्त्वपूर्ण आणि लोकाभिमुख शासन निर्णयांचे वाचन करण्यात आले. यावेळी



उपस्थितांना मार्गदर्शन करताना महसूल मंत्र्यांनी शासनाच्या विविध उपक्रमांची माहिती दिली आणि नागरिकांनी या योजनांचा लाभ घेण्याचे आवाहन केले.

या शिबिरात एकूण ५४१ लाभार्थ्यांना विविध विभागांतर्गत प्रमाणपत्रे, धनादेश, सात बारा उतारा आणि फेरफार पत्रांचे वाटप करण्यात आले. तसेच शिबिरात ६४ नागरिकांना ई-शिधापत्रिकांचे वाटप करण्यात आले. रेवसा येथील पूरग्रस्तांना पुनर्वसन भूखंडांचे २२७ सात बारा उतारे देण्यात आले. तसेच ६८ विधवा आणि अपंग लाभार्थ्यांना श्रावणबाळ योजनेची प्रमाणपत्रे देण्यात आली.

६१ नागरिकांना अधिवास प्रमाणपत्रे (Domain Certificate) प्रदान करण्यात आली. राज्य कृषी यांत्रिकीकरण योजनेअंतर्गत ६ लाभार्थ्यांना ट्रॅक्टरचे वाटप करण्यात आले. तसेच लेक लाडकी योजना, आयुष्मान गोल्डन कार्ड आणि पी.आर. कार्डचेही वाटप करण्यात आले.

कार्यक्रमाचे प्रास्ताविक अमरावतीचे उपविभागीय अधिकारी अनिल भटकर यांनी केले. आभार प्रदर्शन तहसीलदार विजय लोखंडे यांनी मानले.

# मुलाला वाचवताना जळालेल्या मातेचा मृत्यू

**धामणगाव रेल्वे/ प्रतिनिधीः-** दारूच्या नशेमध्ये स्वतःला जाळणाऱ्या मुलाला वाचवताना गंभीर भाजलेल्या वृद्ध आईचा उपचारा दरम्यान मृत्यू झाल्याची घटना धामणगाव रेल्वे तालुक्यातील मंगरूळ दस्तगीर पोलीस ठाणे हद्दीत येणाऱ्या बोरगाव धांदे येथे समोर आली आहे.

या घटनेमध्ये आई नानीबाई दौलतराव लोणकर (वय ७०) व मुलगा अवधूत दौलतराव लोणकर (वय ३२) या दोघांचा मृत्यू झाला आहे. माहितीनुसार १७ फेब्रुवारीच्या रात्री दारूच्या नशेमध्ये अवधूत लोणकर याने स्वतःवर पेट्रोल टाकून जिवंत जाळून घेतले होते. त्याला जळताना पाहिल्यानंतर आई नानीबाई त्याला वाचवण्यासाठी धावून आली. त्यांनी अवधूतला वाचवण्याचे पूर्ण प्रयत्न केले. यामध्ये त्या गंभीर भाजल्या.

दोघांना गंभीर अवस्थेमध्ये सेवाग्राम रुग्णालयात दाखल करण्यात आले जेथे उपचारादरम्यान अवधूत लोणकरचा मृत्यू झाला तर त्यानंतर आता नानीबाई यांचाही मृत्यू झाला आहे. या प्रकरणात मंगरूळ दस्तगीर पोलिसांनी आकस्मिक मृत्यूच्या गुन्हा दाखल केला आहे.

# अमरावतीत छत्रपती शिवाजी महाराज जयंतीची भव्य मिरवणूक

## शिवजयंती उत्सव २०२६, भगव्या पताकांचा गजर

**-राजे छत्रपतींच्या गौरवाचा अमरावतीत ऐतिहासिक उत्सव**

**-प्रवीण हरमकर, रामकृष्ण सोळंके यांच्यासह प्रमुख नेत्यांची उपस्थिती**

**अमरावती :** स्वराज्याचे स्वप्न साकार करणारे, हिंदवी स्वराज्याचे संस्थापक राजे छत्रपती शिवाजी महाराज यांची जयंती ६ मार्च २०२६ रोजी भव्य स्वरूपात साजरी करण्यात आली. शिवसेना – उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्ष आणि शिवजयंती उत्सव समिती यांच्या संयुक्त यशस्वी प्रयत्नांतून या दिव्य मिरवणुकीचे आयोजन करण्यात आले.

सायंकाळी ६ वाजता गांधी चौक, अमरावती येथून मिरवणूक सुरू झाली. कार्यक्रमात महाराजांच्या प्रतिमांचे पूजन व हारविन्यास करण्यात आले आणि जयघोष करत रॅलीला सुरूवात देण्यात आली. मिरवणूक गांधी चौक- राजकमल- जयस्तंभ चौक- सरोज चौक-जवाहर गेट- सराफा बुधवारा- गांधी चौक या मार्गाने पार पडली. मिरवणुकीत राजे छत्रपती शिवाजी महाराजांचे तैलचित्र व पुतळे, तसेच राष्ट्रीय पुरुषांचे कट-आउट सजवले होते. ढोल-ताशे, घोडे, तुतारी, डीजे गोंधळी व दिंडी यांनी मिरवणुकीत उत्साह आणला. भगव्या पताकांचा गजर वातावरणात हिंदवी स्वराज्याची चाहूल उमटवत होता. याप्रसंगी शिवजयंती उत्सव समिती अध्यक्ष रामकृष्ण सोळंके, माजी खासदार अनंतराव गुढे. संपर्कप्रमुख सुधीर सूर्यवंशी, स्वीकृत नगरसेवक दिनेश बुब, शिवसेना शहर प्रमुख अमरावती माजी विरोधी पक्ष नेता प्रवीण हरमकर, पराग गुडधे, जिल्हाप्रमुख पंजाबराव तायवाडे, संजय गव्हाळे, नगरसेवक संपर्क महिला आघाडी प्रतिभा बोपशेट्टी, मनीषा टेभंरे, लक्ष्मी शर्मा, माजी नगरसेविका जयश्री कुर्हेकर, नितीन तारेकर, संजय थुले, प्रकाश टेटु, सचिन ठाकरे, विजय ठाकरे, नितीनजी भोरे, मनीष रामावर, श्रीकांत शर्मा, संदीप मानेकर, प्रमोद वानखडे, गोविंदा आनंदाठी, राजू हेरे, अमोल सरकटे, निकेश शर्मा, उमेश केडिया, रितेश आसोपा, रितेश पांडे, राजू सोनवणे, गुरु इंगळे, आकाश मानकर, तन्मय बुब, बब्बू मोतीवाला, शुभम मरोडकर, पार्थ हरमकर, ईश्वर खडेकार, योगेश सोळंके, पप्पू मालविया, बाल्या लोहारे, संजय सातपुते, देवेंद्र सावरकर, अनंत भालेराव, विजय देशमुख, अमोल थोरात, पिंटू अनासने, विनोद शर्मा, राजू शर्मा यांच्यासह शिवसैनिक युवा सैनिक महिला आघाडी कामगार सेना आणि शिवप्रेमींनी मोठ्या संख्येने उपस्थित होते. मिरवणूक भव्य आणि ऐतिहासिक ठरली.

## पाहिजे

अमरावती, अचलपूर व वरूड येथे नामांकित लॉ फर्म मध्ये युवक व युवतींना पार्ट टाईम काम करण्याची संधी.

शिक्षण- १२ वी पास
पगार- १०,००० + टिए डिए + कमीशन (ट्रेनिंग झाल्यावर पगार वाढ व ईतर इन्क्रिमेंट्स)

**संपर्क - ९६०७५८२०९४**

# चोरीची दुचाकी विधिसंघर्षीत बालकासह ताब्यात

**अमरावती/प्रतिनिधीः-** अमरावती शहर पोलीस आयुक्त राकेश ओला यांच्या मार्गदर्शनाखाली अमरावती शहर गुन्हे शाखेने चोरीच्या दुचाकीचा गुन्हा उलगडून मुख्य आरोपी ताब्यात घेतला आहे. या कारवाईत विधिसंघर्षीत बालक आणि मोटरसायकलसह एकूण १,४०,००० रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला.

गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक संदीप चव्हाण यांच्या नेतृत्वात पथकातील अधिकारी व अंमलदारांनी फ्रेजरपुरा पोलीस स्टेशनअंतर्गत दाखल असलेल्या दुचाकी चोरीच्या प्रकरणी कार्यवाही केली. पथकाला गोपनीय माहिती मिळाल्यानंतर सुतगिरणी परिसरात एका संशयिताला ताब्यात घेऊन चौकशी केली असता, आरोपीने पल्सर मोटरसायकल २१ फेब्रुवारी रोजी रात्री १०.३० वाजता प्रशांतनगर चौकातील हनुमान मंदिराच्या पाठीमागील पानठेल्याजवळून चोरी केली असल्याचे कबूल केले.

तपासानंतर पोलिसांनी लाल-काळा एनएस २०० पल्सर, २०० सीसीची बजाज कंपनीची बिना नंबरची पल्सर जप्त केली आहे. या कारवाईमध्ये पोलीस उपायुक्त गणेश शिंदे, श्याम घुगे, तसेच गुन्हे शाखेचे अधिकारी रमेश धुमाळ, शिवाजी बचाटे यांच्या मार्गदर्शनाखाली पथकातील पोउपनि गजानन सोनूने, पोलीस अंमलदार दीपक सुंदरकर, सुनिल लासुरकर, जहीर शेख, सचिन बहाळे, अतुल संभे, सुरज चव्हाण, राजिक रायलीवाले, योगेश पवार आणि चालक प्रभात पोकळे यांनी सहभागी होऊन तातडीने कारवाई केली.

# सामाजिक न्याय पुरस्कारासाठी अर्ज करण्याचे आवाहन

**अमरावती/प्रतिनिधीः-** सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभागातर्फे समाज कल्याण क्षेत्रात कार्य करणाऱ्या नोंदणीकृत स्वयंसेवी संस्था आणि उल्लेखनीय कार्य करणाऱ्या समाजसेवकांना विविध पुरस्कार देवून सन्मानित करण्यात येते. यासाठी इच्छुकांनी अर्ज करावेत, असे आवाहन करण्यात आले आहे.

सन २०२४-२५ आणि २०२५-२६ या आर्थिक वर्षात देण्यात येणाऱ्या विविध पुरस्कारांसाठी अर्ज मागविण्यात आले आहेत. ज्या वर्षासाठी आणि ज्या पुरस्काराकरीता अर्ज करण्यात येत आहे, त्या वर्षासाठी त्या पुरस्काराकरीता विहीत केलेल्या अटीची पूर्तता करणे आवश्यक राहील. तसेच पुरस्कारासाठी १ जानेवारी ते ३१ डिसेंबर अशी गणना विचारात घेण्यात येईल. इच्छुकांनी ज्या वर्षाकरीता अर्ज केला आहे, त्या वर्षाकरीता चारित्र्य पडताळणी अहवाल सादर करावा लागणार आहे. सन २०२४-२०२५ या वर्षात देण्यात येणाऱ्या डॉ. बाबासाहेब आंबेडकर समाज भूषण पुरस्कार, साहित्यरत्न लोकशाहीर साठे पुरस्कार, पद्मश्री कर्मवीर दादासाहेब आंबेडकर पारितोषिक, संत रविदास पुरस्कार, लोककवी वामनदादा कर्डक पुरस्कार, डॉ. बाबासाहेब आंबेडकर सामाजिक न्याय प्राविण्य पुरस्कार, शाहू, फुले, आंबेडकर पारितोषिक या पुरस्कारासाठी अर्ज मागविण्यात आले आहेत.

पुरस्काराची जाहिरात आणि अर्जाचा नमुना सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभागाच्या sjsa.maharashtra.gov.in संकेतस्थळावर उपलब्ध आहे. तसेच अधिक माहितीसाठी सामाजिक न्याय कार्यालय, डॉ. बाबासाहेब आंबेडकर सामाजिक न्याय भवन, चांदुर रेल्वे रोड, अमरावती येथे संपर्क करावा. समाज कल्याण क्षेत्रात उल्लेखनीय कार्य करणाऱ्यांनी पुरस्कारासाठी दि. १५ मार्चपर्यंत अर्ज कागदपत्रासह सादर करावेत, असे आवाहन समाज कल्याणचे सहाय्यक आयुक्त राजेंद्र जाधवर यांनी केले आहे.

# सेंट्रल बँक ऑफ इंडियाचा क्रेडिट आऊटरिच प्रोग्राम

## -२६ कोटी रुपयाचे कर्ज वाटप

**अमरावती/प्रतिनिधीः-** सेंट्रल बँक ऑफ इंडिया च्या क्षेत्रीय कार्यालय अमरावतीने संत गाडगे महाराज सभागृह अमरावती येथे दिनांक २१ फेब्रुवारी २०२६ रोजी रिटेल क्रेडिट आउटरीच कार्यक्रम यशस्वीरित्या आयोजित केला.

कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी तुषार दांडगे (गट विकास अधिकारी, भातकुली) हे होते. कार्यक्रमाचे प्रमुख अतिथी डॉ. प्रदीप जावंधिया (प्राचार्य, पी. आर. पोटे पाटील इंजिनिअरिंग कॉलेज, अमरावती) मनीषा ठाकरे (जिल्हा क्रीडा अधिकारी, अकोला) आणि सुनील पांडे (क्षेत्रीय प्रमुख, अमरावती) हे होते.

सुनील पांडे यांनी आपल्या प्रास्ताविक भाषणात कार्यक्रमाचा उद्देश स्पष्ट केला आणि उपस्थितांना बँकेच्या विविध रिटेल योजनांची माहिती दिली. तुषार दांडगे यांनी बँकेच्या क्रेडिट आउटरीच ह्या उपक्रमाचे कौतुक केले तसेच उपस्थितांना बँकेच्या सुविधांचा लाभ घेण्याचे आणि कर्जाची वेळेवर परतफेड करण्याचे आवाहन केले. कार्यक्रमाध्ये विविध रिटेल योजनामधे २६ कोटी रुपयाचे कर्ज वाटप करण्यात आले. सूत्रसंचालन निलेश मुंढेकर यांनी तर आभार प्रदर्शन निलेश सगने यांनी केले.

# अनोळखी व्यक्तीचा मृतदेह आढळला

**अमरावती/प्रतिनिधीः-** गाडगे नगर पोलीस ठाण्याच्या हद्दीत एका अनोळखी व्यक्तीच्या मृत्यूची धक्कादायक घटना समोर आली आहे. मृतकाची ओळख अद्याप ठोसपणे समोर आलेली नसल्याने पोलीस तपास करत आहेत.



पोलिस हवालदार तुषार देशमुख यांनी दिलेल्या माहितीनुसार, मृतक हा अंदाजे ५५ वर्षीय पुरुष असून, रंग निमगोरा आणि मध्यम उंचीचा आहे. त्याच्या डोक्यावर व पाठऱ्यांवर काही जखमा असून, शरीरावर रंगीत शर्ट व पँट होता. मागील बाजूस दवाखान्यातील केशरी रंगाची पट्टी आढळली आहे. त्याच्यावर सुपर स्पेशालिटीत उपचार सुरु होते. परंतू त्याचा उपचादारम्यान मृत्यू झाला. मृतदेहाला सध्या जिल्हा सामान्य रुग्णालयाच्या शवगृहात पोस्टमार्टेमसाठी ठेवण्यात आले आहे. पोलीस विभागाने सर्वत्र चौकशी सुरु केली असून, नागरिकांनी या व्यक्तीची ओळख असल्यास तातडीने गाडगे नगर पोलीस ठाण्याशी संपर्क साधण्याचे आवाहन केले असून संपर्क क्रमांक: वरिष्ठ पोलीस कर्मचारी गोरखनाथ जाधव – ९८२३१९१९१०१ - पोलिस हवालदार राजेश पवार – ९८२३१५९१५० पोलिस हवालदार - तुषार देशमुख – ८८०५०१०९८३ असे आहेत.

# युवकास जीवे मारण्याची धमकी

**अमरावती :** शहरातील मसानगंज परिसरातील रहिवासी मोहन विश्वकर्मा हे पीडीएमसी रुग्णालयात असताना आरोपी सोन्या उर्फ मंगेश चांदुरकर याने अश्लील शिवीगाळ करत त्यांना जीवे मारण्याची धमकी दिली व मारहाण केली. या घटनेप्रकरणी मोहन विश्वकर्मा यांच्या तक्रारीवरून पोलिसांनी संबंधित आरोपीविरुद्ध गुन्हा दाखल केला असून तपास सुरू आहे.

# तडीपार आरोपी चाकूसह जेरबंद

**अमरावती :** राजापेठ पोलीस ठाण्याच्या हद्दीतील बेलपुरा परिसरातील न्यू हायस्कूलजवळ तडीपार असलेल्या आरोपीस गुन्हे शाखेच्या पथकाने अटक केली. सागर रामदुलार यादव (वय ३२, रा. चिंचफैल) असे अटक करण्यात आलेल्या आरोपीचे नाव आहे. त्याच्याकडून एक धारदार चाकू जप्त करण्यात आला आहे. तडीपार आदेशाचे उल्लंघन केल्याप्रकरणी पोलिसांनी त्याच्याविरुद्ध गुन्हा नोंदवून पुढील तपास सुरू केला आहे.

# वसतिगृह प्रवेशासाठी आधार, स्वयंम योजनेचा लाभ घ्या

## -इतर मागास प्रवर्गातील विद्यार्थ्यांसाठी १० मार्च अंतिम मुदत

**अमरावती/प्रतिनिधीः-** शैक्षणिक वर्ष २०२५-२६ पासून इतर मागास वर्ग, विमुक्त जाती, भटक्या जमाती व विशेष मागास प्रवर्गातील विद्यार्थ्यांसाठी शासकीय वसतिगृह प्रवेश प्रक्रिया सुरू झाली आहे. विद्यार्थ्यांना ज्ञानज्योती सावित्रीबाई फुले आधार योजना आणि पंडीत दिनदयाल उपाध्याय स्वयंम योजनेचा लाभ घेण्यासाठी दि. १० मार्चपूर्वी अर्ज करावे लागणार आहे.

बारावीनंतरच्या बिगर व्यावसायिक व व्यावसायिक अभ्यासक्रमात प्रथम वर्षाला प्रवेश घेतलेल्या विद्यार्थ्यांना सदर योजनांचा लाभ घेण्यासाठी शासकीय वसतिगृहामध्ये अर्ज करणे अनिवार्य आहे. अर्ज hmas.mahait.org या संकेतस्थळावर ऑनलाईन पद्धतीने स्वीकारले जाणार आहे.

मुलांनी इतर मागास बहुजन कल्याण मुलांचे शासकीय वसतिगृह, अग्रवाल टॉवर, जाफरीन प्लॉट, आदर्श होटेलजवळ, कॉटन मार्केट रोड, अमरावती तसेच मुलींनी इतर मागास बहुजन कल्याण मुलींचे शासकीय वसतिगृह, ब्लॉक ए, राम लक्ष्मण संकुल, तिसरा मजला, रामपूरी कॅम्पजवळ, विलासनगर चौक, अमरावती या वसतिगृहामध्ये अर्ज सादर करावेत.

१२ वी नंतरच्या व्यावसायिक अभ्यासक्रमासाठी प्रवेश घेतलेल्या पदवी आणि पदव्युत्तर अभ्यासक्रमांतील विद्यार्थ्यांना अर्ज करता येणार आहे. गुणवत्तेनुसार पहिली निवड यादी ११ मार्च २०२६ रोजी प्रसिद्ध करण्यात येईल. या यादीतील पात्र विद्यार्थ्यांसाठी प्रवेशाची अंतिम मुदत १२ मार्च ते २० मार्च २०२६ पर्यंत राहील.

अधिक माहितीसाठी सहायक संचालक, इतर मागास बहुजन कल्याण अमरावती, सामाजिक न्याय भवन, पोलीस आयुक्तालयाचे मागे, चांदुर रेल्वे रोड, अमरावती, तसेच ई-मेल dobbwoamravati@gmail.com यावर संपर्क साधावा, असे आवाहन इतर मागास बहुजन कल्याणच्या सहायक संचालक सरीता बोबडे यांनी केले आहे.

जनमाध्यम

जनमाध्यम न्युज अँड पब्लीकेशन प्रा.लि.च्या मालकीचे हे वृत्तपत्र मुद्रक, प्रकाशक प्रदीप देशपांडे यांनी प्लॉट नं. बी-५०, सातुर्णा औद्योगिक वसाहत, बडनेरा रोड, अमरावती - ४४४६०७ येथे छापून जनमाध्यम कार्यालय, रेल्वेपुलाजवळ, राजकमल चौक, अमरावती -४४४६०१ येथे प्रकाशित केले.

संपादक- प्रदीप देशपांडे

संचालक (वृत्त) - अभिराम देशपांडे
(Responsible for selection of News Under PRB Act)

अमरावती आवृत्ती वर्ष - ३७ अंक १८०
आर.एन.आय.रजी.नं. 49763/89 पोस्टल लायसन क्र. ATI/RNP/47/2023-2025

मुख्य कार्यालय :– अंबापेठ, राजकमल चौक, अमरावती - ४४४६०१
फोन - ९८२३०१६३००,९४२२९५६२६८
ई-मेल - atimadhyam@gmail.com, abhiram.deshpande70@gmail.com

## गृहराज्यमंत्र्यांच्या जिल्ह्यात भाजप महामंत्र्याची हत्या

# वर्धा जिल्हा पेटला, तरीही सरकार गप्प

### कॅंडल मार्च, मोर्चांनी संताप उसळला; सीआयडी चौकशीची जोरदार मागणी

**पुलगाव जनमाध्यम**

युवा व्यावसायिक व भाजपचे पुलगाव–देवळी महामंत्री भारत नागपाल यांच्या रेती घाटावर झालेल्या निर्घृण हत्येनंतर संपूर्ण वर्धा जिल्हा संतापाने पेटला आहे. गृहराज्यमंत्र्यांच्या जिल्ह्यातच अशी धक्कादायक घटना घडल्याने नागरिकांमध्ये तीव्र रोष निर्माण झाला असून जिल्ह्यातील अनेक तालुक्यांत कॅंडल मार्च, मोर्चे व निषेध आंदोलनांची मालिका सुरू झाली आहे. आरोपींना कठोर शिक्षा देण्यासोबतच या प्रकरणाची सीआयडी चौकशी जाहीर करण्याची मागणी नागरिकांकडून जोर धरत आहे.



होळीच्या पूर्वसंध्येला वरोरा–हिंगणघाट सीमेवरील बमबार्डा रेती घाट परिसरात १५ ते २० जणांच्या टोळीने भारत नागपाल यांना सापळ्यात अडकवून निर्दयीपणे मारहाण केल्याचा आरोप आहे. रेती घाटाचे मार्ग जेसीबी व पोकलेनने बंद करून त्यांना घेरण्यात आले. गंभीर जखमी अवस्थेत त्यांना नदीच्या खोल पात्रात फेकण्यात आल्याची माहिती समोर आली असून या घटनेने जिल्हाभरात खळबळ उडाली आहे.

या पार्श्वभूमीवर पुलगावसह वर्धा जिल्ह्यातील विविध तालुक्यांत हजारोंच्या संख्येने नागरिक रस्त्यावर उतरले आहेत. हातात पेटत्या मेणबत्त्या घेऊन नागरिकांनी मूक कॅंडल मार्च काढत भारत नागपाल यांना श्रद्धांजली अर्पण केली. व्यापारी, सामाजिक संस्था, महिला मंडळे व विविध राजकीय पक्षांच्या कार्यकर्त्यांनी या आंदोलनात मोठ्या संख्येने सहभाग घेतला.

दरम्यान, देवळी–पुलगाव मतदारसंघाचे आमदार राजेश बकाने तसेच विधान परिषदेचे आमदार दादाराव केचे यांनी हा मुद्दा विधानसभा आणि विधान परिषदेत उपस्थित करून सीआयडी चौकशीची मागणी केली आहे. मात्र अद्याप राज्य सरकारकडून कोणताही आदेश जाहीर न झाल्याने नागरिकांमध्ये संताप अधिकच वाढत आहे. जिल्ह्याचे पालकमंत्री तथा राज्याचे गृहराज्यमंत्री डॉ पंकज भोयर यांच्या जिल्ह्यातच एवढी गंभीर घटना घडूनही ठोस निर्णय होत नसल्याने प्रशासनावर टीकेची झोड उठू लागली आहे. नागपाल यांना न्याय मिळेपर्यंत आंदोलन सुरूच राहील, असा इशाराही नागरिकांनी दिला आहे.

# शहराचा अभिमान धक्क्यात

### जमनालाल बजाज यांचा पुतळा रातोरात हटविला

### सौंदर्यकरणानंतर नव्या तेजात उभा राहणार

**वर्धा जनमाध्यम :** शहराच्या मध्यवर्ती बजाज चौकात उभा असलेला, नागरिकांच्या अभिमानाचा मानबिंदू ठरलेला जमनालाल बजाज यांचा पुतळा अचानक रातोरात हटवण्यात आल्याने काही काळ नागरिकांमध्ये आश्चर्याचे वातावरण निर्माण झाले. सकाळी चौकातून जाणाऱ्या अनेकांनी पुतळा जागेवर नसल्याचे पाहताच क्षणभर थबकून प्रश्न उपस्थित केले शहराचा हा अभिमान आता कुठे गेला? मात्र ही कारवाई कोणत्याही वादामुळे नसून सौंदर्यकरणाच्या कामाचा भाग असल्याचे स्पष्ट झाले. बजाज ग्रुपचे अनुराग बजाज यांनी सांगितले की, पुतळ्याचे नूतनीकरण तसेच दिशा बदलण्याचे काम करण्यात येत




आहे. संपूर्ण चौकाला नवे रूप देण्याचा प्रयत्न असून पुढील एक महिन्यात पुतळा नव्या तेजात पुन्हा उभा राहील,असे त्यांनी स्पष्ट केले. वर्धा शहरात हा चौक अनेक वर्षांपासून 'जमनालाल बजाज चौक' या नावानेही ओळखला जातो. त्यामुळे या चौकाच्या विकासासाठी बजाज ग्रुपकडून विशेष लक्ष दिले जाते. काही वर्षांपूर्वी ग्रुपच्या पुढाकारातून येथे आकर्षक रोषणाई आणि हायमास्ट दिवे उभारण्यात आले होते, ज्यामुळे चौकाचा देखावा अधिक उजळून निघाला होता आता पुन्हा एकदा चौकाच्या संपूर्ण सौंदर्यकरणाचा नवा अध्याय सुरू झाला आहे. पुतळ्याचे नूतनीकरण, परिसराची रचना आणि आकर्षक सजावट यामुळे बजाज चौक अधिक देखणा होणार असल्याची अपेक्षा व्यक्त केली जात आहे. इतिहासाची साक्ष देणारा हा चौक लवकरच नव्या रूपात शहरासमोर उभा राहणार असून, नागरिक आता त्या क्षणाची उत्सुकतेने प्रतीक्षा करीत आहेत.

## संक्षिप्त

### दगडाने मारहाण; इसम जखमी

**देवळी :** बाजारात बसलेल्या इसमावर दगड फेकून मारहाण करण्यात आल्याची घटना वायगाव (निपाणी) येथील मटण मार्केटमध्ये घडली. राजू पोटफोडे (३४) हे बाजारातील मटणाच्या दुकानात बसले होते. त्यावेळी गावातील राजू नावाच्या इसमाने अचानक त्यांच्यावर दगड फेकून मारला. या प्रकारात राजू पोटफोडे यांच्या डोळ्याला दुखापत झाली. परिसरातील नागरिकांनी त्यांना तत्काळ उपचारासाठी हलविले. घटनेनंतर परिसरात काही काळ तणावाचे वातावरण निर्माण झाले होते. या प्रकरणी जखमी राजू पोटफोडे यांच्या तक्रारीवरून देवळी पोलिसांनी संबंधित इसमाविरुद्ध गुन्हा दाखल केला आहे. पुढील तपास देवळी पोलिसांकडून सुरू आहे.

### जि.प. शाळेतून लॅपटॉप चोरी

**अल्लीपूर :** रोहणखेडा येथील जिल्हा परिषद प्राथमिक शाळेतून अज्ञात चोरट्याने लॅपटॉप चोरी करून नेल्याची घटना उघडकीस आली आहे. अर्चना वावरे या शाळेत मुख्याध्यापिका म्हणून कार्यरत आहेत. शाळा सुटल्यानंतर त्यांनी स्वयंपाकी अर्चना गोडे यांना वर्गखोलीला कुलूप लावण्यास सांगितले होते. मात्र दुसऱ्या दिवशी शाळा उघडल्यावर वर्गातील लॅपटॉप जागेवर नसल्याचे आढळून आले. अज्ञात चोरट्याने खोलीत प्रवेश करून लॅपटॉप लंपास केल्याची शक्यता व्यक्त करण्यात येत आहे. या घटनेची तक्रार अल्लीपूर पोलिस ठाण्यात देण्यात आली असून पोलिसांनी अज्ञात चोरट्याविरुद्ध गुन्हा नोंदविला आहे. पुढील तपास सुरू आहे.

### तोतया पोलिसांकडून ६० हजारांचा ऐवज लंपास

**वर्धा :** पोलिस असल्याची बतावणी करून दोन अज्ञात इसमांनी दुचाकीस्वाराकडील सुमारे ६० हजार रुपयांचा सोन्याचा ऐवज लंपास केल्याची घटना सेलसुरा परिसरात घडली. नीलेश बुधे (५४) रा. रामनगर हे देवळी येथून वर्धेकडे दुचाकीने येत होते. सेलसुरा येथील पंछी ढाब्याजवळ दोन अनोळखी इसम दुचाकीने आले व त्यांनी स्वतःला पोलिस असल्याचे सांगितले. तपासणीच्या बहाण्याने त्यांनी बुधे यांच्या गळ्यातील सोन्याचा गोफ व अंगठी काढून घेतली आणि तेथून पसार झाले. या घटनेची तक्रार सावंगी पोलिस ठाण्यात देण्यात आली असून पोलिसांनी गुन्हा नोंद करून तपास सुरू केला आहे.

### शेडमधून १५ हजारांचे साहित्य चोरी

**समुद्रपूर :** पी. व्ही. टेक्सटाईल्स कंपनी परिसरातील टिनाच्या




शेडमधून अज्ञात चोरट्यांनी १५ हजार रुपयांचे साहित्य चोरी करून नेल्याची घटना समोर आली आहे. कंपनीच्या परिसरात खेरा कन्स्ट्रक्शनचे साहित्य ठेवण्यासाठी शेड उभारण्यात आले होते. या शेडमधून चोरट्यांनी ग्रॅंडर मशीन, केबल, स्क्रॅप केबल, विबकॉक, पिपरकॉक आदी साहित्य लंपास केले. सकाळी कर्मचारी कामावर आल्यानंतर ही बाब लक्षात आली. या घटनेची तक्रार लक्ष्मण सहारे यांनी समुद्रपूर पोलिस ठाण्यात दिली. तक्रारीवरून पोलिसांनी अज्ञात चोरट्यांविरुद्ध गुन्हा नोंद केला असून पुढील तपास सुरू आहे.

## नागपाल हत्याकांडानंतर रेतीघाटांवरून सावधगिरी; आष्टीत सीमांकनाची भाजयुमोची मागणी

**आष्टी जनमाध्यम :** पुलगाव परिसरातील बांबर्डा येथे होळीच्या पूर्वसंध्येला घडलेल्या भरत नागपाल हत्याकांडाच्या पार्श्वभूमीवर रेतीघाटांभोवती निर्माण होणाऱ्या वादांकडे प्रशासनाने गांभीर्याने लक्ष द्यावे, अशी मागणी पुढे येत आहे. या पार्श्वभूमीवर आष्टी तालुक्यातील शिरसोलीसह इतर संभाव्य रेतीघाटांचे अधिकृत सीमांकन करण्यात यावे, अशी मागणी भारतीय जनता युवा मोर्चा, सुमित



वानखेडे युथ क्लब तसेच शिरसोली ग्रामवासी यांच्या वतीने तहसीलदारांना निवेदनाद्वारे करण्यात आली. निवेदनात नमूद करण्यात आले की, शिरसोली येथील रेतीघाटाचा सध्या लिलाव झालेला नसून मागील अनेक वर्षांपासून हा घाट अबाधित स्थितीत आहे. मात्र घाटाचे स्पष्ट सीमांकन नसल्यामुळे भविष्यात अनधिकृत रेती उत्खनन, स्थानिकांमध्ये वादविवाद तसेच कायदा-सुव्यवस्थेचे प्रश्न निर्माण होण्याची शक्यता नाकारता येत नाही. त्यामुळे संभाव्य तणाव टाळण्यासाठी प्रशासनाने तातडीने शिरसोली रेतीघाटाचे अधिकृत सीमांकन करून त्याची नोंद महसूल नकाशावर करावी, अशी मागणी करण्यात आली आहे. यासोबतच आष्टी तालुक्यातील सर्व संभाव्य रेतीघाटांचे सर्वेक्षण करून त्यांची अधिकृत सूची तयार करण्यात यावी, तसेच ज्या ठिकाणी लिलाव प्रक्रिया झालेली नाही त्या ठिकाणी अनधिकृत उत्खनन रोखण्यासाठी नियंत्रण यंत्रणा उभारावी. भविष्यातील वाद टाळण्यासाठी रेतीघाटांवर सीमांकन खांब उभारून सूचना फलक लावावेत, असेही निवेदनात नमूद करण्यात आले आहे.

हे निवेदन भारतीय जनता युवा मोर्चाचे तालुका अध्यक्ष अनिरुद्ध दंडाळे, भाजयुमो जिल्हा उपाध्यक्ष साहिल ठाकरे, स्वराज वाघ, आशीष खोपे, आकाश भगत, रुतिक घोगरे, अक्षय पचारे यांनी सुमित वानखेडे युथ क्लब व शिरसोली ग्रामवासी यांच्या स्वाक्षरीसह तहसीलदारांकडे सादर केले. दरम्यान, नागपाल हत्याकांडानंतर रेतीघाटांवरील वाद पुन्हा चर्चेत आले असून प्रशासनाने ठोस पावले उचलण्याची मागणी स्थानिकांमधून जोर धरू लागली आहे.

## एकजुटीचा संदेश देत रोहणात समाजबंध दृढ

### गाव तिथे शाखा उपक्रमांतर्गत फलक अनावरण व समाज सन्मान सोहळा

**रोहणा जनमाध्यम :** समाजाची एकजूट, युवकांचा सहभाग आणि समाजातील गुणवंतांचा सन्मान यांचा सुंदर संगम रोहणा येथे पाहायला मिळाला. महाराष्ट्र गवळी समाज संघटना, वर्धा जिल्हा यांच्या रोहणा सर्कलच्या वतीने गाव तिथे शाखा समाज सन्मान व युवक संवाद या उपक्रमांतर्गत फलक अनावरण व समाज सन्मान सोहळा उत्साहपूर्ण वातावरणात पार पडला. समाज संघटन मजबूत करणे, युवकांना संघटनेशी जोडणे तसेच समाजातील विविध क्षेत्रांत उल्लेखनीय कार्य करणाऱ्या व्यक्तींचा गौरव करणे हा कार्यक्रमाचा मुख्य उद्देश होता.

कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी महाराष्ट्र गवळी समाज संघटनेचे माजी प्रदेशाध्यक्ष बाबासाहेब गलाट होते. प्रमुख पाहुणे म्हणून वर्धा जिल्हा संघटनेचे अध्यक्ष देवेंद्र ढोबळे, जिल्हा सचिव मोरेश्वर गळहाट, माजी सचिव वसंत डोळे, महिला आघाडी अध्यक्षा प्रभा कालोकार, तसेच ज्ञानेश्वर घोडे, दिवाकर शेळके आणि पत्रकार उमेश चौधरी उपस्थित होते. या वेळी समाजातील विविध क्षेत्रात उल्लेखनीय कार्य करणाऱ्या मान्यवर व विद्यार्थ्यांचा सन्मान




करण्यात आला. सत्कारार्थींमध्ये प्रकाश डोळे, गजानन झामरे, भैय्याजी डोळे, दिनेश गलाट, हेमंत साठे, रोशन साठे, ऋषिकेश झामरे, सुशील गलाट, किरण घोडे, कुणाल चौकोने, ऋषिकेश अवथळे, ऋषिकेश कालोकार, दिक्षिता काळे, चंचल अवथळे, रवींद्र चौकोने, पवन डोळे, गोकुल साठे, ऋषी मोरे आणि समृद्धी भड यांचा समावेश होता. समाजाशी निगडित विविध प्रश्न व उपक्रमांना सातत्याने प्रसिद्धी देत समाजाचे प्रश्न व्यापक स्तरावर पोहोचविण्याचे कार्य केल्याबद्दल पत्रकार उमेश चौधरी यांचा विशेष सत्कार करण्यात आला. समाजातील नसतानाही समाजहितासाठी केलेल्या पत्रकारितेच्या योगदानाची दखल घेत त्यांचा गौरव करण्यात आला. अध्यक्षीय भाषणात बाबासाहेब गलाट यांनी समाज एकत्र राहून संघटना अधिक मजबूत करण्याचे आवाहन केले. तर जिल्हाध्यक्ष देवेंद्र ढोबळे यांनी समाजहिताच्या उपक्रमांना नेहमी सहकार्य करण्याची ग्वाही दिली.

कार्यक्रमाचे प्रास्ताविक युवा आघाडी जिल्हाध्यक्ष निलेश गलाट यांनी केले. सूत्रसंचालन धीरज बोबडे यांनी केले तर आभार प्रदर्शन दिनेश गलाट यांनी मानले. कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी अमर शेळके, गौरव झामरे, प्रियांशू साठे, ज्योती गलाट, रोशनी गलाट, अक्षरा साठे, पूर्वा गलाट व सचिन गलाट यांनी सहकार्य केले. या कार्यक्रमाला रोहणा सर्कलमधील समाजबांधव व भगिनी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## दुचाकींची समोरासमोर धडक; दोघे जखमी

**वडनेर :** दोन दुचाकींच्या समोरासमोर झालेल्या अपघातात दोघे जण जखमी झाल्याची घटना स्थानिक तलाठी कार्यालयासमोर घडली. सुमित धाबर्डे (२५) रा. वडनेर हा त्याचा मित्र समीर मेश्राम याला घेऊन एमएच-२९ बीएन ७६२६ क्रमांकाच्या दुचाकीने जात होता.

दरम्यान, विरुद्ध दिशेने येणाऱ्या एमएच-३४ एएस ३९७३ क्रमांकाच्या दुचाकीने त्यांच्या वाहनाला जोरदार धडक दिली. या अपघातात सुमित धाबर्डे व समीर मेश्राम हे दोघेही जखमी झाले. स्थानिकांनी तत्काळ मदत करून जखमींना उपचारासाठी हलविले.

या प्रकरणी सुमित धाबर्डे यांच्या तक्रारीवरून वडनेर पोलिसांनी प्रथमेश कुबडे रा. वडनेर याच्याविरुद्ध निष्काळजीपणे वाहन चालविल्याप्रकरणी गुन्हा दाखल केला आहे. पुढील तपास पोलिस करीत आहेत.

### सात शेळ्या चोरी; ९० हजारांचे नुकसान

कारंजा (घाडगे) : तालुक्यातील दाभा जंगल परिसरातून सात शेळ्या चोरीला गेल्याची घटना घडली असून यात सुमारे ९० हजार रुपयांचे नुकसान झाले आहे. सुरेश उईके हे आपल्या शेळ्या चराईसाठी जंगल परिसरात घेऊन गेले होते. काही वेळासाठी ते घरी गेले असताना अज्ञात चोरट्यांनी संधी साधून सात शेळ्या चोरून नेल्या. परत आल्यावर शेळ्या दिसून न आल्याने त्यांनी परिसरात शोध घेतला, मात्र त्यांचा पत्ता लागला नाही. या घटनेची तक्रार कारंजा पोलिस ठाण्यात देण्यात आली आहे. तक्रारीवरून पोलिसांनी अज्ञात चोरट्यांविरुद्ध गुन्हा नोंद करून तपास सुरू केला आहे.

## साहुर येथे छत्रपती शिवाजी महाराज महाराजस्व समाधान शिबीरास प्रतिसाद

**वर्धा जनमाध्यम :** आष्टी तालुक्यातील साहुर येथे मंडळस्तरीय छत्रपती शिवाजी महाराज महाराजस्व समाधान शिबिर अभियानाचे आयोजन करण्यात आले होते. या शिबिरास मंडळातील गावकऱ्यांचा उत्स्फूर्त सहभाग लाभला. महसूलच्या विविध सेवांचा थेट लाभ नागरिकांना यावेळी देण्यात



आला. शिबिरास तहसीलदार ऐश्वर्या गिरी, साहुरचे सरपंच प्रकाश गायकवाड तसेच विविध विभागांचे अधिकारी, कर्मचारी व गावकरी मोठ्या संख्येने उपस्थित होते. यावेळी तहसीलदार ऐश्वर्या गिरी यांनी शासनाच्या विविध योजनांची माहिती उपस्थितांना दिली.

महसूल विभागांतर्गत ग्रामीण भागात सर्वसामान्य जनता, शेतकरी, विद्यार्थी व महिलांच्या विभागाशी संबंधित प्रश्नांचे निराकरण करणे व जनतेच्या तक्रारी सत्वर निकाली काढण्यासोबतच महसुल प्रशासन अधिक लोकाभिमुख, कार्यक्षम व गतिमान करण्यासाठी छत्रपती शिवाजी महाराज महाराजस्व समाधान शिबीर अभियानांतर्गत महसुल मंडळ, साहूर येथे या शिबिराचे आयोजन करण्यात आले.

शिबिरामध्ये पारधी वस्ती बोरगाव (टू) येथील ३७ नागरिकांना प्रत्यक्ष गृह चौकशी करून जातीचे प्रमाणपत्र वितरीत करण्यात आले. तसेच रहिवासी प्रमाणपत्र, अधिवास प्रमाणपत्र, भूमिहीन दाखले, उत्पन्न दाखले, घरकुल मजूर प्रमाणपत्र, नानाजी देशमुख कृषी संजीवनी योजनेतील मंजुरी प्रमाणपत्र, पुरवठा विभागातील ई-राशन कार्ड प्रमाणपत्र, संजय गांधी योजनेतील लाभार्थ्यांना प्रमाणपत्र, भूमिहीन प्रमाणपत्र, पोखरा प्रकल्पांतर्गत प्रमाणपत्र, आरोग्य विभागाचे आयुष्यमान भारत कार्ड, महावितरण तर्फे सौर ऊर्जा मोटार पंप, घरगुती वापराकरिता सोलर पॅनल, कलम १५५ अंतर्गत आदेश तसेच कलम १८५ अंतर्गत आपसी वाटणीचे आदेश अशा विविध लाभाचे वितरण करण्यात आले. दिनांक १८ फेब्रुवारी ते ६ मार्चपर्यंत एकूण ७८० प्रमाणपत्राचे वितरण करण्यात आले, असे आष्टी तहसीलदार यांनी कळविले आहे.

# 'व्हॉईस ऑफ मीडिया'चे पॉझिटिव्ह जर्नालिझम पुरस्कार जाहीर

### कुणाल लाडे, संदेश साळुंके,शाहिद पठाण, रुपेश बागड,राहुल पवार,स्वप्निल कांबळे, पुरस्काराचे मानकरी

**मुंबई जनमाध्यम :** पत्रकारांची देशातील सर्वात मोठी संघटना असलेल्या 'व्हॉईस ऑफ मीडिया' 'व्ही ओ एम इंटरनॅशनल फोरम' च्या वतीने दिले जाणारे राज्यस्तरीय 'पॉझिटिव्ह जर्नालिझम पुरस्कार' आज जाहीर करण्यात आले आहेत. महाराष्ट्र प्रदेशाध्यक्ष अनिल म्हस्के पाटील, संचालक तथा संयोजक गोरक्षनाथ मदने आणि राज्य उपाध्यक्ष अजितदादा कुंकूलोळ यांनी आज या पुरस्कारांची अधिकृत घोषणा केली. सकारात्मक पत्रकारितेचा जागर व्हावा आणि समाजात क्रांती घडवून आणणाऱ्या बातम्यांना बळ मिळावे, या उद्देशाने गेल्या पाच वर्षांपासून या पुरस्कारांचे आयोजन करण्यात येते. राज्य




### १५ मार्चला राज्यपालांच्या हस्ते पुरस्काराचे वितरण

शासन आणि 'व्हॉईस ऑफ मीडिया''व्ही ओ एम इंटरनॅशनल फोरम'च्या वतीने हा पुरस्कार दिला जातो.

येत्या १५ मार्च रोजी राजस्थानचे राज्यपाल हरिभाऊ बागडे, राज्याचे मंत्री मंगलप्रसाद लोढा आणि अमृता फडणवीस यांच्यासह अनेक मान्यवरांच्या हस्ते वाय बी चव्हाण येथे सायंकाळी ५ वाजता या पुरस्कारांचे वितरण होणार आहे. यावर्षी या पुरस्कारांसाठी राज्यभरातून तब्बल ६०० प्रस्ताव प्राप्त झाले होते. त्यामधून प्रत्येक विभागातील एका जिल्हा आणि एका तालुका स्तरावरील एकूण १५ पत्रकाराची निवड करण्यात आली आहे.

पुरस्कार विजेत्यांमध्ये कोकण विभागातून कुणाल लाडे (डहाणू) व संदेश साळुंके (रायगड), विदर्भ विभागातून शाहिद पठाण (गोंदिया) व रुपेश बागड (वाशिम), पश्चिम महाराष्ट्रातून राहुल पवार (कराड) व स्वप्निल कांबळे (राधानगरी), उत्तर महाराष्ट्रातून ईश्वर महाजन (अमळनेर) व महेंद्रसिंग गिरासे (शिंदखेडा) आणि मराठवाडा विभागातून भारत सवणे (परतूर) व विनोद कांबळे (लातूर) यांचा समावेश आहे.

विशेष विंग अंतर्गत उर्दू विंगसाठी लियाकत पठाण (नाशिक), महिला विंगसाठी सारिका शिंदे (ठाणे), साप्ताहिक विंगसाठी संदीप पिंपळकर (वाशिम), रेडिओ विंगसाठी महेश जगताप (पुणे) आणि डिजिटल विंगसाठी मल्हारी ओमासे (सांगली) यांची निवड करण्यात आली आहे.

या पुरस्कारासाठी १ फेब्रुवारी २०२४ ते ३१ डिसेंबर २०२५ या कालावधीत किमान ४२ किंवा त्यापेक्षा अधिक थेट परिणामकारक बातम्या व लेख प्रसिद्ध असणे अनिवार्य होते. संघटनेचे मुख्य पदाधिकारी संजय आवटे, चंद्रमोहन पुपाला, शंतनू डोईफोडे आणि दिव्या भोसले, ?ड विवेक खरे यांनी निवड समितीचे प्रमुख म्हणून जबाबदारी पार पाडली. ७८ देशांत ४ लाख ७० हजारांहून अधिक सदस्य असलेल्या 'व्हॉईस ऑफ मीडिया'ने पत्रकारांच्या कल्याणासोबतच सकारात्मक पत्रकारितेसाठी मोठे पाऊल उचलले आहे. पत्रकारितेकडे बघण्याचा समाजाचा दृष्टिकोन बदलावा आणि सामाजिक जागृती व्हावी, याच भावनेतून हे पुरस्कार दिले जात असल्याचे संयोजकांनी स्पष्ट केले.

जनमाध्यम जनमाध्यम न्युज अँड पब्लीकेशन प्रा.लि.च्या मालकीचे हे वृत्तपत्र मुद्रक, प्रकाशक प्रदीप देशपांडे यांनी प्लॉट नं.बी.-५०, सातुर्णा औद्योगिक वसाहत, बडनेरा रोड, अमरावती-४४४६०७ येथे छापून जनमाध्यम कार्यालय, हवालदारपुरा,वर्धा-४४२२२१ येथे प्रकाशित केले.

**संपादक-प्रदीप देशपांडे**
**संचालक (वृत्त) - अभिराम देशपांडे**
(Responsible for selection of News Under PRB Act)

**वर्धा आवृत्ती वर्ष-१४ अंक १०१**
**आर.एन.आय.रजी.नं. MAHMAR/२०१३/५१०९३**

**मुख्य कार्यालय**– अंबापेठ, राजकमल चौक, अमरावती-४४४६०१
फोन - ९८२३०१६३००, ९४२२९५६२६८
ई-मेल-atimadhyam@gmail.com,
abhiramdeshpande@gmail.com

# मुलींच्या शिक्षण शुल्कमाफीमुळे समावेशक तंत्रशिक्षणाची क्रांती

## शिक्षणातून सशक्तीकरणः उच्च व तंत्र शिक्षण मंत्री चंद्रकांतदादा पाटील

**अमरावती/का.प्र.**
यत्र नार्यस्तु पूज्यन्ते रमन्ते तत्र देवता:। याप्रमाणे ज्या समाजात महिलांचा सन्मान होतो, तिथेच प्रगती नांदते. जगभरात ८ मार्च हा दिवस जागतिक महिला दिन म्हणून अत्यंत उत्साहात साजरा केला जातो. हा केवळ एक औपचारिकता म्हणून साजरा करण्याचा दिवस नाही, तर महिलांच्या अफाट कर्तृत्वाचा, त्यांच्या संघर्षाचा आणि समाजाच्या जडणघडणीत त्यांनी दिलेल्या अमूल्य योगदानाचा गौरव करण्याचा हा दिवस आहे. आजच्या आधुनिक आणि गतिमान युगात महिलांचे शिक्षण, त्यांचे तांत्रिक कौशल्य आणि त्यांचे नेतृत्व हे केवळ एका कुटुंबाच्या प्रगतीपुरते मर्यादित राहिलेले नाही, तर ते संपूर्ण राष्ट्राच्या आणि देशाच्या सर्वांगीण विकासाचे महत्त्वपूर्ण आधारस्तंभ बनले आहे. त्यामुळेच उच्च शिक्षणाच्या क्षेत्रात मुलींना समान संधी देणे आणि तंत्रशिक्षणात त्यांचा सहभाग वाढविणे ही काळाची सर्वात मोठी गरज आहे.

प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी विकसित भारत '२०४७' चा संकल्प मांडला आहे. भारताला जगाची ज्ञानशक्ती (Knowledge Super-power) बनवण्यासाठी महिलांची बुद्धिमत्ता, त्यांची सर्जनशीलता आणि त्यांचे तांत्रिक कौशल्य यांचा उपयोग करून घेणे महत्वाचे आहे. जेव्हा आपण 'विश्वगुरू' भारताचा विचार करतो, तेव्हा त्याचा अर्थ केवळ आर्थिक प्रगती नसून ती शैक्षणिक आणि सामाजिक समतेवर आधारित प्रगती असते. देश आज प्रगतीच्या दिशेने वेगाने वाटचाल करत आहे. या ऐतिहासिक वाटचालीत महिलांचा सक्रिय सहभाग महत्त्वाचा घटक आहे. जेव्हा महिलांचे शिक्षण, त्यांचे उपजत कौशल्य आणि त्यांची सर्जनशीलता यांचा राष्ट्रनिर्मितीसाठी योग्य उपयोग होईल, तेव्हाच देशाच्या आर्थिक आणि तांत्रिक विकासाला खऱ्या अर्थाने नवे बळ मिळेल. म्हणूनच शिक्षण क्षेत्रात 'स्त्री-पुरुष समानता' केवळ कागदावर न ठेवता ती प्रत्यक्ष व्यवहारात प्रस्थापित करणे, हे आजचे सर्वात मोठे राष्ट्रीय कर्तव्य आहे असे मी मानतो.



याच भूमिकेतून महाराष्ट्र शासनाने शैक्षणिक वर्ष २०२४-२५ पासून, ज्या कुटुंबांचे वार्षिक उत्पन्न ८ लाख रुपयांपर्यंत आहे, अशा सर्व पात्र मुलींना उच्च व तंत्रशिक्षणातील व्यावसायिक अभ्यासक्रमांसाठी १००% शिक्षण शुल्क (Tuition Fee) आणि परीक्षा शुल्क (Exam Fee) माफ करण्याचा एक ऐतिहासिक आणि दूरदृष्टीपूर्ण निर्णय घेतला आहे. उच्च व तंत्र शिक्षण विभागासह वैद्यकीय, कृषी, आणि इतर मागास बहुजन कल्याण विभागामार्फत दिल्या जाणाऱ्या शुल्क सवलतीचा लाभ आता ५० टक्क्यांवरून थेट १०० टक्के करण्यात आला आहे. शैक्षणिक वर्ष २०२४-२५ पासून लागू झालेला हा निर्णय राज्याच्या शैक्षणिक इतिहासातील एक मैलाचा दगड ठरला आहे.

या निर्णयामुळे अभियांत्रिकी, फार्मसी, आर्किटेक्चर, बीबीए, बीसीए, एमसीए यांसारख्या व्यावसायिक अभ्यासक्रमांचे शिक्षण घेण्याची तीव्र इच्छा असूनही केवळ आर्थिक परिस्थितीमुळे मागे राहणाऱ्या हजारो मुलींसाठी उच्च शिक्षणाचे दरवाजे उघडे झाले आहेत. ज्या कुटुंबांचे वार्षिक उत्पन्न ८ लाख रुपयांपर्यंत आहे, अशा सर्व पात्र विद्यार्थिनींना आता पूर्णतः शिक्षण शुल्क आणि परीक्षा शुल्क माफी मिळत आहे. हा निर्णय केवळ एक सरकारी योजना नसून, तो सामाजिक न्याय आणि महिला सशक्तीकरणाचा एक व्यापक सामाजिक जाहीरनामा आहे.

पूर्वी या व्यावसायिक अभ्यासक्रमांसाठी मुलींना केवळ ५० टक्के सवलत मिळत होती, परंतु आकडेवारीनुसार मुलींचा प्रवेशाचा दर ३६ टक्क्यांवरच अडकला होता. यावरून हे स्पष्ट झाले की, ग्रामीण आणि आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटकांतील मुलींसाठी व्यावसायिक शिक्षण हे अजूनही एक मोठे आर्थिक आव्हान होते. पालकांना निम्मी फी भरणेही कठीण जात होते. नेमकी हीच अडचण ओळखून शासनाने १०० टक्के शुल्कमाफीचा धाडसी निर्णय घेतला. माझा असा ठाम विश्वास आहे की, जेव्हा एक मुलगी शिकते, तेव्हा केवळ ती सुशिक्षित होत नाही, तर तिचे संपूर्ण कुटुंब आणि पर्यायाने समाज प्रगत होतो. शिक्षण ही केवळ वैयक्तिक प्रगतीची वाट नसून ती समाजाच्या सर्वांगीण विकासाची गुरुकिल्ली आहे. या योजनेचे अत्यंत सकारात्मक आणि उत्साहवर्धक परिणाम आता दिसू लागले आहेत. शैक्षणिक वर्ष २०२४-२५ मध्ये अभियांत्रिकी पदवी आणि पदविका अभ्यासक्रमांमध्ये सुमारे २८ हजार अधिक मुलींनी प्रवेश घेतला, तर २०२५-२६ मध्ये ही संख्या जवळपास ४८ हजारांनी वाढली आहे. तांत्रिक शिक्षणाकडे मुलींचा हा वाढता कल समाजातील बदलत्या मानसिकतेचे आणि मुलींच्या वाढत्या आत्मविश्वासाचे जिवंत प्रतीक आहे.

महाराष्ट्र शासनाची ही मुलींच्या उच्च शिक्षणाची शिक्षण शुल्कमाफी योजना म्हणजे महिलांच्या शैक्षणिक आणि सामाजिक सशक्तीकरणाची एक व्यापक चळवळ आहे. या माध्यमातून 'वुमन-लेड डेव्हलपमेंट' (Women-Led Development) ही संकल्पना आपण प्रत्यक्ष साकारत आहोत. जेव्हा महाराष्ट्रातील प्रत्येक मुलगी तंत्रज्ञानाने सज्ज होऊन बाहेर पडेल, तेव्हा ती विकसित भारताच्या निर्मितीत आपले मोलाचे योगदान देईल. जागतिक महिला दिनाच्या निमित्ताने मी सर्व विद्यार्थिनींना आवाहन करतो की, ज्ञानाच्या आणि कौशल्याच्या जोरावर आपले भविष्य घडवा. महाराष्ट्र शासन आपल्या स्वप्नांना बळ देण्यासाठी खंबीरपणे पाठीशी उभे आहे. सशक्त, आत्मनिर्भर आणि प्रगत महिलांचे नेतृत्व निर्माण करून आपण महाराष्ट्राला आणि देशाला प्रगतीच्या शिखरावर नेऊया.महाराष्ट्रातील प्रत्येक मुलगी सक्षम, स्वावलंबी आणि उच्चशिक्षित व्हावी, हेच आमचे स्वप्न आहे. सर्व माता-भगिनींना जागतिक महिला दिनाच्या मन:पूर्वक शुभेच्छा!

## छत्रपती शिवराय अलौकिक कार्याचे प्रेरणास्रोत-यश खोडके



**अमरावती/का.प्र.**
छत्रपती शिवाजी महाराजांनी आपल्या दैदीप्यमान कार्यकर्तृत्वाने जगभरातील लोकांना आकर्षित केले आहे. आज साडेतीनशे वर्षांहून अधिक काळ लोटला तरी या व्यक्तिमत्वाची जादू कायम आहे. त्यांचे नाव उच्चारले तरी अभिमानाने छाती उंचावते. छत्रपती शिवाजी महाराजांना उच्च दर्जाची प्रतिभा आणि स्पष्ट दृष्टी लाभली होती. त्यांचे जीवन कर्तृत्व, नेतृत्व, दातृत्व आणि नैतिकतेचा आदर्श होते. ज्या मातीत त्यांनी जन्म घेतला, तेथील मातेला आणि मातृभूमीला अभिमान वाटावा असे अलौकिक कार्य त्यांनी उभे केले.

त्यांनी शून्यातून विश्व् निर्माण केले आणि त्यात नैतिकता व राज्यकारभाराचा अनेक अर्थानी आदर्श घालून दिला. त्यांचे राज्य हे खऱ्या अर्थाने रयतेचे राज्य होते.अतिशय प्रतिकूल परिस्थिती असतानाही त्यांनी शून्यातून आपले स्वराज्याचे ध्येय साध्य केले.छत्रपती शिवाजी महाराज यांच्या जयंती महोत्सव निमित्याने आयोजित कार्यक्रमात ते बोलत होते. अमरावती शहरात छत्रपती शिवाजी महाराज यांच्या जयंती महोत्सवाचे औचित्य साधून विविध ठिकाणी अनेक कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले होते. भाजीबाजार परिसर स्थित मनपा शाळा क्रमांक - ६ येथील शिवजयंती महोत्सव स्थळी यश खोडके यांनी भेट दिली.अशा शिवछत्रपतींच्या प्रतिमेस पूजन - वंदन - नमन व माल्यार्पण करीत यश सुलभा संजय खोडके यांनी महाराजांच्या प्रतिमेस मानाचा मुजरा केला. तदनंतर महेंद्र कॉलनी - रहाटगाव तसेच रहाटगाव चौक परिसरात आयोजित शिवजयंती महोत्सव स्थळी उपस्थित राहून विविध कार्यक्रम व उपक्रमात त्यांनी सहभाग नोंदवला. शिवजयंती निमित्याने आयोजित भव्य मिरवणुकीत सर्व उपस्थितांनी ' छत्रपती शिवाजी महाराज की जय ' असा जयघोष केला असता यावेळी आसमंत दणाणून गेल्याचे दृश्य दिसून आले.याप्रसंगी भाजीबाजार - महेंद्र कॉलनी - रहाटगाव - रहाटगाव चौक येथील शिवप्रेमी बांधव - भगिनी - युवक - युवती प्रामुख्याने उपस्थित होते.

# बोपापूर येथे अज्ञात व्यक्तींने चार चाकी, दुचाकी जाळल्या

## अचलपूर कृषी उत्पन्न बाजार समितीचे माजी उपसभापती अमोल चिमोटे यांच्या घरासमोरील घटना

**अचलपूर/वार्ताहर**
अचलपूर तालुक्यातील बोपापूर येथील अचलपूर कृषी उत्पन्न बाजार समितीचे माजी उपसभापती अमोल चिमोटे यांचे ८ मार्च रोजी मध्य रात्री साडे तीन च्या दरम्यान घरा समोर उभ्या असलेली टाटा विटारा आणि एक होंडा दुचाकी वाहन अज्ञात व्यक्तीने जाळल्याची तक्रार सरमसपुरा पोलीस स्टेशनमध्ये दाखल झाल्याने अज्ञात व्यक्ती विरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आलेला आह. या घटनेचा पुढील तपास सरमसपुरा पोलीस स्टेशनचे ठाणेदार गोपाल चावडीकर यांच्या मार्गदर्शनाखाली सुरू आहे. सरमसपुरा पोलीस स्टेशनचे ठाणेदार गोपाल



चावडीकर यांनी घटनास्थळी सुद्धा भेट दिली.यामुळे या घटनेमुळे संपूर्ण च्या परिसरात खळबळ निर्माण झालेली आह. टाटाची विटारा आणि एक होंडा दुचाकी वाहन जळाल्याने अचलपूर कृषी उत्पन्न बाजार समितीचे माजी उपसभापती अमोल चिमोटे यांचे लाखो रुपयांचे नुकसान झालेले आहे. पोलीस तपासात ही घटना नेमकी कशामुळे घडली हे स्पष्ट होणार आहे. प्राप्त माहितीनुसार, अचलपूर तालुक्यातील बोपापूर येथील काँग्रेस पक्षाचे नेते अमोल चिमोटे यांचे घर आह. काल ८ मार्च रोजी मध्यरात्री ३ ते ४ च्या दरम्यान त्यांना घरामध्ये सर्व सदस्य झोपेत असताना धूर व काहीतरी बाहेर जळण्याचा आवाज आला. त्यानंतर घरातील सदस्य जागी होऊन त्यांनी दरवाजा उघडले असता घरासमोर परिसरात ठेवलेले चारचाकी टाटा विटारा वाहन क्रमांक एम एच २७ डी यू ०३३० आणि एक होंडा दुचाकी वाहन जळत असल्याचे त्यांना आढळले. त्यानंतर अमोल चिमोटे यांनी गावातील ग्रामस्थांच्या मदतीने पाण्याने ती आग वीझवली. पण तोपर्यंत त्या चारचाकी ,दुचाकी वाहनांचे मोठे नुकसान झाले होते. ही घटना समोर येताच परिसरातील नागरिक मोठ्या संख्येने घटना स्थळी दाखल झाले होते. सरमसपुरा पोलीस पोलीस स्टेशनमध्ये या संपूर्ण प्रकरणाची तक्रार अमोल चिमोटे यांनी दाखल केलेली आहे. सरमसपुरा पोलीस स्टेशनचे ठाणेदार गोपाल चावडीकर यांच्या मार्गदर्शनाखाली पुढील तपास सुरू असून घटनास्थळी सुद्धा त्यांनी भेट दिली होती. यामुळे ही घटना नेमकी कशी घडला? तो अज्ञात व्यक्ती कोण आह? हे सर्व पोलीस तपासानंतर स्पष्ट होणार आहे. या घटनेमुळे परिसरातील नागरिकांमध्ये भीतीचे वातावरण आह. सरमसपुरा पोलीस स्टेशन मध्ये अज्ञात व्यक्तीने एक चारचाकी, दुचाकी वाहन जाळल्याच्या तक्रारीवरून गुन्हा दाखल करण्यात आलेला आहे पुढील तपास सुरू आहे.

मला घरा समोर धुर निघतांना दिसला. आम्ही घरा बाहेर पडलो. माझी घरासमोरील वाहणे पेटलेली दिसली. शेजारच्या नागरीकांच्या मदतीने ती आग विजवली. तो पर्यंत माझ्या वाहनांचे अंदाजे १६ लाखाचे नुकसान झाले होते . माझे कोणाशीच वैर नाही. एक अज्ञात चारचाकी वाहन गावात येतांना सीसीटीव्ही कॅमेरे त दिसत आहे. त्यातील अज्ञात व्यक्तीचे काम तर नाही ना, अशी शंका आहे.

**-अमोल चिमोटे**

## जागतिक महिला दिनानिमित्त अमरावतीत महिला मेळावा

# कर्तृत्ववान महिलांचा गौरव, बचत गटांच्या स्टॉल्सना उत्स्फूर्त प्रतिसाद

अमरावती प्रतिनिधी : जागतिक महिला दिनानिमित्त अमरावती महानगरपालिकेच्या महिला व बाल विकास विभाग, राष्ट्रीय शहरी आजीविका अभियान विभाग तसेच शिक्षण विभाग यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित महिला मेळावा, कर्तृत्ववान महिलांचा सत्कार, सांस्कृतिक कार्यक्रम व विविध उपक्रम उत्साहपूर्ण वातावरणात पार पडले. शनिवारी (दि. ७ मार्च) संत ज्ञानेश्वर सांस्कृतिक भवन, मोर्शी रोड, अमरावती येथे झालेल्या या कार्यक्रमाला शहरातील महिला बचत गटांच्या सदस्यांसह महिला अधिकारी-कर्मचारी, शिक्षिका व नागरिकांचा मोठ्या संख्येने सहभाग लाभला.



कार्यक्रमाचे उद्घाटन राज्याचे महसूल मंत्री तथा अमरावती जिल्ह्याचे पालकमंत्री ना. श्री. चंद्रशेखर बावनकुळे यांच्या हस्ते करण्यात आले. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी अमरावती महानगरपालिकेचे महापौर श्रीचंद तेजवाणी होते. यावेळी प्रमुख अतिथी म्हणून खासदार डॉ. अनिल बोंडे, आमदार संजय खोडके, आमदार सुलभा खोडके, आमदार रवि राणा, उपमहापौर सचिन भेंडे, स्थायी समिती सभापती अविनाश मार्डीकर, पक्षनेता चेतन गावंडे, गटनेता नाना आमले तसेच नगरसेवक-नगरसेविका मोठ्या संख्येने उपस्थित होते.

अमरावती शहरातील धार्मिक व सांस्कृतिक वारसा जपण्यासाठी अंबादेवी–एकविरा देवी मंदिर परिसर विकास प्रकल्प त्वरित राबविण्यात येणार असून शहरातील सुरक्षाव्यवस्था मजबूत करण्यासाठी सीसीटीव्ही कॅमेरे बसविण्यासाठी निधी उपलब्ध करून दिला जाणार असल्याची माहिती त्यांनी दिली.

या अंतर्गत १५०० महिला बचत गटांना प्रत्येकी एक लाख रुपयांचे अर्थसाहाय्य देण्यात येणार असून त्यापैकी सुमारे ५०० बचत गट अमरावती शहरातील असतील, असेही त्यांनी सांगितले. यावेळी खासदार डॉ.अनिल बोंडे, आमदार सुलभाताई खोडके आपले मनोगत व्यक्त केले. कार्यक्रमाच्या सुरुवातीला उपायुक्त नरेंद्र वानखडे यांनी प्रास्ताविकातून महिला सक्षमीकरणासाठी महानगरपालिका विविध उपक्रम राबवत असल्याची माहिती दिली. महिला बचत गटांना प्रोत्साहन देणे, त्यांच्या उत्पादनांना बाजारपेठ उपलब्ध करून देणे तसेच महिलांना शासनाच्या विविध योजनांची माहिती देणे या उद्देशाने महिला मेळाव्याचे आयोजन करण्यात आल्याचे त्यांनी सांगितले.

## वारकरी संतांचे विचार,महा पुरुषांच्या वैचारिक कार्याचा पाया आहे-प्रा. प्रेमकुमार बोके

**चांदूरबाजार-** आज विज्ञानाने कितीही क्रांती घडवून आणली असली तरीही, सुशिक्षितांमध्ये अंधश्रद्धे प्रमाण या विज्ञान युगात सर्वाधिक आहे.आज ही सुशिक्षित आमच्या समाज व्यवस्थेत,बेल पत्री वाल्या व पर्ची वाल्या बाबांचा धुमाकूळ सुरू आहे.तत्कालीन विपरीत परिस्थितीत ही, छत्रपती शिवाजी महाराज, महात्मा ज्योतिबा फुले, डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांनी क्रांती घडवून आणली. ती वारकरी संतांच्या विचारातून. असे प्रतिपादन वैचारिक चिंतक प्रा. प्रेमकुमार बोके यांनी केले. या वेळी ते स्थानिक स्मशानभूमीत आयोजित, लोकजागर होलिकोत्सव सोहळ्यात बोलत होते.या सोहळ्याचे सलग ७ व्या वर्षीचे आयोजन, अखिल भारतीय अंधश्रद्धा निर्मूलन समिती व समविचारी संघटनांच्या वतीने करण्यात आले होते. संचलन डॉ.तुषार देशमुख यांनी,तर आभारप्रदर्शन सुनील आकोलकर यांनी केले.या प्रसंगी अंनिसच्या चळवळीचे आधारवड व वऱ्हाडी कवी डॉ.मिर्झा बेग यांना श्रद्धांजली वाहण्यात आली. कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी प्रमोद ठाकरे, पंकज आवारे, संतोष कोठाळे, सुनील पापळकर, निलेश कडू, रविंद्र कोंडे, निलेश चारथळ, प्रशांत म्हस्के, प्रा.गजानन देशमुख, सतीश गुजरकर, प्रकाश भालेराव, प्रभाकर खोपे, नंदकिशोर रोकडे, आर.के. देशमुख. संजय राऊत, प्रमोद राऊत,गजानन ठाकरे, डॉ.सुनिल देशमुख, मंगेश चौधरी, बाबासाहेब लंगोटे,उदय देशमुख, गजानन कडू इत्यादिंनी परिश्रम घेतले.यावेळी स्मशानभूमीची देखभाल करणारे स्मशानजोगी अमोल पवार यांचा सपत्नीक सन्मान करण्यात आला.

# गटशिक्षणाधिकारी खुर्ची मिळवण्यासाठी केले वाद

## खुर्चीवर बसणारे गेले सेन्ट्रल जेलच्या आत

**अंजनगाव सुर्जी/वार्ताहर**
अंजनगाव सुर्जी पंचायत समिती शिक्षण विभाग हा चार वर्षांपासून सतत कोणत्या ना कोणत्या कारणाने चर्चेत आहे.

अंजनगाव सुर्जी पंचायत समितीवर चार वर्षांपासून प्रशासकीय राजवट असून प्रभारी अधिकाऱ्यांच्या भरवशावर मनमानी पद्धतीने कारभार सुरू असल्याची ओरड होत आहे.पंचायत समिती शिक्षण विभागात अनेक पदे रिक्त असून केंद्र प्रमुख शाळेचा कारभार संभाळून केंद्रातील शाळेवर नियंत्रण ठेवत आहे तर काही केंद्र प्रमुख विस्तार अधिकारी पदाचा अतिरिक्त पदभार सांभाळत आहेत.विस्तार अधिकारी,व गटशिक्षणाधिकारी हे दोन्ही पदे वर्ग दोन चे असताना येथिल शिक्षण विभागात वर्ग तीन मधील शिक्षक शिक्षण विभागाचा कारभार सांभाळत आहे.पंचायत समिती शिक्षण विभागातील रिक्त पदे असल्याने जिल्हा परिषद शिक्षकांना सुद्धा योगायोग अधिकारी होण्याचे स्वप्न पूर्ण होत आहे.अंजनगाव पंचायत समिती शिक्षण विभागात गेल्या तीन वर्षांपासून एक ग्रहण लागले असून तीन वर्षात शिक्षण विभागातील चार जणांवर गुन्हे दाखल झाले आहेत.जिल्हा परिषदेचे शिक्षक शिक्षण विभागातील वर्ग दोनच्या अधिकाऱ्यांची खुर्ची मिळवण्यासाठी वरिष्ठ अधिकाऱ्यांची खुशामत करून व राजकीय नेत्यांकडे धाव घेऊन येथिल विस्तार अधिकारी व गटशिक्षणाधिकारी पदाच्या खुर्ची साठी मोठे डावपेच खेळले गेले होते. ते खेळ गटशिक्षणाधिकारी व विस्तार अधिकारी यांच्याच अंगलट आले आहे.



**स्वताच खड्डयात पडले**

यापूर्वी वर्ग दोन चो गटशिक्षणाधिकारी बि आर. गिऱ्हाशे पदभार संभाळत असताना स्थानिक असलेल्या शिक्षकांना गटशिक्षणाधिकारी खुर्चीचे स्वप्न पडू लागले होते. गिऱ्हाशे कोणत्याही प्रकरणात अडकुन किंवा त्यांची येथून कशी हाकल पट्टी होईल अशी रणनीती या महाशयांनी आखली होती. अखेर गिऱ्हाशे यांची बदली झाली. आणि खुर्ची खाली झाली आणि हे महाशय खुर्ची मिळवण्यात यशस्वी झाले. विशेष म्हणजे यात त्यांना लोकप्रतिनिधींसह वरिष्ठ अधिकाऱ्यांचे सहकार्य लाभले. दुसऱ्यासाठी खड्डा खोदणारे स्वताच खड्डयात पडले असल्यामुळे या महाशयांची चर्चा शिक्षण विभागात चांगलीच रंगत आहे

## सुकळी येथे परमहंस परशराम महाराज पुण्यतिथी महोत्सव

**अमरावती-** श्री क्षेत्र सुकळी (गुरव), ता. नांदगाव (खंडेश्वर), येथे श्री संत परमहंस परशराम महाराज यांच्या पुण्यतिथी निमित्त व तुकाराम बिजेच्या पर्वावर श्रीमद् भागवत सप्ताह व अखंड हरिनाम सप्ताह आयोजित करण्यात आला होता . या धार्मिक कार्यक्रमाचे आयोजन २६ फेब्रुवारी ते ५ मार्च पर्यंत केले होते यामध्ये सकाळी ९ ते १२, दुपारी ३ ते ६ श्रीमद् भागवत प्रवचन ह.भ.प. गोपाल महाराज (आळंदीकर), ह.मु. कवता बाजर, ता. आर्णी, जि. यवतमाळ यांच्या सुमधुर व अमृतमय वाणीमध्ये होते याव्यतिरिक्त, विविध किर्तनकारांचे आयोजनही केले गेले होते. यामध्ये ह.भ.प. श्री. वैभव महाराज तराळ, दयार्पूर, ह.भ.प. श्री. सागर महाराज नांदुरकर, राळेगांव, ह.भ.प. श्री. अलकाताई



कुरुमकर, कारंजा, ह.भ.प. श्री. संजय महाराज ठाकरे, कौंडण्यपुर, ह.भ.प. श्री. हरीष महाराज पाटील, चिंचोली रुद्रायणी, ह.भ.प. श्री. ज्ञानेश्वर महाराज घोडे जनुना, ह.भ.प. श्री. गणेश महाराज शेटे, वरुर जऊळका यांनी कीर्तनाची सेवा दिली ५ मार्चला भव्य शोभायात्रा काढण्यात आली यामध्ये दिंडी पथक भजनी मंडळांनी सहभाग घेतला व दुपारी महाप्रसाद वाटप करण्यात आला यामध्ये सर्व गावकरी मंडळींनी सेवा दिली. याबाबत आयोजकांनी सर्वांचे आभार व्यक्त केले.



# ३ कोटींच्या ‘एमडी’चा मोठा साठा जप्त

## अमरावती गुन्हे शाखेची धडक कारवाई, दोघे अटकेत



**अमरावती/प्रतिनिधीः-** शहरात अमली पदार्थांच्या वाढत्या तस्करीला आळा घालण्यासाठी गुन्हे शाखेने रविवारी सायंकाळी मोठी कारवाई करत तब्बल २ किलो ८० ग्रॅम एमडी (मेफेड्रोन) जप्त केले. आंतरराष्ट्रीय बाजारात या अमली पदार्थाची किंमत सुमारे ३ कोटी १ लाख २० हजार रुपये इतकी असल्याचे पोलिसांनी सांगितले. या प्रकरणी पोलिसांनी दोन आरोपींना अटक केली असून, त्यांच्या माध्यमातून मोठ्या ड्रग्स नेटवर्कचा उलगडा होण्याची शक्यता व्यक्त केली जात आहे.

अटक करण्यात आलेल्या आरोपींमध्ये अब्दुल फहीम (वय २५, आझाद नगर, अमरावती) आणि शेख आयान शेख रमजान (वय २०, द्वारका नगर, अमरावती) यांचा समावेश ☞(पान २ वर)

### पसार आरोपींची शोध मोहिम

दरम्यान, गेल्या काही महिन्यांपासून अमरावती जिल्ह्यात अमली पदार्थांच्या तस्करीविरोधात पोलिसांनी विशेष मोहीम सुरू केली आहे. या मोहिमेमुळे अनेकदा मोठ्या प्रमाणात ड्रग्स जप्त करण्यात आले असून, शहरात अमली पदार्थांचा पुरवठा रोखण्यासाठी पोलिस अधिक सतर्क झाल्याचे दिसून येत आहे. या प्रकरणी आरोपींविरुद्ध एनडीपीएस कायद्यांतर्गत गुन्हा दाखल करण्यात आला असून, या साखळीतील इतर आरोपींना देखील लवकरच अटक होण्याची शक्यता आहे.

# कृत्रिम वाळू प्रकल्पांना सवलती देऊन प्रोत्साहन

## जिल्ह्यात कृत्रिम वाळू निर्मितीला चालना



चालना देण्यात येत आहे. या धोरणांतर्गत जिल्ह्यात एम-सँड युनिट्स स्थापन व्हावेत, याकरिता जिल्हाधिकारी आशिष येरेकर यांच्या अध्यक्षतेखाली नुकतीच एक विशेष बैठक महसूल भवन निर्णयातील तरतुदी, आवश्यक दस्तऐवज, कृत्रिम वाळू युनिट करण्याकरीता शासनाकडून देण्यात येणाऱ्या सवलतींची माहिती दिली.

जिल्हाधिकारी येरेकर यांनी सवलत देण्यात आली आहे.

तसेच युनिट्सच्या मर्यादेत शिथिलता देण्यात आली आहे. यापूर्वी प्रत्येक जिल्ह्यासाठी ५० युनिट्सची मर्यादा निश्चित करण्यात ☞(पान २ वर)

# चिखलऱ्यात ‘तांडव’; बच्चू कडूंच्या मेळघाट संघर्ष महापदयात्रेची निर्णायक आगेकूच

**चिखलदरा/प्रतिनिधीः-** मेळघाटातील वर्षानुवर्षे प्रलंबित प्रश्न, आदिवासी बांधवांवर होणारा अन्याय आणि शासनाच्या उदासीनतेविरोधात सुरू असलेली माजी आमदार बच्चू कडू यांच्या नेतृत्वातील मेळघाट संघर्ष महापदयात्रा आता निर्णायक टप्प्यावर पोहोचली असून उद्या चिखलदरा येथे हजारो आदिवासी बांधवांच्या उपस्थितीत तहसिलवर जोरदार ‘तांडव आंदोलन’ होणार आहे. या आंदोलनामुळे संपूर्ण



प्रशासन यंत्रणा सतर्क झाली असून परिसरात मोठा पोलीस बंदोबस्त तैनात करण्यात आला आहे.

गेल्या काही दिवसांपासून मेळघाटातील दुर्गम गावांमधून पायी चालत निघालेल्या या संघर्ष यात्रेला आदिवासी समाजाचा मोठा प्रतिसाद मिळत आहे. प्रशासनाकडे वारंवार पाठपुरावा करूनही मूलभूत प्रश्न सुटत नसल्याने आता थेट आंदोलनाच्या माध्यमातून शासनाला जागे करण्याचा निर्धार बच्चू कडूंनी व्यक्त केला आहे.

आज ८ व्या दिवशी काटकुंभ येथून निघालेली महापदयात्रा बामादेही, डोमा आणि काजलडोह☞(पान २ वर)

## जागतिक महिला दिनी उत्कृष्ट महिला वाहकांचा सत्कार

# स्त्री ही पुढील पिढी घडवणारी शक्ती आहे

### - आमदार सुलभा खोडके



**अमरावती/प्रतिनिधीः-** स्त्री ही पुढील पिढी घडवणारी शक्ती आहे. मुलांवर चांगले संस्कार करण्यात तिचा वाटा असतो. त्यामुळे स्त्रीचे शिक्षण राष्ट्राच्या भविष्यासाठी आवश्यक आहे. महिला दिन म्हणजे केवळ सत्कार समारंभ नव्हे. महिलांना सुरक्षित आणि समान वातावरण देणे महत्वाचे आहे. प्रत्येक मुलीला तिच्या क्षमतेनुसार संधी मिळाली पाहिजे. तिच्या स्वप्नांना मर्यादा नसाव्यात. समाजाचे तिला भक्कम पाठबळ हवे. स्त्री हा एक आशेचा किरण आहे. तिच्या जिद्दीमुळे समाजात सकारात्मक बदल घडतात. या महिला दिनी आपण एक संकल्प करूयात. स्त्रीच्या क्षमतेवर विश्वास ठेवूया. तिचा आदर करूयात. समानतेवर आधारित समाज घडवण्यासाठी एकत्र काम करूयात. स्त्री ही प्रेरणा आहे आणि भविष्याची ऊर्जा आहे. तिचा सन्मान म्हणजेच मानवतेचा सन्मान आहे. असे प्रतिपादन आमदार सुलभा संजय खोडके यांनी उपस्थितांना संबोधून केले. रविवार दिनांक ८ मार्च २०२६ रोजी पंचवटी चौक ते ☞(पान २ वर)

# मोर्शीतून कार लंपास करणाऱ्या चोरट्यांना अटक

### - २.९५ लाखांचा मुद्देमाल हस्तगत

**अमरावती/प्रतिनिधीः-**


मोर्शी शहरातील शिवाजी नगर परिसरातून चोरीस गेलेल्या इंडिका व्हिस्टा कार प्रकरणाचा स्थानिक गुन्हे शाखा (अमरावती ग्रामीण) यांनी वेगाने तपास करत उलगडा केला असून दोन आरोपींना अटक करण्यात आली आहे. या कारवाईत चोरीची कार, गुन्ह्यात वापरलेले वाहन व मोबाईल असा एकूण २ लाख ९५ हजार रुपयांचा मुद्देमाल पोलिसांनी जप्त केला.



मोर्शी येथील शिवाजी नगरमध्ये राहणारे उमेश ज्ञानेश्वर ठाकरे (वय ३८) यांनी २२ फेब्रुवारी रोजी त्यांची इंडिका व्हिस्टा (एमएच-२७-एआर-३८८४) ही कार घरासमोर उभी केली होती. मात्र रात्रीच्या सुमारास अज्ञात चोरट्यांनी कार लंपास केली. या प्रकरणी मोर्शी पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला. चोरीच्या घटनेनंतर स्थानिक गुन्हे शाखेने तपासाची सूत्रे हाती घेत तांत्रिक माहिती आणि गुप्त बातमीदारांच्या मदतीने शोधमोहीम सुरू केली. दरम्यान कठोरा नाका ते नागपूर बायपास रोड परिसरात संशयास्पदरीत्या उभ्या असलेल्या कारमध्ये दोन संशयित बसल्याची☞(पान २ वर)

# मोर्शीत एकात्मिक प्रशासकीय इमारतीचे पालकमंत्र्यांच्या हस्ते लोकार्पण

## सर्व शासकीय कार्यालये आता एकाच छताखाली येणार



**अमरावती/प्रतिनिधीः-**

मोर्शी येथील नागरिकांच्या सुविधेसाठी नव्याने उभारण्यात आलेल्या भव्य एकात्मिक प्रशासकीय इमारतीचे उद्घाटन पालकमंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांच्या हस्ते करण्यात आले. यावेळी पालकमंत्र्यांनी इमारतीच्या



कोनशिलेचे अनावरण करून प्रत्यक्ष ☞(पान २ वर)

# विजेच्या पोलवरून ॲल्युमिनियम वायर चोरी

अमरावती : वलगाव पोलीस ठाण्याच्या हद्दीतील नांदुरा बु शेत शिवारात आठ विजेचे पोलवरून अज्ञात चोरांनी ॲल्युमिनियम वायरची चोरी केली. या चोरीत अंदाजे २५,००० रुपये किंमतीचा वायर तसेच सीमेंट पोलचे नुकसान झाले, ज्यामुळे नागरिकांची विज पुरवठा सेवा खंडित झाली. वलगांव पोलिसांनी सहायक अभियंता प्रफुल कोकाटे यांच्या तक्रारीवर अज्ञात आरोपीविरुद्ध गुन्हा दाखल केला असून तपास सुरू आहे.

# नवविवाहितेचा मानसिक व शारीरिक छळ

अमरावती : भातकुली अंतर्गत गणोजादेवी येथील २३ वर्षीय नवविवाहितेचा तिच्या नवऱ्या व सास-सास-याकडून मानसिक व शारीरिक छळ करण्यात आला. विवाहाला फक्त एक महिना उलटल्यानंतरच नवऱ्या व सास-सास-याने तिला त्रास देण्यास सुरुवात केली. गर्भधारणेच्या वेळी त्यांनी गर्भपात करण्यास सांगितले मात्र तीने नकार दिला. त्यामुळे त्यांनी तिला मारहाण व शिविगाळ केली. त्याचबरोबर, माहेरवरून पैसे आणण्याची मागणी करत त्रास दिला. याप्रकरणात पीडितेच्या तक्रारीवर भातकुली पोलीस ठाण्यात नवरा, सासू-सास-याविरुद्ध गुन्हा नोंदवला असून तपास सुरू आहे.

# पर्समधून १.६२ लाख रुपये चोरी

अमरावती : शहरातील गजानन टाऊन शिपमध्ये राहणाऱ्या ६२ वर्षीय महिलेच्या पर्समधून १,६२,००० रुपये चोरी झाल्याची धक्कादायक घटना समोर आली आहे. महिलेने बँकेतून १,६०,००० रुपये काढले आणि त्यानंतर ती कठोरा नाका परिसरात परिचिताच्या ऑटोमध्ये बसली होती. त्याच ऑटोमध्ये दुसऱ्या दोन महिलाही होत्या. महिलेने राजापेठ येथील गाडगील ज्वेलर्सच्या समोर उतरल्यावर ऑटोचे पैसे दिले. त्यानंतर दुकानात प्रवेश केल्यावर पर्स तपासला असता रक्कम गायब असल्याचे समोर आले. राजापेठ पोलीस ठाण्यात अज्ञात महिलांविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला असून आरोपींचा शोध सुरू आहे.

# सुरगाव परिसरात बिबट्याच्या दोन शावकांचे दर्शन

## नागरिकांमध्ये भीतीचे वातावरण

**सेलू/प्रतिनिधीः-**

सेलू ते येळाकेळी मार्गावरील सुरगाव परिसरात रविवारी (दि. ८ मार्च) संध्याकाळी बिबट्याच्या दोन शावकांचे दर्शन झाल्याने परिसरात भीतीचे वातावरण निर्माण झाले आहे. संध्याकाळी सुमारे ७.३० वाजताच्या सुमारास अंधार पडल्यानंतर सुरगाव येथील किरणताई महल्ले यांच्या शेतशिवारातून रस्ता ओलांडून आष्टेकर यांच्या शेताच्या दिशेने दोन बिबट्याचे शावक जाताना



काही नागरिकांना दिसले.

या घटनेमुळे गावात एकच खळबळ उडाली. विशेष म्हणजे आष्टेकर यांच्या शेतात गाई, बैल तसेच कोंबड्या मोठ्या प्रमाणात असल्याने पशुधनाला धोका निर्माण☞(पान २ वर)

# आज पासून सर्व शिक्षाचे कर्मचारी पुन्हा गाठणार आझाद मैदान

### समग्र शिक्षा अभियानाचे कर्मचारी २० वर्षांपासून कायमच्या प्रतीक्षेत

**चांदूर रेल्वे/प्रतिनिधीः-**

मागील वीस वर्षांपासून शासन सेवेत कायमच्या प्रतिक्षेत असलेले समग्र शिक्षा अभियानाचे ३ हजारावर कर्मचारी पुन्हा एकदा ९ मार्च पासून मुंबई येथील आझाद मैदानावर आमरण उपोषण आणि आंदोलनासाठी बसणार आहे. सेवेत लागल्या पासून त्यांचे हे १६ वे अधिवेशनावरील आंदोलन आहे. प्रत्येक वेळी कायमचे आश्वासन मिळते परंतु त्याची




अंमलबजावणी मात्र लांबत आहे, या दरम्यात याच अभियानातील दिव्यांग विद्यार्थ्यांसाठी काम करणाऱ्यांना नुकतेच शासन सेवेत कायम केले आहे. त्यामुळे इतर राहिलेल्या कर्मचाऱ्यांचा उद्रेक वाढत आहे. २००१ पासून समग्र शिक्षा अभियान सुरू झाले. त्याच वेळी विद्यार्थ्यांना गुणवत्ता पूर्ण शिक्षण व शिक्षकांना मार्गदर्शन व्हावे यासाठी विषय साधन व्यक्ती, विशेष शिक्षक, डेटा एंट्री ऑपरेटर, लेखा, एम आय एस कॉर्डिनेटर, इंजिनिअर, जिल्हा समन्वयक सहाय्यक कार्यक्रम अधिकारी असे अनेक पदे सहा-सहा महिन्याच्या करारावर व मानधन तत्वावर भरल्या ☞(पान २ वर)

# पोकलँड मशीनचे २.५० लाखांचे साहित्य चोरी

### तिघांविरुध्द गुन्हा दाखल

**अमरावती/प्रतिनिधीः-** निंभा डॅम परिसरात कामासाठी ठेवलेल्या पोकलँड मशीनमधून तीन कामगारांनी जवळपास २.५० लाख रुपये किमतीच्या साहित्यांची चोरी केली, ही घटना ६ मार्च रोजी समोर आली आहे. याप्रकरणी दीपक सुभाषराव पडोळे (वय ३५, देवांगन नगरी, कुऱ्हा, तिवसा) यांच्या तक्रारीवर पोलिसांनीरोपी अंकितकुमार (वय ३२), विकासकुमार (वय ३६, दोन्ही रा. बिहार), पवन तुरी (वय ३५, झारखंड) यांच्याविरुद्ध गुन्हा दाखल केला आहे.



तक्रारीनुसार, दीपक पडोळे पोकलँड मशीनचे काम करतात. त्यांच्याकडे जेसीबी आणि पोकलँड मशीन आहेत, जे निंभा डॅमच्या साईडवर ठेवलेले होते. २२ फेब्रुवारी रोजी दीपक जेव्हा मशीनची तपासणी करण्यासाठी साईटवर गेले, तेव्हा आरोपी कर्मचारी तिथे उपस्थित नव्हते. मशीन तपासल्यावर कंट्रोल वॉल, डिस्प्ले स्क्रीन, ☞(पान २ वर)

# आराधना मॉलमधील चोरीचा गुन्हा उघडकीस

## आरोपी अटकेत, १.२० लाखांचा मुद्देमाल जप्त

**नांदगावपेठ/प्रतिनिधीः-** नांदगावपेठ हद्दीतील प्रमुख व्यापारी केंद्र असलेल्या बिझीलँड मार्केटमधील आराधना फॅशन मॉल येथे झालेल्या चोरीच्या गुन्ह्याचा अवघ्या काही दिवसांत छडा लावत आरोपीला पोलिसांनी अटक केली असून त्याच्याकडून सुमारे १ लाख २० हजार रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात यश मिळविले आहे.

याबाबत पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, फिर्यादी टिकमचंद शिवाजी निमकरोडीवाल (वय ५८, रा. नवी वस्ती, बडनेरा, अमरावती) यांनी नांदगावपेठ पोलीस ठाण्यात



दिलेल्या तक्रारीनुसार दि. २७ फेब्रुवारी २०२६ रोजी रात्री सुमारे १० वाजता त्यांनी बिझीलँड मार्केट येथील आराधना फॅशन मॉल दुकान बंद करून घरी गेले. मात्र दि. २८ फेब्रुवारी रोजी सकाळी दुकान उघडण्यासाठी आले असता दुकानातील☞(पान २ वर)

# विजयनगरमध्ये तरुणीचा गूढ मृत्यू; खोलीत आढळला मृतदेह

**अमरावती/प्रतिनिधीः-** शहरातील राजापेठ पोलीस ठाणे हद्दीतील विजयनगर परिसरात भाड्याच्या खोलीत राहणाऱ्या २७ वर्षीय तरुणीचा मृतदेह संशयास्पद परिस्थितीत आढळून आल्याने परिसरात खळबळ उडाली आहे. कांचन राजेंद्र धाकडे (वय २७, रा. सावली, बंतूर, ता. अचलपूर) असे मृत तरुणीचे नाव आहे. या घटनेची माहिती मिळताच पोलिसांनी घटनास्थळी धाव घेत फॉरेन्सिक पथक, फिंगरप्रिंट तज्ज्ञ आणि श्वान पथकाच्या मदतीने तपास सुरू केला.



कांचन ही विजयनगर येथे लक्ष्मण शेंद्रे यांच्या घराच्या वरच्या मजल्यावरील खोलीत भाड्याने एकटी राहत होती. ६ मार्च रोजी सायंकाळच्या सुमारास लक्ष्मण शेंद्रे यांना कांचन त्यांच्या खोलीत चित अवस्थेत पडलेल्या दिसून आल्या. संशय आल्याने त्यांनी तातडीने राजापेठ पोलिसांना माहिती दिली. माहिती मिळताच पोलसिांचे ☞(पान २ वर)